संस्थापक
साने गुरुजी

साप्ताहिक
साधना
Weekly Sadhana

Date of issue
शनिवार,
११ सप्टेंबर २०२१
मूल्य रु.६०
(एकूण पृष्ठे : ४४)

# जीवनासाठी शिक्षण कसे निर्माण करावे?

डॉ. अभय बंग




MS-CIT
आंतरराष्ट्रीय दर्जाचा परिपूर्ण कंप्यूटर कोर्स
www.mkcl.org/mscit
उद्याच्या जगात वावरण्याचा आत्मविश्वास!
MS-CIT मध्ये आता शिका चौथ्या औद्योगिक क्रांतीची ओळख
Big Data
Augmented Reality
Machine Learning
Virtual Reality
Artificial Intelligence
Internet of Things
Robotics
3D Printing
MKCL
ज्ञानदीप लावू जगी
www.mkcl.org
MKCL KLiC Courses
Gateway to Knowledge Lit Careers
www.klic.mkcl.org
करियर ओरिएंटेड 'क्लिक्' कोर्सेस
Tally Prime with GST
Advanced Excel
Digital Freelancing
C & C++ Programming
DTP Corel & Photoshop
Mobile Apps Development
Coding
IT Hardware & Networking
Internet of Things (IoT)
BFSI
IT for Teachers
Retail Management
क्लिक् कोर्सेस :
• जॉब रेडिनेस
• मॅनेजमेन्ट
• प्रोग्रॅमिंग
• डिजिटल आर्टस्
• डिझायनिंग
• न्यू कॉलर जॉब
• अकाउंटिंग
कोर्स उपलब्ध: केंद्रात/घरी कंप्यूटरवर/स्मार्टफोनवर
अधिक माहितीसाठी MS-CIT केंद्राशी संपर्क साधा.
8956537496

संस्थापक संपादक : साने गुरुजी
Date of issue
११ सप्टेंबर २०२१
वर्ष ७४ / अंक – ४

संपादक :
विनोद शिरसाठ
**सहयोगी संपादक मंडळ :**
अभय टिळक, अतुल देऊळगावकर
मनोहर जाधव, रझिया पटेल

मुखपृष्ठ मांडणी : **गिरीश सहस्रबुद्धे**
व्यवस्थापक आणि अक्षररचना : **सुरेश माने**
मुद्रितशोधन : **विनायक भंडारी**

'साधना' हे साप्ताहिकमालक, साधना ट्रस्ट यांचेसाठी प्रकाशक हेमंत नाईकनवरे यांनी मुद्रक, चंद्रशेखर जोशी, श्री.जे.प्रिंटर्स प्रा.लि. १४१६ सदाशिव पेठ, पुणे ४११०३० येथे छापून, **साधना साप्ताहिक, ४३१ शनिवार पेठ, पुणे** ४११०३०. येथे प्रसिद्ध केले.
**Ph.: 020-24451724 / Mob.: 7028257757**
weeklysadhana@gmail.com
http://weeklysadhana.in
**साधना मीडिया सेंटर (पुस्तकविक्री केंद्र)**
Ph. : 020-24459635

वार्षिक वर्गणी :
**एक वर्षांसाठी : ९०० रुपये**
**दोन वर्षांसाठी : १८०० रुपये**
**तीन वर्षांसाठी : २७०० रुपये**

वर्गणीची रक्कम रोख किंवा/म. ऑ./डी. डी./चेक 'साधना साप्ताहिक' या नावाने काढून, साधना कार्यालयाकडे पाठवावी. किंवा वरील QR कोड स्कॅन करून, अथवा साधना साप्ताहिक, बचत खाते **क्र.60025586634, IFSC MAHB 0000001, बँकऑफमहाराष्ट्र,** बाजीराव रोड शाखा, पुणे ३० येथे वर्गणीची रक्कम जमा करावी. आणि मग नाव, पत्ता, फोन नं. इत्यादी तपशील साधना कार्यालयाला इ-मेल अथवा फोन करून कळवावेत.

(अंकातील सर्व छायाचित्रे इंटरनेटवरून साभार. अंकात व्यक्त झालेल्या सर्वच मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

# अनुक्रम

४ संपादकीय
**दोन उद्योजक आणि एक इतिहासकार**

७ **जीवनासाठी शिक्षण कसे निर्माण करावे ?**
– डॉ. अभय बंग

१७ **गेल ऑम्वेट : दास्याच्या तुरुंगाची किल्ली शोधणारी संशोधक**
– श्रुती तांबे

२२ **जयंत पवार : अन्यायाला उत्तर देणारा भाष्यकार**
– ऋता मनोज ठाकूर

२६ **नाटक – रंगभूमीविषयावरील ज्ञानसंपन्न परिभाषा संग्रह**
– रणधीर शिंदे

३१ **चंद्रपूरची दारूबंदी उठवण्याचा निर्णय : सरकारची मनमानी ?**
– डॉ. अजित मगदूर

३४ **समकालीन चीनवरील दृष्टिक्षेप**
– अभय दातार

३७ **'तरकारी'चा ट्रक**
– मल्हार अरणकल्ले

४० **प्रतिसाद**
– सत्यरंजन खरे, नरेंद्र महादेव आपटे, अरुण वि. कुकडे
– अजय काळे, विष्णू शिवराम ढेरे, स्नेहलता गोसावी
– विवेक पटवर्धन.

संपादकीय

# दोन उद्योजक आणि एक इतिहासकार

डॉ. अभय बंग यांचा दीर्घ लेख या अंकाची मुखपृष्ठकथा म्हणून घेतला आहे. आपल्या शिक्षणव्यवस्थेतून निर्माण झालेल्या समस्यांची चिकित्सा करणारा व त्यावर भाष्य करणारा हा लेख प्रसिद्ध करण्यासाठीचे त्यांनी कळवलेले औचित्य ११ सप्टेंबर हा विनोबा भावे यांचा जन्मदिवस. कारण या लेखातील विवेचन-विश्लेषण गांधी व विनोबा यांच्या शिक्षणविषयक विचारांना अधोरेखित करणारे आहे. मात्र या लेखाला आणखी एक औचित्य आहे, ते म्हणजे हा अंक वाचकांच्या हातात पडलेला असेल तेव्हा ५ सप्टेंबर हा शिक्षकदिन नुकताच येऊन गेलेला असेल. शिवाय, मागील दीड वर्ष कोविड-१९ संकटामुळे दीर्घकालीन दृष्टीने विचार करता सर्वाधिक हानी झाली आहे, ती शिक्षणाची. प्राथमिक पासून उच्च शिक्षणापर्यंत सर्व स्तरीय शिक्षणाची. या सर्वांचा एकत्रित विचार करून, प्रस्तुत संपादकीय लेखही याच विषयावर करावा असा विचार मनात आला आणि बरेच दिवस मनात घोळत असलेली त्रिसूत्री शब्दबद्ध करावी असे वाटले. अर्थातच ती त्रिसूत्री थोडी पार्श्वभूमीसह सांगावी आणि पुढील विश्लेषण व निष्कर्ष वाचकांवर सोपवावे असाही विचार आहे. तर ही त्रिसूत्री आकाराला आलेली आहे ती दोन उद्योजक आणि एक इतिहासाचा अभ्यासक (मर्यादित अर्थाने इतिहासकारही) यांच्यामुळे. हे दोन उद्योजक म्हणजे जमदशेटजी टाटा व अझीम प्रेमजी आणि इतिहासकार म्हणजे अरुण टिकेकर. आपल्याकडे उद्योजकांविषयी काही बरे बोलणे-लिहिणे म्हणजे संशयी नजरा स्वत:कडे वळवणे आणि इतिहासकाराचे उल्लेख करणे म्हणजे काही तरी कालबाह्य उगाळत राहणे असे समजले जाते. मात्र तरीही वरील तिघांचे संदर्भ घेऊन आज-उद्याच्या शिक्षणव्यवस्थेकडे अधिक चांगले लक्ष वेधता येईल असे वाटते.

१८३९ ते १९०४ असा कालखंड लाभलेल्या जमशेटजी टाटा यांना भारतातील आधुनिक उद्योगांचे जनक असे संबोधले जाते. स्वातंत्र्यपूर्व पाऊण शतक आणि स्वातंत्र्योत्तर पाऊण शतक अशी एकूण दीड शतक भारताची वाटचाल पाहिली तर 'टाटा उद्योग समूह' मध्यवर्ती राहिला आहे, 'टाटांचे साम्राज्य' असे म्हणण्याइतपत विस्तार त्यांनी केलेला आहे. त्यांच्या वाटचालीविषयी एकूण जनमत आदराचे राहिले आहे, मात्र त्यांच्यावर प्रखर टीका करणारा एक वर्गही सुरुवातीपासून आतापर्यंत कायम राहिला आहे. तूर्त ते सर्व बाजूला ठेवून टाटांनी शिक्षणविषयक काय विचार केला होता, हे थोडक्यात पाहायचे असेल तर त्यांच्या टाटा ट्रस्टचे धोरण काय राहिले हे पाहायला हवे. १८९२ पासून टाटा ट्रस्ट कार्यरत आहे, त्यानंतर त्यांच्या कुटुंबातील व्यक्तींच्या नावाने आणखी काही ट्रस्ट अस्तित्वात आले. त्यांच्यामार्फत ज्या काही देणग्या शिक्षण क्षेत्रांसाठी देण्यात आल्या त्या प्रामुख्याने उच्च शिक्षण आणि संशोधन यासाठीच होत्या. त्यामागे त्यांची भूमिका अशी होती की, उच्च शिक्षणात व संशोधनात केलेल्या गुंतवणुकीचा वा खर्चाचा परतावा लवकर आणि जास्त मिळतो. म्हणजे विविध विद्याशाखांना प्रवेश घेणारे बुद्धिमान विद्यार्थी निवडायचे, त्यांना मोठ्या रकमेच्या शिष्यवृत्त्या द्यायच्या असे त्यांचे धोरण होते. त्यातून विविध क्षेत्रांत कार्य करण्यासाठीचे तज्ज्ञ पुढील चार-पाच वर्षांत तयार झाले पाहिजेत, असा तो विचार होता. तोच विचार समोर ठेवून मागील सव्वाशे वर्षे टाटा ट्रस्ट भारताच्या शिक्षणक्षेत्राला छोटासा पण परिणामकारक हातभार लावत आहे. त्यांनी उच्च शिक्षण व संशोधन यासाठी शिष्यवृत्ती दिलेले हजारो विद्यार्थी (आणि काही संशोधन संस्था) या देशाच्या प्रगतीमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आले आहेत. टाटा ट्रस्टची ही भूमिका हा देश प्रगतीशील व्हावा, आधुनिक व्हावा, महान व्हावा यासाठीच आहे. आणि त्यामागचा त्यांचा ठोस विचार 'हार्टबिट ऑफ



जमशेटजी टाटा



अझीम प्रेमजी



अरुण टिकेकर

अ ट्रस्ट' या आर.एम.लाला लिखित इंग्रजी पुस्तकात आली आहे. हे पुस्तक मराठीत 'स्पंदने एका न्यासाची' या नावाने श्रीविद्या प्रकाशनाकडून तीन दशकांपूर्वी आले आहे (सध्या आऊट ऑफ प्रिंट). तो उत्तम मराठी अनुवाद मराठीतील प्रख्यात साहित्यिक सुभाष भेंडे यांनी केलेला आहे. पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट चालवणाऱ्या कोणीही वाचावे असे ते आहे.

टाटांप्रमाणेच मागील पाव शतकात या देशात मोठ्या प्रमाणात आदराने नाव घेतले ते अझीम प्रेमजी यांचे. त्यांचेही उद्योग अनेक आहेत, पण माहिती व तंत्रज्ञान या क्षेत्रातील त्यांच्या कामाची चर्चा जास्त आहे. त्यांचीही ख्याती दानशूर उद्योगपती अशी आहे. त्यांच्या नावाने सुरू झालेल्या फाउंडेशनमार्फतही अनेकविध उपक्रम पार पाडले जातात, मात्र त्यांनी अधिक लक्षवेधी काम केले आहे ते प्राथमिक शिक्षणाच्या क्षेत्रात. विशेष म्हणजे फाउंडेशनमार्फत नव्या शाळा उभारण्याचे काम त्यांनी केलेले नाही आणि बुद्धिमान विद्यार्थी निवडून त्यांना अधिक चांगले शिक्षण देणे असेही त्यांचे धोरण नाही. त्याऐवजी दुर्गम भागातील सरकारी प्राथमिक शाळा निवडायच्या आणि तेथील विद्यार्थी व शिक्षक यांना अधिक सक्षम करायचे असे त्यांचे धोरण राहिले आहे. त्यांचे हे काम कर्नाटक राज्यात मोठ्या प्रमाणात झाले आहे. त्या संदर्भातील प्रेमजी यांची भूमिका अशी राहिली आहे की, अशा दुर्गम भागांतील लहान बालकांमध्ये खूप जास्त क्षमता व ऊर्जा दडलेली असते, तिला योग्य खतपाणी योग्यवेळी घातले तर भविष्यात त्यातून मिळणारा परतावा खूप जास्त असेल. म्हणजे सरकारी प्राथमिक शाळा व प्राथमिक शिक्षक यांच्यात कमी गुंतवणूक वा खर्च करूनही समाजाला जास्त फायदा होऊ शकेल, असे ते धोरण आहे. शिवाय, दुर्गम भागातील या बालकांमध्ये आता गुंतवणूक नाही केली तर बरीच राष्ट्रीय संपत्ती वाया जाणार आहे, असाही विचार त्यामागे आहेच. त्याबाबत अझीम प्रेमजी किती ठाम आहेत याची झलक सहा वर्षांपूर्वी त्यांनी 'टाइम्स ऑफ इंडिया'मध्ये लिहिलेल्या एका लेखात पहायला मिळते. गंमत म्हणजे 'हाऊ टू मेक इंडिया ग्रेट' या शीर्षकाचा तो लेख म्हणजे त्यांनी आयपीएस अधिकाऱ्यांसमोर केलेले भाषण आहे. त्या भाषणात ते बोलले आहेत प्रामुख्याने प्राथमिक शिक्षणाविषयी. त्यातही मध्यवर्ती सूत्र आहे शिक्षकांविषयी. ते सूत्र असे– सरकारी प्राथमिक शाळांमध्ये १० ते १५ टक्के शिक्षक असे आहेत ज्यांना कोणत्याही प्रोत्साहनाची व प्रशिक्षणाची गरज नसते, ते स्वयंप्रेरणनेने अध्ययन व अध्यापन करीत राहतात, नवनवे उपक्रम कल्पकतेने राबवत राहतात. त्याच शाळांमध्ये १० ते १५ टक्के शिक्षक असे असतात, ज्यांना कोणतेही प्रशिक्षण व प्रोत्साहन देऊन उपयोग होत नाही. काहीही केले तरी त्यांच्यात प्रेरणा ओतणे आणि त्यांना अध्ययन व अध्यापनास उद्युक्त करणे कठीण असते. आणि उर्वरित ७० ते ८० टक्के शिक्षक असे असतात, ज्यांना प्रशिक्षण व प्रोत्साहन यांची विशेष गरज असते. ते करता आले तर ते शिक्षक उत्तम प्रकारे काम करायला लागतात. त्यामुळे स्वयंप्रेरणेने काम करणारे १० ते १५ टक्के आणि बाहेरूनही ज्यांच्यात प्रेरणा ओतता येत नाही ते १० ते १५ टक्के असे एकूण २० ते ३० टक्के

शिक्षक वगळून, उर्वरित ७० ते ८० टक्के शिक्षकांवर काम केले तर मोठा परतावा मिळतो, असा त्या उद्योजकाने प्राथमिक शिक्षणाच्या क्षेत्रात केलेल्या कामातून काढलेला निष्कर्ष आहे. प्रेमजी यांनी हे सूत्र आयपीएस अधिकाऱ्यांसमोर केलेल्या भाषणात मांडले याचा एक अर्थ, सर्वच क्षेत्रांना ते कमी-अधिक प्रमाणात लागू पडते. म्हणजे त्यांना सापडलेले भारताला महान बनवण्याचे सूत्र त्यांनी सांगितले.

या दोन उद्योजकांना जोडणारा एक दुवा अरुण टिकेकर यांच्या दोन विधानांमध्ये सापडतो. डॉ. टिकेकर यांची ओळख प्रामुख्याने लोकसत्ता दैनिकाचे ११ वर्षे संपादक आणि गंभीर-वैचारिक लेखन करणारे अभ्यासक अशी असली तरी, एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्राचा सामाजिक व सांस्कृतिक इतिहास सांगणारी काही पुस्तके त्यांनी मराठी व इंग्रजीत लिहिली आहेत. त्यातही विशेष लक्षवेधी आहे तो मुंबई विद्यापीठाचा दीडशे वर्षांचा इतिहास. १८५७ च्या राष्ट्रीय उठावानंतर ब्रिटिश इस्ट इंडिया कंपनीचे राज्य संपुष्टात आणून राणीचा जाहीरनामा प्रसिद्ध झाला. त्यानंतर लगेच भारतात कलकत्ता, मुंबई, मद्रास या तीन विद्यापीठांची स्थापना झाली. १८५८ मध्ये स्थापन झालेल्या मुंबई विद्यापीठाचा सव्वाशे वर्षांचा इतिहास १९८३ मध्ये आणि दीडशे वर्षांचा इतिहास २००८ मध्ये टिकेकरांनी लिहिला. त्या इंग्रजी पुस्तकाचे नाव The Cloister's Pale : A Biography of the University of Mumbai असे आहे, त्याचा मराठी अनुवाद त्यांनीच 'ऐसा ज्ञानसागरू' या नावाने केला आहे. हा इतिहास नीरस पद्धतीचे वर्णन व रूक्ष आकडेवारी असा नसून, त्या सव्वाशे-दीडशे वर्षांत मुंबई शहर आणि मुंबई विद्यापीठ यांची वाढ कशी समांतर होत गेली, ते दोन्ही परस्परांवर कसा इष्ट परिणाम करीत गेले, याचे ते चैतन्यदायी व उद्बोधक वर्णन-विवेचन-विश्लेषण आहे.

अशा या अरुण टिकेकरांनी लोकसत्ता दैनिकात १९९२ ते ९७ या सहा वर्षांत 'तारतम्य' नावाचा साप्ताहिक स्तंभ लिहिला. राजकीय, सामाजिक, साहित्यिक, शैक्षणिक व सांस्कृतिक घटना-घडामोडींच्या निमित्ताने काही मूलभूत मुद्यांकडे लक्ष वेधणारा तो स्तंभ होता. ते स्तंभलेखन थांबवताना त्यांनी लिहिलेल्या शेवटच्या लेखाचे शीर्षक आहे, 'सारे बदल उच्च शिक्षणापासून सुरू होतील, पण...' त्या लेखात त्यांनी आपल्या देशातील उच्च शिक्षणाच्या दूरवस्थेबद्दल चिंता व्यक्त केली आहे. त्यांनतर २० वर्षांनी म्हणजे २०१७ मध्ये त्यांचे 'कालांतर' या शीर्षकाचे पुस्तक आहे. त्याच्या मनोगतात एक वाक्य असे आहे, 'आता जर काही आशा असेल तर ती प्राथमिक शिक्षकांकडूनच!'

तर मुंबई विद्यापीठाचा इतिहास लिहिणाऱ्या टिकेकरांनी उच्च शिक्षण आणि प्राथमिक शिक्षक यासंदर्भात वीस वर्षांच्या अंतराने व्यक्त केलेले मनोगत मननीय आहे. आपल्या शिक्षणव्यवस्थेचा इतका ऱ्हास झालेला आहे की, पुन्हा नव्याने व मुळापासून सुरुवात करावी लागेल, असेही त्यातून सूचित होते.

सारांश, उद्योजक जमशेटजी टाटा बरोबर होते; त्यांना कमी वेळात, कमी श्रमात, कमी खर्चात जास्त परतावा मिळवण्यासाठी त्या काळात तरी उच्च शिक्षण व संशोधन यांना प्रोत्साहन देणे हा मार्ग योग्य वाटला. अझीम प्रेमजीही त्यांच्या जागेवर बरोबरच आहेत; दुर्गम भागातील प्राथमिक शाळा व शिक्षक यांना बळ दिले तर कमी श्रमात व कमी खर्चात जास्तीत जास्त परतावा भविष्यात मिळू शकेल, हा मार्ग त्यांना योग्य वाटतो आहे. आणि सामाजिक-सांस्कृतिक इतिहास लिहिणाऱ्या टिकेकरांनी उच्च शिक्षणातील कोंडी अधोरेखित करून प्राथमिक शिक्षणाकडे लक्ष वेधले आहे.

---

## वर्गणीदार वाचकांसाठी सूचना :

साधनाचे अंक सवलतीच्या दराने पोस्टाद्वारे पाठवण्यासाठी पोस्टखात्याची एक नियमावली आहे. त्यानुसार, रजिस्ट्रेशन करताना प्रत्येक अंकाची किंमत नोंदवावी लागते. त्यामुळे नियमित अंक, जास्त पानांचे विशेष अंक आणि बालकुमार, युवा व मुख्य दिवाळी अंक यांचा एकत्रित विचार करून MRP ६० रुपये अशी नोंदवली होती. मात्र पोस्टखात्याने आता असे कळवले आहे की, रजिस्ट्रेशन करताना नोंदवली आहे तीच किंमत अंकावर असली पाहिजे. त्यानुसार या अंकावर व पुढील सहा अंकांवर किंमत ६० रुपये असेल, मात्र किरकोळ अंकाची विक्री पूर्वीच्याच दराने होत राहील. पुढील दीड महिन्यात नव्याने नोंदणी करून योग्य किंमत अंकावर छापली जाईल. केवळ तांत्रिक पूर्ततेसाठी होणार असलेल्या या गैरसोयीबद्दल दिलगीर आहोत.

**...संपादक, साधना**

डॉ. अभय बंग

# जीवनासाठी शिक्षण कसे निर्माण करावे?

मित्रांनो, याहून प्रत्ययकारी वाक्य मी शिक्षणाबाबत वाचलेले नाही. जीवन हेच शिक्षण! बाकी सगळे कृत्रिम! जीवन हेच शिक्षण असेल, तर गाव किंवा शहर हीच शाळा! गावामधील जो समाज आहे, त्या समाजामध्ये जी जी कर्तव्ये आहेत, कामे चालतात, ते शेती करणे असो, की गायी सांभाळणे असो, की स्वयंपाक करणे असो, सुतारकाम करणे असो, मोबाइल फोन व कॉम्प्युटर दुरुस्ती असो- ही सगळे कर्तव्यकर्मे करता करता आपोआपच शिक्षण होते. गाव हीच शाळा, जीवन हेच शिक्षण. जीवन आणि शिक्षण यांना वेगवेगळे करणे अयोग्य आहे.

आज शिक्षण म्हणजे जणू काही जीवनाची चाललेली केवळ पूर्वतयारी. वस्तुत: शिक्षक, शिक्षणसंस्था व शाळा यांच्या सोयीसाठी बनविलेले हे विभाजन आहे. म्हणून इवान इलीच यांनी १९७० च्या दशकात 'डी-स्कूलिंग सोसायटी' अशी कल्पना मांडली.

**शिक्षणाचे रोगनिदान**

आजचे शिक्षण माणूस घडविणारे आहे का? डॉक्टर असल्यामुळे मला सवय अशी, की कोणत्याही प्रश्नाचा विचार रोगनिदानाने करायचा. रोगनिदान करायचे असले तर आम्ही डॉक्टर रोग्याला आधी काही प्रश्न विचारतो. डोके दुखते का? किती दिवसापासून दुखते? उलट्या होतात का, ताप येतो का? शिक्षणाच्या बाबतीतही काही अस्वस्थ करणाऱ्या प्रश्नांनी मी सुरुवात करतो.

महाराष्ट्रातल्या कोणत्याही गावी जा, गावाच्या बाहेर सगळ्यांत जास्त पाट्या कसल्या दिसतात? तर गावामध्ये चाललेल्या कोचिंग क्लासेसच्या आणि वेगवेगळ्या शैक्षणिक संस्थांच्या! त्यांच्या विद्यार्थ्यांच्या यशाचे मोठे मोठे फलक झळकलेले दिसतात. त्यांच्या यशस्वी विद्यार्थ्यांची भली मोठी छायाचित्रे, अमुक हा आयआयटीत गेला, हा वैद्यकीय शिक्षण घेणार आहे, हा गुणवत्ता यादीत झळकला इत्यादी. गावामध्ये प्रवेश करताना शिक्षणसंस्थांच्या यशाच्या पाट्यांनी स्वागत होते, पण गावात गेल्यावर रस्त्यांवर, चौकांमध्ये, पानठेल्यावर बेरोजगार तरुण मुलांचे रिकामटेकडे जथ्थे दिसतात. हा मोठा विरोधाभास आहे.

शिक्षण हा आज भारतातील सगळ्यांत मोठा उद्योग झाला असावा! शेती सोडली तर सगळ्यांत जास्त तरुण मुले आणि माणसे व्यग्र आहेत, गुंतलेली आहेत; असा भारतातील सगळ्यांत मोठा उद्योग बहुधा शिक्षण हाच असेल. एमपीएससी-यूपीएससीच्या परीक्षांची तयारी करून घेणारे वर्ग जागोजागी चालताना दिसतात. सहज चौकशी केली, तर महाराष्ट्रात पाच ते सहा लक्ष युवक-युवती या परीक्षांची तयारी वर्षानुवर्षे करतच असतात असे कळाले. आई-वडील खेड्यात राहतात. मुलगा जिल्हाधिकारी होण्याचे शिक्षण घेतो आहे, असे त्यांना सांगण्यात येते. हाही बिचारा श्रम करत असतो, अभ्यास

करत असतो. कोचिंग क्लासेस लावतो. वर्षानुवर्षे उत्तीर्ण होत नाही. आणि समजा झाला उत्तीर्ण तरी एमपीएससीची पदे किती भरण्यात येतात? मिळालेल्या माहितीनुसार वर्षाला सर्व मिळून दोनशे-तीनशे पदे भरण्यात येतात. सहा लक्ष मुले तयारी करतात आणि दोनशे-तीनशे मुले नोकरीला लागतात, म्हणजे ०.०५ टक्का! उरलेल्या ९९.९५ टक्के तरुणांचे काय होणार? हजारामध्ये एक या प्रमाणातदेखील संधी नसलेल्या या शिक्षणामध्ये महाराष्ट्रातील पाच लक्ष युवा वर्षानुवर्षे व्यग्र आणि व्यस्त राहावेत?

मध्यंतरी उत्तर प्रदेशच्या पोलीस विभागामध्ये कॅरिअर-निरोप कॅरी करणारा- पोलीस विभागातला पोस्टमन असे समजा, या पदाची जाहिरात निघाली. एकशे शहाऐंशी पदांसाठी चार लक्ष अर्ज आले! त्या चार लक्ष अर्जांमध्ये दोनशे पीएच.डी. होते. हे पाहता, आजच्या शिक्षणामध्ये काहीतरी गंभीर गफलत होते आहे असे वाटत नाही का?

विद्यापीठांनी उत्तीर्ण होण्यासाठी किमान पस्तीस टक्के गुणांची अट ठेवली आहे. (आता कोरोनाकाळात तर सर्वच उत्तीर्ण मानले जातात.) एखादा विद्यार्थी पस्तीस टक्क्यांवर कसा काय उत्तीर्ण होतो? समजा, मी डॉक्टर म्हणून उपचार करतो आहे. माझे फक्त पस्तीस टक्के रुग्ण जगले म्हणजे पासष्ट टक्के मेले, तर तुम्ही माझे काय कराल? तुम्ही मला फाशी द्याल. पण शिक्षणाने, विद्यापीठाने आणि शिक्षण मंडळाने अतिशय सोईस्कररीत्या स्वत:लाच मुळी पस्तीस टक्क्यांवर उत्तीर्ण करून घेतले आहे. 'गोल'- पोस्ट इतकी खाली ठेवलेली आहे, की वस्तुत:, अख्खी शिक्षणव्यवस्था ही पासष्ट टक्के नापास होते आहे. परिणाम काय होतो? जेव्हा अशी आपण 'गोल'- पोस्ट कमी उंचीवर ठेवतो, तेव्हा शिक्षणाचा दर्जा घसरतो. तुम्ही वर्तमानपत्रांत कदाचित आकडेवारी वाचली असेल. भारतीय विद्यापीठातून अभियांत्रिकीचे शिक्षण पूर्ण केलेले फक्त तेरा टक्के इंजिनिअर हे नोकरी-व्यवसाय करण्यासाठी पात्र आहेत. आवश्यक कौशल्ये फक्त तेरा टक्के इंजिनिअर्सना येतात. म्हणजे सत्याऐंशी टक्क्यांना येत नाहीत. मग अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये काय घडते? तरीही ही महाविद्यालये कशी चालतात? ती विद्यार्थ्यांकडून शैक्षणिक शुल्क कसे काय घेतात? विद्यापीठाची परीक्षा असो की बारावीची परीक्षा. त्यांचे प्रमाणपत्र घेऊन मुले बाहेर येतात, तेव्हा त्यांना पुढे कुठल्याही चांगल्या अभ्यासक्रमाला प्रवेश घ्यायचा असेल तर त्यांना त्यासाठी परत दुसऱ्या प्रवेश परीक्षेची तयारी करावी लागते. हे कशाचे लक्षण आहे?

**शिक्षण व्यवस्था - एक फसवणूक?**

भारतात डॉक्टर कमी आहेत. खेडोपाडी डॉक्टर नाहीत. आणि तरी या देशातील जेवढे डॉक्टर एमबीबीएसची परीक्षा देऊन बाहेर पडतात त्यातील अर्ध्याहून जास्त तरुण डॉक्टर्स पुढे वर्ष-दोन वर्षे फक्त पुढच्या शिक्षणासाठीच्या प्रवेश परीक्षेची तयारी करत राहतात! त्यासाठी कोचिंग क्लासेस निघालेले आहेत. गंमत बघा, तो डॉक्टर एमबीबीएस उत्तीर्ण झाला म्हणजे त्याला अक्षरश: रुग्णाच्या जगण्यामरण्याचा निर्णय घेण्याचा, औषधे देण्याचा आणि उपचार करण्याचा अधिकार मिळाला. कायदेशीर आणि शास्त्रीय अधिकार मिळाला. पण, त्याला पदव्युत्तर प्रवेश परीक्षेसाठी कोचिंग क्लास लागतो! म्हणजे त्याला स्वत:ला अभ्यास करता येत नाही, आणि म्हणे तो रुग्णांना वाचवणार आहे! इथे समाजात काम करायला डॉक्टर नाहीत आणि देशातील पन्नास हजार तरुण डॉक्टर फक्त पदव्युत्तर प्रवेश परीक्षेची तयारी करत आहेत!

'द इकॉनॉमिस्ट' हे जगातले अतिशय प्रतिष्ठित असे नियतकालिक! त्यामध्ये मुखपृष्ठ कथा आली. जगभर सध्या असा प्रवाह आहे की, पदवी-पदव्युत्तर शिक्षण झाल्यानंतर इंटर्नशिप किंवा ॲप्रेंटिसशिप करावी लागते. हे जगभरच आहे. माझ्या मनात प्रश्न असा आला, की चार वर्षे व्यावसायिक प्रशिक्षण घेतल्यानंतर जर तुम्हांला अजूनही उमेदवारी (ॲप्रेंटिसशिप) करावी लागत असेल, तर मग चार वर्षे विद्यापीठात काय करीत होता? तसेच पुढचे शिक्षण असो की नोकरी, सगळ्यांसाठी आपण स्पर्धा परीक्षा घेतो. याचा अर्थ काय होतो? याचा अर्थ असा होतो की आपल्या मुलांच्या हातांत असलेली पदवी, मग ती विद्यापीठाने दिलेली असो की परीक्षा मंडळाने दिलेली; तिच्यावर आमचा अविश्वास आहे. उच्च शिक्षणाच्या सर्वोच्च संस्था या विद्यापीठांनी दिलेल्या पदवी प्रमाणपत्रांवर विश्वास ठेवत नाहीत. अशा वेळी माझ्या मनात अतिशय कठोर प्रश्न येतो, की एखाद्या पालकाने किंवा विद्यार्थ्याने ती पदवी देणाऱ्या विद्यापीठावर कलम चारशे वीसची (फसवणुकीची) केस का करू नये? की, तुम्ही मला एक प्रमाणपत्र दिले, पण त्यावर कोणीही विश्वास ठेवत नाही. विद्यापीठ अनुदान आयोगाशी संलग्न

संस्थाही या प्रमाणपत्रावर विश्वास ठेवत नाहीत. याचा अर्थ असा, की विद्यापीठाने मला फसवले!

शिक्षण हा एक प्रचंड मोठा फसवणुकीचा कारभार सुरू आहे का, अशी मला शंका येते. शिक्षणाचा हक्क (राइट टु एज्युकेशन) आहे, पण योग्य शिक्षण (राइट एज्युकेशन) आहे का? जीवनाच्या गरजेनुसार, विद्यार्थ्याच्या कुवती किंवा क्षमतेनुसार आणि आजूबाजूच्या परिसरानुसार शिक्षण आहे का? की कुणातरी अभ्यासक्रम समितीने काल्पनिक अभ्यासक्रम ठरवून त्यानुसार शिक्षण दिले जात आहे?

जगातील सर्वोत्कृष्ट विद्यापीठांपैकी एक हार्वर्ड विद्यापीठ आहे. तसेच वॉशिंग्टनजवळ बाल्टीमोरला मेडिसिन व पब्लिक हेल्थच्या क्षेत्रामध्ये जॉन्स हॉपकिन्स युनिव्हर्सिटी आहे. एके काळी मी या विद्यापीठात शिकलो आहे. नुकतेच, लागोपाठ दोन वर्षांत मला महात्मा गांधीजींवर व्याख्यान देण्यासाठी या विद्यापीठांकडून निमंत्रणे आली. दोन्ही ठिकाणी भाषणापूर्वी मी जवळपास शंभर विद्यार्थ्यांबरोबर तासभर बसलो. ते सगळे मास्टर्स किंवा पीएच.डी. झालेले किंवा होऊ घातलेले विद्यार्थी होते. त्यातील प्रत्येक विद्यार्थ्याला मी विचारले, ''पीएच.डी.चे प्रमाणपत्र घेऊन निघाल्यानंतर काय करणार आहेस?'' तुम्हांला सांगतो, त्या दोनशे विद्यार्थ्यांपैकी फक्त एक अपवाद वगळता, इतर एकशे नव्याण्णव जण म्हणाले, ''आम्हांला माहीत नाही!'' या दोन शिक्षणसंस्था जगातील सर्वोत्कृष्ट शैक्षणिक जागा आहेत. पण तिथे उच्च शिक्षण घेऊन निघणारे म्हणत होते, की या मिळालेल्या शिक्षणाचे काय करणार हे आम्हांला माहीत नाही. ते सगळे अंधारात चाचपडत होते. या शिक्षणाचे करायचे काय हेच त्यांना कळत नव्हते! माझ्या लक्षात आले, शिक्षणसंस्था बरीच माहिती ज्ञान म्हणून देतात, काही कौशल्येही देतात, पण या शिक्षणाचे काय करू याचा हेतू, उद्दिष्ट व ध्येय त्या देऊ शकत नाहीत.

अशा प्रकारच्या एका व्यापक शिक्षण व्यवस्थेत आज आपण आहोत.

ऑक्सफर्ड विद्यापीठाने एक अभ्यास केलेला आहे. वर्ष २०५० मध्ये कामाचे काय होणार? जॉब किंवा काम ही जी संकल्पना आहे, २०५० मध्ये त्याची काय स्थिती राहील? त्यांच्या अभ्यासामध्ये त्यांनी दाखविलेले आहे की,



विज्ञानाची जशी प्रगती होते, तसा समाज बदलतो आहे. यंत्रे येत आहेत, कॉम्प्युटर्स येत आहेत, कृत्रिम बुद्धिमत्ता येते आहे. त्यामुळे २०५० पर्यंत काही कामे, नोकऱ्या नामशेष होतील किंवा अतिशय कमी होतील. तर काही कामे वाढतील. टंकलेखकाचे (टायपिस्टचे) काम संपले आहे. प्रत्येक जण स्वत: वर्ड प्रोसेसिंग करेल. यापुढे वाहनचालकांच्या नोकऱ्या जातील, ड्रायव्हरलेस कार येत आहेत. आर्टिफिशिअल इंटेलिजन्सकडून रोगनिदान सुरू झाल्यावर डॉक्टर कमी होणार. शिक्षकांच्याही नोकऱ्या संपणार. जो शिक्षक वर्गामध्ये निव्वळ माहिती देतो, त्याची गरजच काय? त्यापेक्षा गुगल अधिक चांगले काम करेल. 'खान ॲकॅडमी' नावाची एक व्हर्च्युअल ॲकॅडमी आहे. हिचा संस्थापक हा सलमान खानच, पण अमेरिकेत असलेला भारतीय इंजिनिअर. अमेरिकेत त्याच्या पुतण्यांना गंमत म्हणून घरी फिजिक्स शिकवत होता. पुतण्या म्हणाला, ''चाचा आप बहुत अच्छा सिखाते हो.'' पण त्याची बदली झाली दुसऱ्या गावात, तरी पुतणे त्याच्या मागे लागले की, तुम्हीच शिकवायचे. म्हणून तो त्यांना ई-मेलने किंवा इंटरनेटवर आपले टेप केलेले लेसन्स पाठवायला लागला. हळूहळू त्याची ती शैक्षणिक सत्रे विकसित झाली. त्याची 'खान ॲकॅडमी' झाली. यूट्यूबवर 'टेडेक्स' कार्यक्रमात बिल गेट्सने या सलमान खानची मुलाखत घेतली आहे. सुरुवातीलाच बिल गेट्स जाहीरपणे सांगतो की, माझी दोन्ही मुले खान ॲकॅडमीत शिकतात! आता कल्पना करा, की गुगलवर, यूट्यूबवर अशी सत्रे उपलब्ध होऊ लागली आणि त्यावरून मुले शिकू लागली तर शिक्षक कुठे असणार?

जेथे फक्त तेरा टक्के इंजिनिअर व्यावसायिक कौशल्ये असलेले निघतात, जेथे डॉक्टरांना स्वत: अभ्यास करण्याचा आत्मविश्वास नाही, जेथे पीएच.डी.नंतरही कळत नाही की पुढे आपण काय करणार, जेथे जवळपास कुणीच अनुत्तीर्ण होऊ नये यासाठी किमान गुणांची पातळी अगदी खाली ठेवली जाते, तेथे कुणीही विचारेल, की शिक्षणसंस्था चालतात कोणासाठी? शिक्षणासाठी चालतात, विद्यार्थ्यांसाठी चालतात, की या सर्व शिक्षक-प्राध्यापकांसाठी चालणाऱ्या रोजगार हमी योजना आहेत?

**विद्यापीठे कशासाठी?**

'द इकॉनॉमिस्ट'ची दुसरी मुखपृष्ठ कथा ही आहे, विद्यापीठे चालतात कोणासाठी? त्यांनी अनेक मुलाखती घेऊन निष्कर्ष काढला, की पालकांसाठी विद्यापीठे चालत नाहीत, किंबहुना पालकांना आपल्या मुलांना शिक्षणात काय मिळते- यात स्वारस्य नाही, तर त्यांना मुलांची कटकट घरात नको आहे! पौगंडावस्थेतील मुले फार त्रासदायक असतात. घरात त्रास देण्यापेक्षा विद्यापीठात जा, असे पालकांना वाटते. विद्यार्थ्यांना विद्यापीठातील शिक्षणात स्वारस्य नाही. त्यांना रोमान्स करणे, कँटीनमध्ये जाणे, चित्रपट बघणे यामध्येच स्वारस्य आहे. ते आपले 'गुड अँड हॅपी टाइम'साठी विद्यापीठात जातात. शिक्षकांनाही शिकवण्यात स्वारस्य नाही. त्यांना प्रायव्हेट कोचिंग किंवा संशोधन प्रकल्प यांत रस आहे. शिक्षण पूर्ण केल्याची प्रमाणपत्रे घेऊन जेव्हा तरुण नोकरी मागायला जातो, तेव्हा नोकरी देणाऱ्या कंपन्यांचे काय म्हणणे असते? ते म्हणतात, ''विद्यापीठांनी त्याला काय शिकवले याच्याशी आम्हांला काहीही देणेघेणे नाही. आम्ही एवढेच बघतो की, तो कोणत्या विद्यापीठातून आला. कारण प्रतिष्ठित विद्यापीठात हुशार मुले निवडली जातात हे आम्हांला माहीत आहे. आमचे आयते काम ते करतात. फक्त हुशार मुलांची निवड करण्यासाठी म्हणून आम्ही विद्यापीठाचे प्रमाणपत्र वापरतो.'' असे असल्याने प्रश्न पडतो की विद्यापीठे चालतात कोणासाठी? पूर्ण शिक्षणव्यवस्था चालते कशासाठी, असा प्रश्न आजची अर्थव्यवस्था गंभीरपणे विचारायला लागलेली आहे. म्हणूनच कदाचित शिक्षकांच्या नोकऱ्या संपतील- असा अंदाज ऑक्सफर्डच्या अभ्यासाद्वारे बांधला जात आहे.

एका नावाड्याची गोष्ट, लहानपणी चांदोबामध्ये प्रत्येकाने वाचली असेल. एक मोठा पंडित होता. पंडिताला नदी पार करायची होती. नावाडी त्याला घेऊन निघतो. पंडित त्याला विचारतो, ''का रे, तू तत्त्वज्ञान शिकलास का?'' नावाडी म्हणतो, ''नाही साहेब, तत्त्वज्ञान नाही शिकलो?'' विद्वान म्हणाला, ''म्हणजे तुझे पंचवीस टक्के आयुष्य वाया गेले! गणित तरी शिकलास का?'' ''नाही?'' ''मग अजून पंचवीस टक्के आयुष्य वाया गेले.'' अशी प्रश्नोत्तरे सुरू होती. नावाड्याचे नव्वद टक्के आयुष्य वाया ठरले होते. होडी नदीच्या मध्यावर पोहोचली होती. तेवढ्यात जोराचा वारा वाहू लागला. नदीच्या पात्रात खळबळ वाढली. नाव डोलायला लागली. पंडित म्हणाला, ''आता कसे रे?'' नावाडी म्हणाला, ''तुम्हांला पोहता येते का?'' पंडित उत्तरला,

''नाही, पोहता येत नाही.'' नावाडी म्हणाला, ''मग तुमचे तर शंभर टक्के आयुष्य वाया गेले!''

शिक्षणाच्या बाबतीत आजची अवस्था ही अशी गंभीर आहे. जीवनाच्या वादळामध्ये आपण शिक्षण दिलेले विद्यार्थी टिकू शकत आहेत का, आपण दिलेले शिक्षण कसोटीला पारीत होते आहे का, आणि ते जर होत नसेल तर आपले शिक्षण तर शंभर टक्के वायाच गेले!

विनोबांचे 'शिक्षण विचार' हे पुस्तक वाचले आहे? या पुस्तकासारखे शिक्षणावरील अद्भुत पुस्तक मी वाचलेले नाही. 'शिक्षण विचार' या पुस्तकामध्ये विनोबांनी साठ-सत्तर वर्षांपूर्वी शिक्षणाचे रोगनिदान केलेले आहे. दुर्दैवाने ते आजही लागू आहे, कदाचित जास्तच लागू आहे- ही आपली शोकांतिका आहे. विनोबाजी म्हणतात, ''आपण जीवनाची विभागणी अशी करून टाकली आहे, की आयुष्याची पहिली पंधरा-वीस वर्षे फक्त शिक्षण, शालेय शिक्षण, कॉलेजचे शिक्षण, पण फक्त शिक्षण! त्यात जीवनाला काही संधीच नाही. एकदा ते शिक्षण घेऊन बाहेर पडला आणि जर काही कुठे काम मिळाले तर मग फक्त कमाई आणि कमाईच. तेथेही शिक्षणाचे कामच नाही.'' विनोबा म्हणतात, ''निर्जीव शिक्षण आणि निर्बुद्ध जीवन अशी आपण जीवनाची विभागणी करून टाकली आहे.''

**मन, मेंदू, व मनगटाचे शिक्षण**

मग पर्याय काय? उपाय काय? काही पर्यायी शिक्षण-विचार आहे का? प्रयोग आहेत काय? अनुभव काय आहे?

गांधीजी आणि विनोबा यांनी सुरू केलेल्या शिक्षणपद्धतीला 'नयी तालीम' म्हणतात. मी त्याच शाळेत शिकलो. शिक्षण केवळ शाळेच्या चार वर्गांमध्ये दिलेले पुस्तकी शिक्षण किंवा नुसती माहिती नाही तर 'हेड, हार्ट, अँड हँड्स' - बुद्धी, हृदय आणि हात यांचा विकास करणारे शिक्षण मिळाले पाहिजे. या तिन्हींचा विकास झाला पाहिजे, ही 'नई तालीम'ची एक वैचारिक मान्यता. दुसरे- शिक्षण हे देता येत नाही किंवा घेताही येत नाही, तर शिक्षण हे घडते. विनोबा म्हणतात की, शिक्षण ही काय वस्तू आहे, की जी एकाने दिली आणि दुसऱ्याने ती घेतली? उदाहरणार्थ, जेवण देता येते, पण पोषण देता येते का? स्वयंपाक करणारा जेवण वाढू शकतो, जेवणारा आपल्या हाताने तोंडातही घालू शकतो, पण तोंडात घातलेले पोटात जाते, आतडीत पचते, ते रक्तामध्ये शोषले जाते, ते शरीराला लागते, तेव्हा त्याला आपण पोषण म्हणतो. पोषण देता येत नाही, ते घडते! तसेच शिक्षण देता येत नाही, ते घडते. सभोवतालचा समाज, निसर्ग आणि मी, यांच्या बाबतीत जे प्रत्यक्ष अनुभवजन्य ज्ञान मिळते, त्यातून हे शिक्षण घडते. यातील पुढचे तत्त्व असे की, शिक्षण केवळ अभिजन वर्ग, उच्च वर्ग, बुद्धिजीवी वर्ग यांची मक्तेदारी नाही. गांधींचे तत्त्व असे, की शिक्षण हे सार्वत्रिक व्हायला पाहिजे. खेड्यातील गरिबांतील गरीब आणि वंचितांतील वंचित अशा सर्व मुलांना शिक्षण मिळाले पाहिजे. केवळ मुलांनाच नव्हे, तर प्रौढांनाही आणि तेही आयुष्यभर शिक्षण मिळायला पाहिजे. युनिव्हर्सल एज्युकेशन थ्रुआउट लाइफ!

दक्षिण आफ्रिकेतील फिनिक्स व टॉलस्टॉयवाडी आश्रमामध्ये सत्याग्रहींच्या मुलांना शिकवण्याची जबाबदारी अचानक गांधीजींवर आली. तिथे त्यांचे शिक्षणाविषयीचे विचार आकार घ्यायला लागले. पुढे त्यांनी अहमदाबादला 'गुजरात विद्यापीठ' स्थापन केले. नंतर वर्ध्याला पहिली 'नयी तालीम शिक्षण परिषद' घेतली. त्या प्रसंगी भारतासाठी शिक्षणव्यवस्था कशी असावी या विषयी गांधींजींनी आपले विचार मांडले. त्या विचारांवर आधारित शिक्षणव्यवस्थेला म्हणतात 'नयी तालीम'. मी अनुभवलेले हे नयी तालीमचे शिक्षण कसे होते?

गांधींजींची मान्यता अशी, की 'नयी तालीम' शिक्षणामधून विद्यार्थी आणि शिक्षक दोन्ही स्वावलंबी व्हायला पाहिजेत. अन्यथा ते कायमच सरकारी अनुदानावर अवलंबून राहतील आणि सरकार बदलेल तसे धडे बदलतील. इतिहासातील नायक-खलनायक बदलतील. तसे व्हायला नको असेल तर शिक्षण शासकीय हस्तक्षेपापासून मुक्त व म्हणून स्वावलंबी हवे. त्यासाठी या शाळेमध्ये दररोज तीन तास उत्पादक काम करायला लागायचे. उत्पादक कामामधून शिक्षण मिळायला हवे, हा आग्रह होता. ते कसे घडायचे?

मी आठवीत असताना मला एक शेतीचा तुकडा दिला गेला. या शेतीमध्ये काय पेरायचे, कशी शेती करायची, हे मी ठरवायचे होते. मी माझ्या शेतीत वांगी लावली. पण वांग्याची रोपे काही वाढेनात. मी एका प्रगत शेतकऱ्याकडे गेलो. त्यांना विचारलं. ते म्हणाले, ''झाड वाढायला नायट्रोजन लागते.'' आता नायट्रोजन कुठे मिळते? शिक्षक म्हणाले, ''रसायनशास्त्र वाच.'' नायट्रोजन हे युरियामध्ये

असते हे कळले. युरिया कुठे मिळेल? शेजारी गोशाळा होती. मी गोशाळेतून बादल्या भरून गोमूत्र घेऊन येत असे आणि माझ्या वांग्यांच्या झाडांना टाकत असे. माझे शरीरश्रमही झाले, शरीर बळकट झाले. वनस्पतिशास्त्र व रसायनशास्त्र शिकलो. शेती शिकलो. आपल्याला पडलेला प्रश्न सोडवायला वाचन करणे किंवा तज्ज्ञांचा सल्ला घेणेही शिकलो. शेवटी माझी वांग्यांची झाडे सहा-सात फूट उंचीची झाली! एक वांगे पावणेदोन किलोचे निघाले. शिक्षक म्हणाले, ''बाजारात जाऊन वीक.'' मी बाजारात गेलो विकायला तर कोणीच घेईना. सगळे म्हणाले, ''अहो, पावणेदोन किलोचे वांगे म्हणजे घरी आठवडाभर नुसतीच वांग्याचीच भाजी खावी लागणार!'' शेवटी ते वांगे शाळेच्या मेसमध्ये वापरले. तर माझे शेतीशास्त्र, वनस्पतिशास्त्र, रसायनशास्त्र, मार्केटिंग आणि शेतकऱ्याची अवस्था हे सगळे अनुभवजन्य शिक्षण हे वांग्याची शेती करताना, आठवीमध्ये झाले.

समाजामध्ये जी जी आवश्यक कामे असतात ती तुम्ही करायची. ती करता करता तुमचे शिक्षण घडणार- अशी या मागची मान्यता. जीवनामध्ये, समाजामध्ये जी आवश्यक कामे आहेत, कर्तव्ये आहेत, गरजा आहेत, त्या कुणालातरी पूर्ण कराव्या लागतात. आपल्या समाजाने सोईस्कररीत्या ते काम खालच्या वर्गाच्या लोकांना देऊन टाकले किंवा ते काम करणाऱ्यांना खालच्या दर्जाचे म्हटले. गांधीजींनी आपल्या शिक्षणव्यवस्थेत एका फटक्यात, श्रम करणारा आणि बुद्धिवंत यांच्यातील अंतरच मिटवून टाकले. कर्म आणि शिक्षण यांच्यातील अंतर मिटवून टाकले. ते करताना भारतीय समाजरचनेतील कामानुसार उच्च-नीच श्रेणी हा वर्णभेद, जातिभेद मिटवून टाकण्याची किल्ली त्यांनी आपल्या हाती दिली. समता ही प्रत्यक्ष जगण्यात आणली. आणि हे करताना शिक्षणही मिळाले. ते शिक्षण 'हेड, हार्ट अँड हँड्स' तिन्हींमधून प्राप्त झाले.

**जीवनहेतू उमगला**

समाज म्हणजे काय, हे विद्यार्थ्यांना कळावे म्हणून त्या शाळेचे आम्ही सर्व विद्यार्थी दरवर्षी दहा दिवस भूदान पदयात्रेवर जात असू. खेड्यापाड्यांमध्ये पायी फिरायचे. डोक्यावरती ओझे, थंडीचे दिवस, घोंगडे घेऊन फिरावे लागायचे. रोज पाच-सहा मैल चालत एका नव्या गावात जायचे. दवंडी द्यायची, गावकऱ्यांची सभा घ्यायची. शेतमजुराची गरिबी कशी आहे, म्हणून मग शेतकऱ्याने शेतमजुराला भूमिदान द्यावे, असे आवाहन करायचे. यामागचा क्रांतीचा विचार, सामाजिक समतेचा विचार, शेतकऱ्याचा प्रश्न, भूमिहीन मजुराचा प्रश्न, खेड्यात शेतकरी कसा राहतो, हे सर्व समजण्याची संधी मिळायची. शेवटी आम्हांला कोणा शेतकऱ्याच्या घरी राहावे लागायचे. त्याच्या घरचे अतिशय तिखट जेवण शेतकऱ्याची बायको आम्हांला स्वयंपाक करून खाऊ घालायची. त्याची सवय नसलेले आम्ही तोंड 'सूंसूं' करत पुढच्या गावाला, पुढची पदयात्रा! भारतातील खेडी कशी जगतात याचे कविकल्पित वर्णन नाही, तर ते स्वत:च प्रत्यक्ष जगण्याचा अनुभव, समाजाचा अनुभव देखील या शाळेत मिळायचा!

परिणाम काय झाला? थोडेसे व्यक्तिगत सांगतो. वर्ष १९६३-६४ होते. वयाच्या चौदाव्या वर्षी मी आणि माझा भाऊ अशोक सायकलने चाललो होतो. वर्ध्याजवळच्या पिपरी नावाच्या एका खेड्याजवळून जात होतो. दम घ्यायला थांबलो. माझा भाऊ मला म्हणाला, ''अभय, आपण आता मोठे झालो. आपण जीवनात काय करायचे ते ठरवून टाकू.'' मी म्हणालो, ''हो ठरवून टाकू.'' बाजूला खेडे होते. आम्ही भूदान पदयात्रेतून नुकतेच आलो होतो. आमचे एकमत झाले की, भारताच्या खेड्यांमध्ये शेतकऱ्याची अवस्था फार वाईट आहे. त्या वेळी भारतामध्ये अन्नधान्याची फार कमतरता होती. शेती सुधारली पाहिजे आणि मुले-माणसे आजारी दिसत आहेत. बारकी, रोगीष्ट आहेत. आरोग्य सुधारले पाहिजे. माझा भाऊ मला म्हणाला, ''मी शेती सुधारतो.'' मी म्हटले, ''ठीक आहे, मी भारताचे आरोग्य सुधारतो.'' आता तेरा वर्षांच्या मुलाला समज काय असेल याची कल्पना तुम्ही करू शकता. पण आम्ही दोन्ही भावांनी त्या दिवशी जे ठरवले, आयुष्यभर नेमके तेच केले. माझा भाऊ शेती शिकला. प्रा. स्वामिनाथन यांचा विद्यार्थी झाला. शेती शिकून तो गेली चाळीस वर्षे वर्धा जिल्ह्यामध्ये ज्यांच्याकडे ओलीत नाही अशी शेती कशी करता येईल, याचे प्रयोग करतो आहे. मी डॉक्टर बनून आयुष्यभर खेड्यातल्या आरोग्याचे काम करत राहिलो.

बघा, हार्वर्ड-हॉपकिन्स विद्यापीठांतल्या पीएच.डी. झालेल्यांना अजूनही कळत नाही की, मिळालेल्या शिक्षणाचे काय करू, या जीवनाचे काय करू. पण 'नयी तालीम'मध्ये शिकल्यामुळे मला चौदाव्या वर्षीच माझे

लाइफ मिशन सापडून गेले. ....अँड दॅट मेड ऑल द डिफरन्स!

**गडचिरोली**

आपण शोधत होतो, की सध्याच्या शिक्षणाला पर्याय काय असू शकतो? म्हणून 'नयी तालीम'ची शाळा कशी होती याचे थोडेसे वर्णन केले. याचा पुढे काही उपयोग झाला का?

त्यानंतर चाळीस वर्षांनंतरचा प्रसंग. गडचिरोलीतील बालमृत्यूचे प्रमाण कसे कमी करायचे, हे आव्हान आढळले. त्या वेळी भारतामध्ये दरवर्षी २५ लाख बालमृत्यू होत होते. आम्ही दोन उपाय शोधले. प्रथम- न्युमोनियामुळे होणारे बालमृत्यू कसे कमी करता येतील हे शोधले. आता उर्वरित- सगळ्यांत जास्त म्हणजे निम्मे बालमृत्यू जन्मानंतरच्या पहिल्या एका महिन्यात होत होते. हे नवजात बालमृत्यू कमी करण्यासाठी एक शास्त्रीय पद्धत मी आखली. पुढचा प्रश्न होता की, ही खेड्यांमध्ये अमलात कशी आणायची?

एकोणचाळीस खेड्यांतील एकोणचाळीस बाया निवडल्या. त्या गावागावांतील अर्धसाक्षर बाया होत्या. त्यांना प्रशिक्षण देऊन गावाची बालरोगतज्ज्ञ बनवायचे होते. आता या शिक्षणाचे उद्दिष्ट अगदी स्पष्ट होते, गावातील बालमृत्यू कमी करणे. त्या बाईला काय काय करावे लागणार आहे आणि समाजाची गरज काय आहे, हे अगदी स्पष्ट होते. यावरून तिचा अभ्यासक्रम ठरवला. दुसरे असे, की गावाचा वास्तविक संदर्भ होता. ती ज्या गावात राहते, त्याच गावामध्ये तिला काम करायचे होते. या बायांना शिकवण्यासाठी मी 'नयी तालीम'ची प्रत्यक्ष कर्म करून 'अनुभवातून शिका' ही पद्धती अवलंबिली. दर महिन्याला तीन दिवस ती बाई (तिला आम्ही 'आरोग्यदूत' असे नाव दिले) आमच्याकडे येणार. तिला आम्ही नवजात बाळाच्या काळजी याविषयी एक पायरी सांगणार. आता तिने ते आपल्या गावात जाऊन ते प्रत्यक्ष करायचे. महिनाभर ते केले, की परत पुढचे तीन दिवस ती आमच्याकडे येणार, अजून एक पायरी शिकणार. पायरीपायरीने तिला गावामध्ये गृहभेटी कशा करायच्या, गरोदर बाईला कसे तपासायचे- इथपासून ते नवजात बाळाचे वजन कसे करायचे, आजारपण कसे ओळखायचे, न्युमोनियाचा उपचार कसा करायचा, नवजात बाळाला इंजेक्शन कसे द्यायचे, बाळ जन्माला आले पण श्वासच घेतला नाही, रडलेच नाही तर त्याच्यावर उपचार कसे करायचे- हे सगळे वैद्यकशास्त्र तिला आम्ही तीन-तीन दिवस करत एकूण तीस दिवसांत शिकवले. ते तिने आपल्या गावात खरेखुरे कामात आणले. त्यानंतर भारतातील सगळ्यांत वरिष्ठ दहा नवजात बालरोग तज्ज्ञांकडून आम्ही या बायकांचे मूल्यांकन करून घेतले. त्या तज्ज्ञ समितीचे अध्यक्ष, डॉ. मेहरबान सिंग, जे त्यावेळी एम्स (ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस) दिल्लीमध्ये बालरोग विभागप्रमुख होते, ते म्हणाले- ''गडचिरोलीतील या अर्धसाक्षर पण प्रशिक्षित 'आरोग्यदूत', यांची नवजात बाळांचा उपचार करण्याची क्षमता ही 'एम्स'मधून निघणाऱ्या एमबीबीएस डॉक्टरांपेक्षा जास्त चांगली आहे!''

आम्ही हा जो शिक्षण-प्रयोग केला ते शिक्षण 'नयी तालीम'च होते. कर्म आणि ज्ञान दोन्ही सोबत होते. वीस वर्षे वर्गामध्ये बसून कागदावर शिक्षण व नंतर समाजाची गरज भागवेन, असे विभाजन नाही. कर्म करता करता ज्ञान मिळते, कर्म करण्यातून ज्ञान मिळते, ज्ञानाचे रूपांतर तत्काळ कर्मात होते आणि समाजाची एक गरजही भागते.

पुढे भारत सरकारने एक निर्णय घेतला. गडचिरोलीमध्ये यशस्वी झालेल्या या पद्धतीने बाल आरोग्य सेवा देशातील सर्व गावांमध्ये द्यायची. आम्ही या एकोणचाळीस आरोग्यदूतांना घेऊन जी पद्धत विकसित केली, तीच पद्धत आम्ही भारतातील नऊ लाख 'आशां'साठी वापरून, त्यांनाही माता आणि नवजात बालकाची काळजी कशी घ्यायची हे प्रशिक्षण दिले. गेल्या वर्षी या प्रशिक्षित 'आशां'नी एक कोटी नवजात बालकांना घरोघरी सेवा दिली. 'नयी तालीम' काय चमत्कार करू शकते ते पाहा. हे शिक्षण नुसते एका माणसापुरते नाही, एकोणचाळीस आरोग्यदूतांपुरते नाही, तर त्याचा देशव्यापी प्रयोग होऊ शकला!

**मॅकमास्टरचा प्रयोग**

कॅनडामध्ये एक विद्यापीठ आहे, मॅकमास्टर विद्यापीठ. तेथे एक शैक्षणिक प्रयोग जवळपास गेली तीस वर्षे केला जात आहे. दोन हजार वर्षांपूर्वी युरोपमधे होऊन गेलेल्या हिप्पोक्रेटिस, गेलनच्या काळापासून अगदी सन १९०० पर्यंत वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्यांना मृतदेहांची चिरफाड करून शिक्षण घ्यावे लागत होते. १९००च्या दरम्यान विल्सन ऑस्लर या डॉक्टरने जॉन्स हॉपकिन्समधे वैद्यकीय

विद्यार्थ्यांना मृतदेहाऐवजी प्रत्यक्ष रुग्ण तपासून वैद्यकीय शिक्षण द्यायला सुरुवात केली. तरीही अजून पहिली दीड वर्षे फक्त मृतदेहावरच शिकवतात. त्याला प्री-क्लिनिकल ट्रेनिंग किंवा पूर्वतयारी म्हणतात. हे मृतदेहावर मिळणारे शिक्षण अतिशय मृत असतं. वस्तुत: जिवंत रुग्णांचा उपचार करण्याचं शिक्षण मृतदेहावरून का सुरू करायचं? मॅकमास्टर विद्यापीठाने ही पद्धत बदलली. वैद्यकीय शिक्षणाच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना सरळ रुग्णालयाच्या वॉर्डमध्ये पाठवले जाते. वॉर्डमध्ये जो रुग्ण असेल, त्याचा आजार पाहून त्या संबंधी वाचायचे आणि शिकायचे. त्या रुग्णावर तज्ज्ञ डॉक्टरांसोबत प्रत्यक्ष उपचार करताना अनुभव घेत शिकायचे. त्यानंतर दुसरा रुग्ण, दुसरा आजार. गंमत अशी, की त्यांचे एमबीबीएस तीन वर्षांत पूर्ण होते आणि आपल्याला साडेचार वर्षे लागतात. मी अस्वस्थ होऊन त्यांना विचारले, की तुम्ही सुरुवातीस पूर्ण शरीराची रचना (ॲनाटामी) शिकवत नाही. समजा असे झाले, की डाव्या पायाच्या करंगळीच्या टोकाचे हाड, टर्मिनल फॅलिंग्ज, त्याचा रोगी त्याने न बघितल्यास त्या हाडाची रचना कशी असते हे कदाचित तो कधी शिकणारच नाही, मग त्याचे वैद्यकीय शिक्षण अपुरे राहिले ना? तर त्यांनी मला गमतीशीर उत्तर दिले. म्हणाले, ‘‘या सातशे बेडच्या रुग्णालयामध्ये तीन वर्षे काम केल्यानंतर, त्याला जर डाव्या पायाच्या करंगळीच्या टर्मिनल फॅलिंग्जची एकही केस मिळाली नाही, तर ते शिकण्याची गरजच नाही!’’ मी हेका सोडला नाही. म्हटले, ‘‘तरीपण, डॉक्टरच्या आयुष्यात अचानक अशी एखादी केस आलीच तर?’’ ते म्हणाले, ‘‘हो. असे घडू शकते. पण आम्ही प्रत्येकाला स्वशिक्षणाचे धडे दिले आहेत. तो गरज पडेल तेव्हा वाचू शकतोच की!’’

दुर्दैवाने आपल्या शिक्षणपद्धतीत जे शिकण्याची गरज नाही असे खूप काही अभ्यासक्रमामध्ये असते. आपण दहा-बारा वर्षे जे शालेय शिक्षण देतो, त्यात जीवनात गरज नाही असे बरेच शिक्षण देत असतो. यापेक्षा वेगळे, पर्यायी शिक्षण संभव आहे. ते शिक्षण कसे देता येते, हे मी काही उदाहरणांनी सांगितले. विनोबांनी त्यांच्या ‘शिक्षण विचार’ या पुस्तकामध्ये ‘नयी तालीम’ची तत्त्वे अतिशय उत्कृष्टपणे मांडली आहेत. त्यांचाच माझ्या बुद्धीनुसार विस्तार करून ती आपल्यापुढे मांडतो.

**‘नयी तालीम’चे आधार**

पहिला आधार - शिक्षण कोणाचे? तर हे शिक्षण ‘स्व’चे आहे. हा ‘स्व’ कोण? आपल्या आजच्या शिक्षणपद्धतीमध्ये अशी कल्पना आहे, की हा ‘स्व’ एक रिकामा डबा आहे. त्या रिकाम्या डब्यामध्ये म्हणजे डोक्यामध्ये माहितीचा माल टाकायचा. काही उपयोगी, काही निरुपयोगी. तो माल नीट भरला की नाही याची परीक्षा घ्यायची. ‘नयी तालीम’मधील ‘स्व’ची अशी कल्पना आहे की, हा साक्षात आत्मा आहे! तो स्वयंप्रकाशी आहे. त्यावरचं फक्त झाकण तेवढं शिक्षणाने काढायचं आहे. मायकेल अँजेलो म्हणायचा की, मी मूर्ती घडवत नाही, ती त्या दगडात आधीपासून असते. मी फक्त त्या दगडाचा अनावश्यक भाग काढतो, उरते ती मूर्ती. विद्यार्थ्यांमध्ये भविष्यातील माणूस आजही आहेच. निरुपद्रवी सालपटे बाजूला केली पाहिजेत. शिक्षकाने माळ्याची भूमिका घेतली पाहिजे. माळी बीजामधून झाड काढतो का? मग झाड कुठून येते? ते बीजात असतेच! माळी फक्त त्या झाडाला आवश्यक अशी परिस्थिती निर्माण करतो. झाड स्वत:च वाढते.

नयी तालीमचा दुसरा आधार - स्वत:ला ओळखणे म्हणजे शिक्षण. हे स्वत:ला ओळखणे कसे व्हावे? भारतीय परंपरेत अजून एक शब्द आहे, ‘स्वधर्म’. स्वधर्म म्हणजे समाजामध्ये माझे इतरांच्या प्रति असलेले कर्तव्य. समाजामध्ये स्वधर्म करता करता मला जे शिक्षण मिळते, ते नयी तालीमचे शिक्षण. विद्यार्थ्याला स्वधर्म करण्याची संधी दिली जाते. या शिक्षणप्रक्रियेत कृतिहीन ज्ञान नाही, कृतीसोबत ज्ञान जोडले आहे. स्वधर्माचे कर्तव्यकर्म ज्ञानमय होऊन जाते. येथे ज्ञानही मिळते आणि कौशल्येही. वांगेही वाढते आणि विद्यार्थ्याचे ज्ञानही!

शिक्षणाविषयी एक अतिशय सुंदर वाक्य वाचले. ‘सेल्फ इज लाइक अ रे ऑफ लाइट...!’ ‘स्व’ म्हणजे प्रकाशाचा किरण. भौतिकशास्त्र आपल्याला सांगतं की प्रकाशाचा किरण दिसत नाही. तो कोणत्यातरी अडथळ्यावर पडला, की दृग्गोचर होतो. मी कोण आहे? हा ‘मी’ आपल्याला दिसत नाही. आपण केवळ कल्पना करतो की मी असा आहे, तसा आहे. शिक्षणाद्वारे तो ‘स्व’ मला कळायला पाहिजे. - सेल्फ इज लाइक अ रे ऑफ लाइट. इट इज इन्व्हिजिबल, अन्टिल इट मीट्स अ चॅलेंज, ॲन ऑब्स्टॅकल. देन द सेल्फ बिकम्स व्हिजिबल टु

युवरसेल्फ- शिक्षणामध्ये नेमके असेच घडते. एका सामाजिक आव्हानाला मी सामोरा जातो तेव्हा माझ्यातील क्षमता, माझ्यातील गुण, माझ्या मर्यादा, मला काय करायला आवडते, मला काय करायला जमते, माझा कल काय, माझी ॲटिट्यूड्स काय, माझी कुवत काय- हे सगळे मला दिसू लागते. म्हणून स्वधर्म करता करता, जे 'स्व'विषयी ज्ञान प्राप्त होते ते शिक्षण.

तिसरा आधार – स्वधर्म करायचा कुठे? मी जिथे आहे तिथे! मी जिथे राहतो त्याला गांधींच्या परिभाषेत 'स्वदेश' म्हणतात. हा स्वदेश म्हणजे भारतमाता नाही. तुम्ही ज्या जागेशी बांधलेले आहात, तो समाज, ती जागा, तो निसर्ग, ते गाव, ती भूमी, त्याला स्वदेश म्हणतात. तर, स्वधर्म स्वदेशात करायला पाहिजे. ज्या समाजाचा मी भाग आहे, ज्याचे मी देणे लागतो, तिथे मी माझे कर्तव्यकर्म, म्हणजे स्वधर्म करता करता जे मला स्वत:विषयी ज्ञान प्राप्त होते, ते शिक्षण.

नयी तालीमचा चौथा आधार- या पद्धतीने शिक्षणासोबतच आर्थिक दृष्ट्या स्वावलंबन झाले पाहिजे. कारण स्वावलंबन नसेल तर जीवनामध्ये स्वातंत्र्य टिकू शकत नाही. आर्थिक परावलंबी शेवटी परतंत्रच राहणार. नयी तालीम जेव्हा स्वावलंबन देते, तेव्हा ती स्वातंत्र्यही देते. नयी तालीमद्वारा विद्यार्थ्याला काय शिकायला मिळावे? विनोबांच्या शब्दांत : योग (आत्म-अनुशासन), उद्योग (कर्म कौशल्य) व सहयोग करण्याची सामूहिक वृत्ती मिळावी.

गांधींजींनी ही जी शाळा सुरू केली होती, या शाळेमधील पहिले शिक्षक रवींद्रनाथ टागोरांनी पाठवलेले होते. न्यूयॉर्कमध्ये पीएच.डी. झालेले व रवींद्रनाथांचे दहा वर्षे वैयक्तिक सचिव असलेले आर्यनायकम व संस्कृतमध्ये पदव्युत्तर शिक्षण झालेल्या त्यांच्या पत्नी आशादेवी येथे शिक्षक म्हणून आले होते. अशी ही शाळा गांधींजींच्या प्रत्यक्ष नजरेखाली, त्यांच्या आश्रमाच्या बाजूलाच विकसित झाली. माझी आई त्या शाळेची पुढे मुख्याध्यापिका होती. शोकांतिका अशी, की स्वातंत्र्यानंतर त्या क्रांतिकारी प्रयोग असलेल्या शाळेला महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण विभागाची मान्यता नव्हती. नयी तालीम ही शिक्षकांना परवडण्यासारखी पद्धत नव्हती. त्यांचे स्वत:चे शिक्षण झाले होते औपचारिक व्यवस्थेमध्ये. त्यात कर्मातून शिक्षण कुठे होते? त्यामुळे नयी तालीम शिक्षकांना पेलवली नाही. ती स्वतंत्र होती. म्हणून सरकारलाही पेलवली नाही. शिक्षण विभाग म्हणायचा, ही असेल गांधीजी, टागोर यांची शाळा; पण आमच्या अभ्यासक्रमाच्या चौकटीत ती नाही, म्हणून मान्यता देता येणार नाही. एके दिवशी ती शाळा बंद झाली.

अनेक वर्षांनंतर 'आनंद निकेतन विद्यालय' म्हणून सेवाग्राम येथे ती शाळा पुनरुज्जीवित करण्यात आलेली आहे. पण तोपर्यंत त्या शिक्षणपद्धतीचा जनक खूप पुढे गेला होता.

**जीवन हेच शिक्षण**

पाच-सहा वर्षांपूर्वी सेवाग्रामला एका बैठकीसाठी गेलो होतो. सकाळी नारायणभाई देसाई यांच्याबरोबर आश्रमाच्या बाजूच्या रस्त्याने फिरायला निघालो. नारायण देसाई हे गांधीजींचे पुत्रतुल्य सचिव महादेव देसाई यांचे पुत्र. गांधीजींच्या आश्रमात त्यांच्या अंगाखांद्यांवर वाढलेले. पुढे ते 'नयी तालीम'चे मोठे आचार्य झाले. गांधीविचारांचे प्रमुख व्याख्याते झाले. ते माझे गुरू होते. त्या दिवशी त्यांनी मला एक आठवण सांगितली. म्हणाले, ''मी अठरा-वीस वर्षांचा होतो. मला वाटले की, आता सेवाग्राम सोडावे. गांधींच्या छायेत मी वाढतो आहे. वाढ होणार नाही. म्हणून मी बापूंना म्हटले की, बापू मुझे सेवाग्राम छोडना है। – तर बापू म्हणाले, बहोत अच्छा! जरूर छोडो! तो फिर क्या करोगे? कल सुबह मेरे साथ घूमने चलो.'' नारायणभाई दुसऱ्या दिवशी सकाळी गांधीजींबरोबर फिरायला निघाले. गांधींनी विचारले, ''नारायण, तुम्हें क्या करना है?'' नारायणभाई म्हणाले, ''मुझे नयी तालीम का काम करना है।'' गांधी म्हणाले, ''बहुत अच्छे!! लेकिन ये जो मेरी नयी तालीम स्कूल है, ऐसा नहीं करना!'' नारायणभाईंना काही समजले नाही! गांधींनी निर्माण केलेली नयी तालीम शाळा आणि स्वत: म्हणत आहेत की, अशी नयी तालीम शाळा करू नकोस. चकित होऊन त्यांनी विचारले, ''बापू आप क्या कह रहे हैं?'' गांधीजींचे पुढचे वाक्य अजूनच चकित करणारे होते, म्हणाले, ''मेरा बस चले तो इस स्कूल को जला के राख कर दूँ।''

नारायणभाईंनी ही घटना सांगितली त्या रात्री मला झोप आली नाही. माझ्यासाठी हा भूकंपाचा अनुभव होता. दुसऱ्या दिवशी मी नारायणभाईंना पुन्हा भेटलो. विचारले, ''मला काही कळले नाही, गांधीजी असे का म्हणाले?''

स्वत:च निर्माण केलेली शाळा आणि स्वत:च म्हणतात की, ‘इसको जलाके राख कर दूँ।’ नारायणभाईंनी स्पष्टीकरण दिले, की गांधी हा इतक्या झपाट्याने विकास करणारा डायनॅमिक माणूस होता. १९३७ मध्ये त्यांनी या शाळेची कल्पना मांडली. पण पुढे नऊ वर्षांत ती शाळा विकसित होत असताना गांधींची कल्पना त्या शाळेच्या किती तरी पुढे गेली होती. ती शाळा त्या गतीने पुढे जात नव्हती म्हणून गांधींना ती शाळादेखील मागासलेली वाटायला लागली. जी शाळा त्या वेळच्या शिक्षणप्रक्रियेमध्ये किती तरी पुढे होती आणि आजही पुढे राहील, पण गांधीजी त्यापुढे निघून गेले होते.

**मग गांधीना काय हवे होते?**

नारायणभाईंनी मला सांगितले– गांधींचे म्हणणे होते, की गाव हीच शाळा व्हायला पाहिजे. वेगळी कोणती शाळा नावाची कुंपणभिंतीतील वास्तूच अस्तित्वात राहायला नको! हा क्रांतिकारी विचार होता. त्या काळामध्ये ‘नयी तालीम’ची व्याख्या अशी केली जायची की जीवनासाठी, जीवनाद्वारे शिक्षण म्हणजे नयी तालीम. विनोबा ‘शिक्षण विचार’मध्ये लिहितात, की ही व्याख्यादेखील मला मंजूर नाही. कारण जीवनाचे शिक्षण, जीवनाद्वारे शिक्षण यामध्ये अजूनही द्वैत आहे. जीवन वेगळे व शिक्षण वेगळे आहे. माझी व्याख्या आहे, ‘जीवन हेच शिक्षण!’

मित्रांनो, याहून प्रत्ययकारी वाक्य मी शिक्षणाबाबत वाचलेले नाही. जीवन हेच शिक्षण! बाकी सगळे कृत्रिम! जीवन हेच शिक्षण असेल, तर गाव किंवा शहर हीच शाळा! गावामधील जो समाज आहे, त्या समाजामध्ये जी जी कर्तव्ये आहेत, कामे चालतात, ते शेती करणे असो, गायी सांभाळणे असो, स्वयंपाक करणे असो, सुतारकाम करणे असो, मोबाइल फोन व कॉम्प्युटर दुरुस्ती असो– ही सगळे कर्तव्यकर्मे करता करता आपोआपच शिक्षण होते. गाव हीच शाळा, जीवन हेच शिक्षण. जीवन आणि शिक्षण यांना वेगवेगळे करणे अयोग्य आहे.

आज शिक्षण म्हणजे जणू काही जीवनाची चाललेली केवळ पूर्वतयारी. वस्तुत: शिक्षक, शिक्षणसंस्था व शाळा यांच्या सोयीसाठी बनविलेले हे विभाजन आहे. म्हणून इवान इलीच यांनी १९७० च्या दशकात ‘डी–स्कूलिंग सोसायटी’ अशी कल्पना मांडली. ‘शाळामुक्त समाज’. समाजातून शाळा रद्द केल्या पाहिजेत. एव्हरेट राइमर तर त्याही पुढे गेला. सत्तरच्या दशकात त्याने पुस्तक लिहिले, ‘स्कूल इज डेड!’– शाळा मेली आहे. पण ती काही मेली नाही! या शिक्षणव्यवस्थेची मुळे पक्की रुतलेली आहेत.

माझ्या शिक्षक मित्रांनो! आजची ही शिक्षणपद्धती शिक्षणापासून असलेली किमान अपेक्षाही पूर्ण करीत नाही असे निष्कर्ष असलेले पाहणी अहवाल आपण अधूनमधून वाचतो. जर किमानदेखील घडत नसेल, तर या शिक्षणव्यवस्थेत गतीने परिवर्तन करण्याची, अगदी क्रांती करण्याची गरज आहे. ते क्रांतिकारी चिंतन गांधीजींनी या देशासाठी करून ठेवले आहे. त्यांनी त्याचे प्रयोगही केले. त्याचे मॉडेल्सही निर्माण केले. स्वतः गांधीजी त्याही पलीकडे जाऊ इच्छित होते.

आता आपल्याला इंटरनेट, गुगल, ॲप्स आणि मोबाइलमुळे निव्वळ माहितीसाठी शिक्षण घेण्याची गरजच उरलेली नाही. माहिती कशी शोधायची याचे शिक्षण पाहिजे. माहिती नको, माहिती हे ओझे आहे. म्हणून शिक्षणामध्ये नव्या क्रांतीची गरज आहे किंवा ती येऊ घातली आहे. ती क्रांती जर आली नाही तर विद्यार्थी बरबाद होतीलच; पण शिक्षकही बरबाद होतील. कारण ते लवकरच आउटडेटेड होणार आहेत. तुम्ही विद्यार्थ्यांना वर्गात बसण्याची जबरदस्ती करणार असाल तर ती त्यांच्यासाठी कारावासाची शिक्षा ठरेल. ते विद्रोह करतील. करत नसतील तर त्यांनी करावा.

कोरोना विषाणूने एक उपकार केला. शाळा न भरता शिक्षण द्यायला भाग पाडले. आपण ते रडतरडत, मजबुरी म्हणून केले. वस्तुत: शालाविरहित शिक्षणाचे प्रयोग करण्याची, नवीन शिक्षणव्यवस्था निर्माण करण्याची ती एक संधी आहे. एवीतेवी शाळा भरू शकत नव्हत्या. मोबाइल फोनचा वापर करून शाळेचा तोच अभ्यासक्रम विद्यार्थ्यांच्या माथी मारायच्या ऐवजी भारतातील दहा कोटी विद्यार्थ्यांना जीवन जगता जगता शिक्षण आपल्याला आखता येईल.

आपल्याला शिक्षणात एका क्रांतीची गरज आहे. जीवन हेच शिक्षण, गाव ही शाळा आणि विश्व ही प्रयोगशाळा व्हायला हवी. त्याहीपुढे जात मी म्हणेन, ‘‘विश्व ही शाळा आणि ‘स्व’ही प्रयोगशाळा व्हायला हवी.’’

**डॉ. अभय बंग,** गडचिरोली

search.gad@gmail.com

(‘मन:शक्ती केंद्र’, लोणावळा येथे झालेल्या शिक्षण परिषदेत केलेल्या बीजभाषणाचा विस्तार करून हा लेख लिहिला आहे.)

श्रुती तांबे

# गेल ऑम्वेट : दास्याच्या तुरुंगाची किल्ली शोधणारी संशोधक

एक व्यक्ती म्हणून गेल ऑम्वेट अतिशय साध्या होत्या. माणूस म्हणून सहजपणाने मित्र भावाने समोरच्याचे ऐकून घेणे, कार्यकर्त्यांची, वंचितांची दखल घेणे आणि संशोधनातून त्या प्रश्नांची अमूर्त मांडणी करणे त्यांच्या आयुष्याचा अंगभूत भाग होते. ज्या काळी फार कमी विचारवंत आणि अभ्यासक समाजात मिसळून सामान्यांचे प्रश्न ऐकून त्यावर लिहीत असत, त्या काळात गेल यांनी भारतीय समाजातील विषमता आणि शोषण यांचे विश्लेषण जागतिक पातळीवर पोहोचवले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील समाजशास्त्र विभागात गेलमॅडम दोन वर्षे प्रपाठक म्हणून कार्यरत होत्या. त्या संपूर्ण कालखंडात आपल्या व्यासंगात बुडालेल्या, आपल्या खोलीत शांतपणे बसून वाचन आणि लिखाण करणाऱ्या, भेटायला आलेल्या कार्यकर्त्यांसोबत गंभीर चर्चा करणाऱ्या– बरेचसे ऐकून घेणाऱ्या अशा गेल ऑम्वेट या डोळ्यासमोर आजही येतात.

प्रा. गेल ऑम्वेट यांच्या जाण्याने महाराष्ट्रातील क्रियाशील विचारवंतांच्या उज्ज्वल परंपरेतील एक महत्त्वाची व्यक्ती आपल्यातून निघून गेली आहे. वंश, लिंगभाव, वर्ग, जात आणि वांशिकता यांपैकी कोणत्याही आधारावर लादलेले दास्य झुगारून दिले पाहिजे, हा आग्रह त्यांच्या लिखाणातून सातत्याने प्रतीत होतो. त्यांचा वैचारिक वारसा केवळ जपणेच नव्हे, तर पुढे चालवणे हीच त्यांना अकादमिक अभ्यासक आणि कार्यकर्त्यांनी वाहिलेली श्रद्धांजली ठरेल.

ऐतिहासिक अभ्यासपद्धती वापरून जातीच्या उगमापासून ते गुलामगिरीविरुद्धचे विद्रोह उभे करणाऱ्या आंदोलनांपर्यंतचा जातीच्या अभ्यासाचा परीघ त्यांनी ओलांडला. डॉ. श्री. व्यं. केतकर आणि डॉ. आंबेडकरांनी गेल्या शतकात अमेरिकेतील अव्वल दर्जाच्या विद्यापीठात जातीचा उगम आणि जातिसंस्थेचे स्वरूप याविषयी अत्यंत मूलगामी असे संशोधन करून ते ग्रंथरूपाने प्रसिद्ध केले होते. त्याही पूर्वीपासून महाराष्ट्रातील विचारविश्वात जातिसंस्था आणि त्यातून निर्माण होणारी विषमता याविषयीच्या मंथनाची परंपरा फार मोठी आहे. बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड यांनी मदत केल्यामुळे, उत्तेजन दिल्यामुळे लिहिले गेलेले अनेक ग्रंथ, तसेच उभ्या राहिलेल्या अनेक संस्था ह्यातून जातिसंस्थेचे स्वरूप, जातीय भेदभावाच्या स्वरूपाविषयीची चर्चाही मोठ्या प्रमाणावर घडत होती. राजर्षी शाहू महाराजांचे अनेक निर्णय, त्यांनी सुरू केलेल्या अनेक योजना यातून जातिभेद कमी करण्यासाठीचे प्रयत्न प्रत्यक्ष व्यवहारात करता येतात, हे दिसून आले. त्यासोबतच विठ्ठल रामजी शिंदे यांचे लिखाण व कार्य मूलगामी स्वरूपाचे होते. असे असले, तरी अकादमिक वर्तुळात मुंबई विद्यापीठाच्या स्थापनेपासून जातिसंस्थेचा उगम आणि स्वरूपाविषयी ज्या प्रकारची चर्चा झाली, त्या चर्चेत महाराष्ट्रातील सामाजिक मंथनाशी

फारसा संबंध दिसून आला नाही. या पार्श्वभूमीवर १९७० च्या दशकात गेल ऑम्वेट यांनी महाराष्ट्रात येऊन ब्राह्मणेतर चळवळीचा अभ्यास गावोगाव हिंडून करण्यास सुरुवात केली, हे नोंदवण्याजोगे आहे. सत्यशोधक समाज आणि त्यानंतरचे इतर जातिसंस्थेविषयीच्या विद्रोहाचे प्रवाह यांचे त्यांनी साकल्याने परीक्षण केले. त्याविषयीची मांडणी त्यांनी परिश्रमपूर्वक संशोधन साहित्याचा विशेषतः गावोगाव विखुरलेल्या ऐतिहासिक साधनांचा बारकाईने अभ्यास करून केली.

एलिनॉर झिलीएट या अमेरिकन विदुषी महाराष्ट्रातील पूर्वाश्रमीच्या अस्पृश्यांच्या विद्रोहावर सातत्याने संशोधन करत होत्या. त्यांच्याशी गेल ऑम्वेट यांचा संपर्क आल्यानंतर त्यांनीही महाराष्ट्रातील जातदास्याच्या शृंखला तोडणाऱ्या विविध चळवळी आणि विद्रोहाचे प्रवाह यांच्याविषयीचा अभ्यास सुरू केला.

प्राध्यापक गेल ऑम्वेट यांच्या लिखाणावर मार्क्सवादी विचारपद्धती आणि संशोधन पद्धतींचा खोलवर ठसा असला तरी विशेषतः पश्चिम महाराष्ट्रातील वासाहतिक समाजातील सांस्कृतिक बंड या त्यांच्या अतिशय गाजलेल्या पुस्तकांमध्ये त्यांनी अनेकदा सर्जनशीलपणे नव्या साधनांचा अभ्यास करताना वेगळी परीदृष्टी स्वीकारलेली दिसते. हा अभ्यास करताना १९७० आणि ७१ मध्ये ऑम्वेट यांनी महाराष्ट्रातील अनेक खेड्यांना- गावांना-शहरांना भेटी देऊन लहानमोठे कार्यकर्ते, पुढारी, विचारवंत, अभ्यासक, पत्रकार व लेखक यांच्या मुलाखती घेतल्या. जुन्या वृत्तपत्रांच्या फायली, ग्रंथ, इतिवृत्ते, मासिके- विशेषतः मुकुंदराव पाटलांसारख्यांकडे असलेला सत्यशोधक समाजाचा इतिहास, वेगवेगळ्या कार्यकर्त्यांच्या घरी असणारी मूळ कागदपत्रांचा अत्यंत नम्र व गंभीर अभ्यासक म्हणून त्यांनी अभ्यास केला १९७३ मध्ये हा पदवीसाठीचा अभ्यास त्यांनी पूर्ण केला. तरीही भारतातील शोषितांचे प्रश्न आणि शोषणमुक्तीचे लढे हा त्यांच्या आजीवन कळकळीचा आणि आस्थेचा महत्त्वाचा विषय राहिला.

त्याचबरोबर अमेरिकेतील विद्यार्थिदशेत त्यांनी ज्या पद्धतीने वंशभेदाविरुद्धच्या व वर्ग विषमतेविरुद्धच्या लढ्यात भाग घेतला होता त्याचा परिणाम म्हणून प्राध्यापक गेल ऑम्वेट या कायमच चळवळीतील, आंदोलनातील वेगवेगळ्या सर्वसामान्य कार्यकर्त्यांच्या व गावपातळी, तालुका पातळीवरील समाजपरिवर्तनासाठी आयुष्य वेचणारे यांच्या भागीदार राहिल्या. त्या एक पोशाखी विचारवंत, संशोधक म्हणून समाजात मिसळल्या नाहीत; तर त्यांची भूमिका भागीदाराची राहिली. समान भागीदारीची भूमिका घेण्यामध्ये एका पातळीवर अर्थातच त्यांची स्त्रीवादी जाणीव आणि स्त्रीवादी विचारांची असणारी बांधिलकीही होती.

**जन्म आणि पार्श्वभूमी**

गेल ऑम्वेट यांचा जन्म अमेरिकेतल्या मुरलेल्या भांडवलशाही राज्यांऐवजी कामगारांच्या हक्कांच्या बाजूने असलेल्या राज्यात झाला. त्यांचे आईवडील कामगारांच्या बाजूचे, आर्थिक विषमतेला विरोध करणारे असे होते. त्यामुळे शालेय आणि महाविद्यालयीन काळापासूनच ही वैचारिक पार्श्वभूमी त्यांच्या व्यक्तित्वाची पायाभरणी करणारी ठरली. अमेरिकेतील पुरोगामी, समतावादी कामगार आणि कृष्णवर्णीयांच्या न्याय्य हक्कांचा विचार करणाऱ्या परंपरेचा त्या विद्यार्थिदशेपासून भारतात येण्याआधीच एक भाग झालेल्या होत्या.

दुसऱ्या महायुद्धाच्या शेवटी अमेरिकेने जपानवर टाकलेले अणुबॉम्ब आणि व्हिएतनाम युद्धातील एकतर्फी हिंसा, अमेरिकेची साम्राज्यवादी आणि युद्धखोर, आक्रमक, राष्ट्रवादी मानसिकता याची जगभर चर्चा सुरू होती. व्हिएतनाम संपल्यानंतर खुद्द अमेरिकन तरुणांचे बळी गेल्याने अमेरिकेतही युद्धखोरीविरोधी वातावरण निर्माण झालेले होते. १९६०च्या दशकात अमेरिकेची जगभर छी:थू झाली होती. एक खुल्या विचाराचा कामगारवादी समतावादी न्यायाची बाजू घेणारा प्रवाह अधिक प्रभावशाली होता. याच विचारप्रवाहाचे फलित म्हणजे जगभर आज कार्यरत असलेले गेल ऑम्व्हेट यांच्या आणि नंतरच्या पिढीतील विविध अमेरिकन सामाजिक शास्त्रज्ञ.

म्हणूनच १९६८-१९७० च्या दशकात एकीकडे १९६८ च्या विद्यार्थिविद्रोहाची पार्श्वभूमी होती; तर दुसरीकडे भांडवलशाही समाजातील तरुण श्रीमंत देशांतील विषमतेच्या दरीवर आसूड ओढत होते. महाविद्यालयांवर बहिष्कार टाकत होते. जगभरच सर्व प्रकारच्या विषमताविरोधाचे वातावरण होते. विद्रोही गाणी, मोर्चे, तरुणांचे विविध प्रकारचे बंड फ्रान्स, अमेरिका, कॅनडा गाजवत होते. प्रस्थापित आर्थिक हितसंबंध, जातीय हितसंबंध, वांशिक वर्चस्व ह्याविषयी संताप खदखदत होता. अकादमिक वर्तुळातही ह्या प्रवाहांचे जिवंत तरंग एलिनॉर झिलीएट यांसारख्या विद्वानांच्या कार्यातून, संशोधनातून,

अध्यापनातून उमटत होते आणि तेव्हा अमेरिकेने आपल्या साम्राज्यवादी, आक्रमक राष्ट्रवादाच्या कोशातून बाहेर येऊन तिसरे जग पाहिले पाहिजे, हा विचार सतत मांडला जात होता. या विचारांच्या प्रभावामुळे महाविद्यालयीन विद्यार्थी तिसऱ्या जगात अभ्यासाला पाठवायला हवेत, असे प्रागतिक विचारांच्या विचारवंतांचे जसे मत होते, तसेच ते अमेरिकन राजदूत आणि मुत्सद्द्यांचेही होते. अमेरिकेची घसरलेली जागतिक लोकप्रियता पुन्हा मिळवण्याच्या प्रयत्नांचा एक भाग होता.

**अकादमिक विश्व आणि सामाजिक आंदोलनातील सहभाग**

स्वत:च्या लष्करी सामर्थ्याच्या दुरभिमानातून अमेरिकेने व्हिएतनाम युद्धाचे दु:साहस केले खरे. परंतु सामान्य शेतकरी जनतेने अमेरिकन सैनिकांना सळे की पळो करून सोडले. व्हिएतनामला जवळजवळ उद्ध्वस्त करून अमेरिकेने तो देश सोडला, परंतु तरुण अमेरिकन सैनिकांचे बळी देऊनच. त्यामुळेच त्या युद्धानंतर उदारमतवादी आणि मानवतावादी विचारप्रवाहाने अमेरिकेतील अकादमिक जगात आणि विचारवंतांच्या जगात प्रभाव टाकला. युद्धखोरी आणि हिंसकपणाविषयीच्या पश्चात्तापातून अमेरिकन समाजातील विचारवंतांनी, पत्रकारांनी, शिक्षकांनी, संशोधकांनी आपण स्वत:त बदल केले पाहिजेत, ही भूमिका सातत्याने घेतली. यातूनच मग अमेरिकेतील सुप्रसिद्ध विद्यापीठांनी आपले तरुण विद्यार्थी तिसऱ्या जगातील आयुष्य समजून घेण्यासाठी पाठवायला सुरुवात केली.

१९७० च्या या काळात परिवर्तनाच्या विचारांनी भारलेल्या काळात गेल कॉलेजमध्ये शिकत होत्या. या कार्यक्रमांतर्गत गेल महाविद्यालयामार्फत प्रथम १९७० च्या दशकात भारतभेटीवर आल्या. या भेटीतच त्यांची भारतातील मुक्तिदायी परंपरा, सामाजिक विषमतेला विरोध करणाऱ्या व्यक्ती, संघटना, विचारप्रवाह यांच्याशी ओळख झाली आणि त्यानंतर त्या जरी अमेरिकेला परत गेल्या, तरी या प्रवाहाविषयीचे चिंतन, मनन, लेखन यात आजीवन रमून गेल्या. त्यापुढे समाजशास्त्रात एम.ए. केल्यानंतर त्या जेव्हा मुंबई विद्यापीठातील हे काय चर्चासत्रात सहभागी झाल्या. तो त्यांचा निबंध लक्षवेधक आहे. एम.ए. झालेली अत्यंत हुशार अभ्यासक तरुणी तिसऱ्या जगातील खेड्यांविषयी समाजशास्त्रातले सिद्धांत वापरून सजगपणे लिखाण करते, हे नोंद घेण्यासारखे आहे.



१९८०च्या दशकापासूनच मूलगामी अशा जातीच्या विवेचनापेक्षा अगदी वेगळे आणि काहीसे वरवरचे अभ्यास अकादमिक वर्तुळात अभ्यासले जात असताना गेल यांनी नव्या काळाला अनुसरून मूलभूत स्वरूपाचे प्रश्न विचारले. त्या काळी एक तर जात हे एक केवळ सामाजिक विषमता निर्माण करणारी संरचना म्हणून पाहिली जाई. किंवा ते भारताचे सांस्कृतिक संचित आहे, ती एक सांकेतिक व्यवस्था आहे, असा दुसरा प्रवाह होता. अशा वेळी जात ही भौतिक पातळीवर भेदभाव निर्माण करणारी व्यवस्था आहे, हे जमीनमालकी आणि जातीच्या परस्परसंबंधातून त्यांनी उलगडून दाखवले. त्याचबरोबर स्त्रियांच्या समस्यांचा विचार एक तर सुटा सुटा किंवा व्यवस्थेचे बळी ह्या प्रकारे केला जाई.

**खाजगी आणि सार्वजनिक जीवनातील विषमताविरोध**

भारतातील आणीबाणीनंतर गेल ऑम्वेट या भारत पाटणकर यांच्याशी विवाहबद्ध होऊन काही वर्षांनी भारतातच स्थायिक झाल्या. सांगली जिल्ह्यातील कासेगाव येथील स्वातंत्र्यलढ्याची पार्श्वभूमी असलेल्या क्रांतिवीर पाटणकरांच्या घराचा एक भाग होऊन राहू लागल्या. भारत पाटणकरांसोबत त्यांनी श्रमिक मुक्ती दलाची स्थापना केली. वर्गीय विषमता, जातीय भेदभाव व लिंगभावावर आधारित विषमतेला विरोध करणारे कार्य उभारले. अनेक तरुण कार्यकर्त्यांची बौद्धिक व वैचारिक जडणघडण केली. शेकडो

सत्याग्रह, मोहिमा, आंदोलने यात सहभाग घेतला. फुलेविचार, बहुजन समाजाच्या जगण्याचे ताणेबाणे आणि ब्राह्मणेतर चळवळीच्या वारश्यातून आलेले आगळे, क्रांतिकारी वैचारिक धन त्यांना इंदूताईंच्या रूपाने अनुभवता आले. अशा तऱ्हेने त्यांचे सार्वजनिक जीवन आणि खाजगी जीवनही विषमताविरोधाला वाहिलेले होते.

**संशोधन व पुस्तके**

जमीनधारणा आणि जातिव्यवस्था यांमध्ये कसा परस्पर संबंध आहे आणि त्यामुळे जातीय विषमता व वर्गीय विषमता एकत्रितपणे कशी काम करते, हे अनेक लेखांतून त्यांनी सप्रमाण दाखवून दिले होते. दलित व्हिजन्स ही त्यांची १९७५ मधील पुस्तिका ही एका अर्थाने दलित विचार-व्यवहाराच्या भविष्यकालीन प्रवासाचा मार्ग दाखवते. 'व्हायलन्स अगेन्स्ट विमेन - न्यू थिअरीज अँड न्यू मूव्हमेंट्स इन इंडिया १९९१'- १९९४ मध्ये प्रसिद्ध झालेले 'दलित्स अँड डेमोक्रॅटिक रेव्होल्युशन' हे त्यांचे आणखी एक महत्त्वाचे पुस्तक. 'ग्रोइंग अप इन डेमोक्रॅटिक इंडिया - अ दलित ऑटोबायोग्राफी' या पुस्तकाचा त्यांनी अनुवाद केला होता. भारत पाटणकर यांच्या सोबत तुकोबांच्या अभंगांचा त्यांनी अलीकडे इंग्रजीत अनुवाद केला. त्यासोबतच 'सीकिंग बेगमपुरा' हे एक अत्यंत वेगळे, अत्यंत प्रेरणादायी असे पुस्तक त्यांनी २००० नंतरच्या काळात लिहिले. २०१९ पर्यंत विविध चर्चासत्रांमध्ये बीजभाषण किंवा समारोपाचे महत्त्वाचे भाषण त्या करत होत्या. या सोबतच महाराष्ट्रातील विद्रोही सांस्कृतिक चळवळ सत्यशोधक चळवळ याचा त्या अखेरपर्यंत भाग राहिल्या.

**सामाजिक आंदोलनातील भागीदार**

एक कार्यकर्ता समर्पण भावनेने समाजपरिवर्तनासाठी निष्ठावंतपणे कसे प्रयत्न करतो आणि काय काय करू शकतो, याचे जिवंत उदाहरण म्हणजे गेल ऑम्व्हेट यांचे जीवन, लिखाण आणि चळवळीतील सहभाग. ह्या लांबलचक प्रवासाची सुरुवात अमेरिकेतील प्रसिद्ध विद्यापीठातील पीएच.डी.ची विद्यार्थिनी म्हणून झाली. १९७०-७१ मध्ये महाराष्ट्रभर फिरून त्यांनी सत्यशोधक चळवळीची साधने अभ्यासली. आनुषंगिक ब्राह्मणेतर चळवळीची अस्सल ऐतिहासिक साधने तपासणे, अभ्यासणे हे अत्यंत कष्टपूर्वक, चिकाटीने आणि तळमळीने त्यांनी केले. समाजाकडून दुर्लक्षित राहिलेल्या महाराष्ट्रातील जातीय विषमता, वर्गीय विषमता आणि स्त्रीपुरुषांतील विषमतेवरील मूलगामी असे फुलेविचार आणि सत्यशोधकी प्रवाहातील साहित्य त्यांनी कष्ट करून प्रकाशात आणले, हे त्यांचे महत्त्वाचे कार्य. ते करताना मुलाखती घेण्याचा भाग असो की साधनांची अस्सलता पटवण्याचा भाग असो, तो त्यांनी अत्यंत सचोटीने, मेहनतीने पूर्णत्वाला नेला. त्या काळात महाराष्ट्रात पूर्वाश्रमीच्या अस्पृश्यांवर अत्याचाराच्या अनेक घटना घडल्या. मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराच्या चळवळीत लाँग मार्चनंतरच्या पोलीस गोळीबार आणि नंतर मराठवाड्यात झालेल्या दलित अत्याचारांच्या हत्यांच्या घटना असोत, पेटवून दिलेल्या दलित वस्त्यांचा प्रश्न असो- त्या शोषितांच्या बाजूने उभ्या राहिल्या. तेव्हापासूनच प्रत्यक्ष अत्याचारांना विरोध करणाऱ्या गंभीर अभ्यासक अशी त्यांची दुहेरी भूमिका कायम राहिली. चळवळीतल्या कार्यकर्त्या म्हणून खेड्यापाड्यांतल्या दुर्गम आदिवासी पाड्यातल्या खडकाळ चिखलाने भरलेल्या चढउतारांच्या रस्त्यांवरून त्या मैलोन्‌मैल पायपीट करत जात. मोर्चे, धरणे यासाठी तर त्या गेल्याच, परंतु मिळेल ते अन्न मिळेल त्या घरात खाऊन मिळेल ते कपडे लेवून त्या त्या ठिकाणी राहिल्या. पुन्हा हे करताना गेल मॅडम यांनी कधीही गरीब भारतीयांवर आपण भूतदया करतोय असा आव आणला नाही. त्या भारतातील वर्गीय विषमता, जातीय विषमता, लैंगिक अत्याचार यांचे बळी असणाऱ्या सर्व वंचितांच्या सच्च्या भागीदार म्हणून कायम वावरल्या.

स्त्रियांविरुद्धचा हिंसाचार याविषयी ऐंशीच्या दशकात स्त्री चळवळीतील विविध कार्यकर्त्यांची अनेक शिबिरे झाली. अनेक प्रशिक्षणे झाली. अनेक मोठे मोर्चे आणि आंदोलने झाली. ह्या मोहिमांमध्ये त्या सगळ्यांसह सहभागी होत असत. गेल मॅडम यांची या विषयावरची 'स्त्रिया आणि हिंसाचार' ही पुस्तिका निश्चितच दखल घेण्याजोगी आहे. आजही नव्याने संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांना ही पुस्तिका आम्ही आवर्जून देतो. स्त्रियांचे दमन आणि स्त्रियांचे दुय्यमत्व हे एकाच वेळी आर्थिक कारणांनी घडते, सांस्कृतिक पातळीवर त्याची अभिव्यक्ती होते, त्या बेड्या सामाजिक नातेसंबंध आतून अधिकाधिक बळकट होतात ही तीन पातळ्यांवरची मीमांसा त्या अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण रीतीने करत असत. परित्यक्ता स्त्रियांचे अधिवेशन, नर्मदेवरच्या धरणशृंखले-विरोधातला मोर्चा, बळीराजा धरणाच्या लाभार्थींमध्ये स्त्रियांसाठी आग्रह धरणे या लढ्यात त्या होत्या. एक व्यक्ती म्हणून गेल ऑम्व्हेट अतिशय साध्या

होत्या. माणूस म्हणून सहजपणाने मित्रभावाने समोरच्याचे ऐकून घेणे, कार्यकर्त्यांची, वंचितांची दखल घेणे आणि संशोधनातून त्या प्रश्नांची अमूर्त मांडणी करणे त्यांच्या आयुष्याचा अंगभूत भाग होते. ज्या काळी फार कमी विचारवंत आणि अभ्यासक समाजात मिसळून सामान्यांचे प्रश्न ऐकून त्यावर लिहीत असत, त्या काळात गेल यांनी भारतीय समाजातील विषमता आणि शोषण यांचे विश्लेषण जागतिक पातळीवर पोहोचवले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील समाजशास्त्र विभागात गेलमॅडम या जवळजवळ दोन वर्षे प्रपाठक म्हणून कार्यरत होत्या. त्या संपूर्ण कालखंडात आपल्या व्यासंगात बुडालेल्या, आपल्या खोलीत शांतपणे बसून वाचन आणि लिखाण करणाऱ्या, अधूनमधून त्यांना भेटायला आलेल्या कार्यकर्त्यांसोबत गंभीर चर्चा करणाऱ्या- बरेचसे ऐकून घेणाऱ्या अशा गेल ऑम्वेट या डोळ्यांसमोर आजही येतात. त्यांची एकूण वृत्ती ही ऐकून घेण्याची आणि संशोधन करून लिखाण करण्याची असल्यामुळे विद्यापीठातील प्रांगणात त्या विद्यार्थ्यांच्या घोळक्यात गप्पा मारत आहेत किंवा चहापाण्याला ऐसपैस गप्पा करत अनेक लोकांबरोबर बाहेर जात आहेत, हे चित्र मात्र कधीच दिसले नाही. एकांतप्रिय, व्यासंगी, विचारी अशी प्राध्यापक ही गेल ऑम्वेट यांची ती मनाची छबी आम्हा विद्यार्थ्यांच्या मनावर ठसलेली आहे.

गेल यांनी नेहरू मेमोरिअल म्युझियम अँड लायब्ररी येथे सीनियर फेलो म्हणून बराच काळ कार्य केले. त्यांनी अनेक विषयांवर लिखाण केलेले आपल्याला दिसते. त्यात 'इंडियन एक्सप्रेस' आणि 'द हिंदू' या सुप्रसिद्ध वृत्तपत्रांत नियमितपणे लिहिलेले प्रासंगिक लेख, अनेक छोट्या-मोठ्या पुस्तिका आणि अनेक ग्रंथ यांचा समावेश आहे. त्यांची विपुल ग्रंथसंपदा त्यांच्या बहुआयामी विद्वत्तेचे प्रतीक आहे.

**प्रेरणा आणि वारसा**

गेल ऑम्वेट जातिसंस्थेवर लिहू लागल्या त्या काळात जात भौतिक वास्तव राहिले नसून तो केवळ भारतातील सामाजिक संस्कृती प्रश्न आहे, असे अनेक भारतीय विचारवंत म्हणत असत; परंतु गेलमॅडम यांनी मार्क्सवादातील नवे विचारप्रवाह वापरून जातीचे आर्थिक आणि सामाजिक रूप कसे एकमेकांत गुंतलेले आहे, ते स्पष्ट केले. जातीवर आधारित पूर्वग्रह आणि शोषक मनोवृत्ती यांमुळे होणाऱ्या अत्याचारांवर त्या सातत्याने लिहीत राहिल्या. जात, वर्ग आणि लिंगभाव या तीनही जन्मावर आधारलेल्या ओळखीच्या आधारे माणसामाणसांत जो भेदभाव केला जातो, त्याविषयी त्या कायमच अस्वस्थ होत्या. अलीकडच्या काळात जातिव्यवस्थेविरुद्धच्या विद्रोहाचा त्यांचा अभ्यास त्यांना बौद्ध धम्माच्या महत्त्वापर्यंत घेऊन आला. डॉक्टर आंबेडकरांचा बौद्ध धम्मापर्यंतचा प्रवास त्यांनी पुन्हा पुन्हा अभ्यासला.

विद्रोह आणि शोषितांचे बंड याचे विश्लेषण जसे त्यांना खुणावत राहिले, तसेच मानवी आयुष्याचा स्वप्नलोक कसा असावा हाही त्यांचा ध्यास होता. म्हणूनच आयोथी, कबीर, रैदास अशा सर्वांच्या कल्पनेतला आदर्श लोक, स्वप्नलोक आणि त्यातून हाती येणारे एका नव्या प्रकारच्या विवेकाचे चित्र त्यांनी रेखाटले. म्हणूनच स्त्रीदास्याचा 'तुरुंग फोडिते' ह्या सुप्रसिद्ध स्त्रीचळवळीतील गीताच्या ओळीचे शीर्षक असणारे त्यांचे पुस्तक त्यांची खरी ओळख सांगते, असे वाटते. आज जगभरचे विद्यार्थी अतिशय उत्साहाने त्यांची पुस्तके, निबंध, मुलाखतींचे ऑडिओ आंतरजालावरून एकमेकांना पाठवत आहेत. त्यांना वाहिलेल्या श्रद्धांजली संदेशांनी संपूर्ण आंतरजाल जणू भरून गेले आहे. चळवळीतले कार्यकर्ते आणि कार्यकर्त्यांचे कुटुंबीय, गेल मॅडम यांनी आस्थेने केलेली चौकशी किंवा मूकपणाने दिलेला आदर- याची नोंद आवर्जून घेत आहेत. जगभरच्या विद्यापीठातले विद्यार्थी आणि तरुण संशोधक आणि संशोधक आपल्या तरुणपणी गेल यांना सहज भेटून प्रश्न विचारणे शक्य झाले. त्यामुळे संशोधक म्हणून प्रवास कसा सुकर झाला हे नोंदवत आहेत.

एकीकडे जगभर हिंसा-क्रौर्य, लोकानुनयवादी बहुसंख्याक वाद यांचा वरचश्मा दिसत असताना गेल ऑम्वेट यांचे विचार इतके खोलवर अनेक वर्तुळांत पसरले आहेत हे दिलासादायक वाटते. त्यांच्या लेखांची आणि ग्रंथांची मराठीसह अनेक भाषांमध्ये भाषांतरे झालेली आहेत आणि त्यामुळे आज त्यांचे विचार नव्याने चिकित्सा करू लागलेल्या विद्यार्थी-संशोधक-कार्यकर्ते यांना सहज उपलब्ध झाले आहेत. समाजशास्त्रीय दृष्टिकोनाच्या भिंगातून संपूर्ण जगातील विषमतांचा उभा-आडवा आलेख रेखाटण्याची क्षमता असणाऱ्या व्यासंगी अभ्यासक म्हणूनच गेल ऑम्वेट कायम ओळखल्या जातील.

**डॉ. श्रुती तांबे,** पुणे
shruti.tambe@gmail.com

अभिवादन

ऋता मनोज ठाकूर

# जयंत पवार : अन्यायाला उत्तर देणारा भाष्यकार

जयंत पवार यांच्या नाटकाचा एक वेगळा प्रवाह होता. त्याला प्रांत, भाषा, सीमारेषा असा कोणताही अडसर नसायचा, कारण मुंबईसारख्या महानगरातील लोकांच्या जगण्याचा संदर्भ घेऊन लिहिल्या गेलेल्या त्यांच्या नाटकांनी रंगभूमीवर वास्तववादी नाटकांचा ठळक ठसा उमटवला. 'काय डेंजर वारा सुटलाय' या नाटकाने अनेक पुरस्कार मिळवले. १९७८ मध्ये त्यांनी नाट्यलेखनाला सुरुवात केली. नाटक आणि कथा या दोन्ही साहित्यप्रकारांत आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली. 'दरवेशी', 'मेला तो देशपांडे', 'कार्य सिद्धीस नेण्यात श्री (अ)समर्थ आहे', 'दुजा शोक वाहे', 'लियर', 'शेवटच्या बीभत्साचे गाणे,' 'विठाबाईचा कावळा', 'जळिताचा हंगाम' इत्यादी तेवीस एकांकिकांचे लेखन त्यांनी केले होते. २०१५ मध्ये 'वरनभातलोन्चा नि कोन नाय कोन्चा' हा कथासंग्रह प्रकाशित झाला. 'मोरी नींद नसानी होय' हा लोकवाङ्मय गृहने प्रकाशित केलेला अखेरचा कथासंग्रह ठरला आहे.

एकाच माणसात जेव्हा अनेक ओळखी, अनेक कला लपलेल्या असतात तेव्हा त्याच्या जगण्याचा कालावधी कमी होतो आणि जगायचे खूप मोठे राहून गेले, असे वाटू लागते. बरोबर! मी बोलते आहे 'जयंत पवार' या संवेदनशील, नाटककार, नाट्यसमीक्षक, पत्रकार, कथाकार यांच्याविषयी. जीवनाच्या रंगमंचावर अनेक भूमिका उत्तमरीत्या वठवत असताना एक्झिट लवकर झाली, ही रुखरुख आपल्या सर्व चाहत्यांच्या मनात आहे.

तसं पाहता आठ-नऊ वर्षांपासून कॅन्सरशी झुंज देत राहून जगणं सोपं नव्हतंच. अर्थात लिखाण मात्र थांबले नव्हते, ते श्वासासारखे चालूच होते. त्यांचा स्वभाव असा होता की आपला मुद्दा, आपले म्हणणे यांवर ते ठाम असायचे. पण ठरावीक काळापर्यंतच वाद घालणे. नंतर मात्र 'बरं'! हा पूर्णविराम देऊन वाद घालणे थांबवायचे. माझ्या मनात एक विचार आला, कॅन्सरशी तर ते आठ-नऊ वर्षे झुंजत होते. पण कॅन्सर काही ऐकेना, मग जयंतराव आपल्या अल्पाक्षरी शैलीत 'बरं'! असे म्हटले असतील. म्हणूनच कॅन्सर जिंकला आणि मृत्यूचा प्रवास सुरू झाला.

आजूबाजूला घडणाऱ्या घटनांची नोंद घेत, त्यावर भाष्य करत, अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर घाला घालण्याचा जेव्हा जेव्हा प्रयत्न झाला, तेव्हा तेव्हा त्यांच्या आतला संवेदनशील माणूस शांत बसू शकला नाही. प्रत्यक्ष रस्त्यावर उतरून त्यांनी लढा दिला. आपल्या साहित्यातून, नाटकातून अन्यायाला उत्तर देणारा एक भाष्यकार हरपला, ती उणीव आता कधीच भरून निघणार नाही.

चारचौघांसारखं आयुष्य जगणं, तेही साचेबंद पद्धतीने, असे जयंतरावांना कधी जमलेच नाही. लालबाग-परळच्या भागात आणि वातावरणात ते लहानाचे मोठे झाले. तिथलेच काही त्यांच्याबरोबर खेळणारे,

त्यांच्याबरोबरच मोठे झालेले कलाकार झाले. दूरदर्शनवर दिसू लागले, चमकू लागले, त्यांनी पैसे कमावले. गाड्या, बंगले घेतले; पण आता मला तरी वाटते की, ते मोठे होणे असते? की जयंतरावांसारखे ‘अधांतर’ लिहून जगणे, रंगमंचावर उतरवून वास्तव दाखवणे, म्हणजेच मोठे होणे असते! ‘अधांतर’मध्ये रंगमंचावर रक्त सांडले, उडाले मात्र प्रेक्षकांच्या अंगावर- असे झाले खरे! त्यावर काही टीकाकारांनी, पत्रकारांनी ‘भडक’ म्हणून टीका केली. परंतु वास्तव मांडण्याची रंगमंचीय ताकद त्या संवेदनशील मित्राकडे होती. म्हणून आपण ‘अधांतर’ बघितल्यावर ‘ते नाटक अंगावर येते,’ असे म्हणतो. कारण ते ‘जग’ आपल्या माहितीतले असले, तरी इतक्या जवळून आपण ते पाहिलेले नसते. ते प्रत्यक्ष पाहून आपली अशी अवस्था होणारच.

जगताना आलेल्या अडचणींना तोंड देत आपला साहित्यप्रवास चालू ठेवणे म्हणजे एखादा तपस्वी आपली साधना वर्षानुवर्षे करतो तसेच म्हणावे लागेल. ज्ञानी जनांशी आपल्या साहित्याची चर्चा न करता, आपले

नाटककार असलेले जयंत पवार कथाकार कसे झाले त्यामागे एक कथा आहे. वर्ष होते १९८८. निखिल वागळेंनी जयंत पवारांना कथा लिहिण्याचा आग्रह केला. ‘अक्षर’ दिवाळी अंकासाठी कथा लिहिली आणि नंतर ‘अक्षर’साठी १९८९ आणि १९९१ मध्ये कथा लिहिली. नंतर तब्बल दहा वर्षांनी परत भरतकुमार राऊत यांनी ‘महाराष्ट्र टाइम्स वार्षिक’साठी कथा लिहायला लावली. मग अजून दोन कथा दिवाळी अंकासाठीच लिहिल्या. जयंत पवार म्हणतात, ‘‘हे दोन संपादक माझ्या बोकांडी बसले नसते तर मी कथेच्या वाटेला गेलो असतो की नाही, गेलो असतो तर कधी? याविषयी सांगणं कठीण आहे.’’



जगलेले आपल्या लिखाणात रुजवायचे. स्वतःच स्वतःचा गुरू बनून आत्मचिंतनातून ते साहित्य तावून-सुलाखून निघायचे आणि खऱ्या अर्थाने एक संवेदनशील लेखक आपल्या समोर यायचा. कधी साहित्य अकादमी पुरस्कार विजेता, (२०१२ - फिनिक्सच्या राखेतून उठला मोर), तर कधी कोकण मराठी साहित्य संमेलनाचा अध्यक्ष म्हणून (२०१४ - महाड येथे झालेले कोकण मराठी साहित्य संमेलन), तर कधी १५ व्या विद्रोही साहित्य संमेलनाचे अध्यक्षस्थान भूषविणारा.

वास्तव जेव्हा लिखाणातून प्रकट होते, तेव्हा त्याला सजण्यासाठी दुसऱ्या कोणत्या अलंकाराची गरज नसते. तो जे जे लिहित जातो ते ते साहित्य होत जाते आणि लिहिणारा त्याची स्वतःची खास ओळख आपल्या मनावर उमटवत जातो. गिरणगावचे महानगरात होणारे रूपांतर आणि मुंबईचा बदलत जाणारा चेहरामोहरा जयंत पवारांनी खूप जवळून पाहिला. गिरण्या बंद पडल्यामुळे विस्थापित झालेल्या कामगारांची बेरोजगारी, गरिबी त्यांच्या इतकी जवळून कोणीच पाहिली नसेल. म्हणून त्यांच्या लिखाणातून अगतिक, असहाय होत गेलेल्या या सर्वसामान्यांचे जगणे त्यांच्या नाटकातून प्रभावीपणे उतरले. 'काय डेंजर वारा सुटलाय', 'टेंगशेंच्या स्वप्नात ट्रेन', 'माझं घर', 'अधांतर' या त्यांच्या नाटकांनी मराठी रंगभूमीवर खास आपला स्वतंत्र ठसा उमटवला. 'अधांतर'ने एक नाही - दोन नाही तब्बल चौदा लेखन पुरस्कार मिळवले. यांपैकी ठळक असे- 'राम गणेश गडकरी महाराष्ट्र राज्य साहित्य पुरस्कार', 'महाराष्ट्र फाउंडेशन ललित साहित्य गौरव', 'नाट्यदर्पण'. याशिवाय या नाटकाचे हिंदी आणि इंग्रजी भाषांत अनुवाद झाले आणि पुढे या नाटकावर आधारित 'लालबाग-परळ' नावाचा चित्रपटही आला.

जयंत पवार यांच्या नाटकाचा एक वेगळा प्रवाह होता. त्याला प्रांत, भाषा, सीमारेषा असा कोणताही अडसर नसायचा, कारण मुंबईसारख्या महानगरातील लोकांच्या जगण्याचा संदर्भ घेऊन लिहिल्या गेलेल्या त्यांच्या नाटकांनी रंगभूमीवर वास्तववादी नाटकांचा ठळक ठसा उमटवला. 'काय डेंजर वारा सुटलाय' या नाटकाने अनेक पुरस्कार मिळवले.

१९७८ मध्ये त्यांनी नाट्यलेखनाला सुरुवात केली. नाटक आणि कथा या दोन्ही साहित्यप्रकारांत आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली. 'दरवेशी', 'मेला तो देशपांडे', 'कार्य सिद्धीस नेण्यात श्री (अ)समर्थ आहे', 'दुजा शोक वाहे', 'लियर', 'शेवटच्या बीभत्साचे गाणे,' 'विठाबाईचा कावळा', 'जळिताचा हंगाम' इत्यादी तेवीस एकांकिकांचे लेखन त्यांनी केले होते. २०१५ मध्ये 'वरनभातलोन्चा नि कोन नाय कोन्चा' हा कथासंग्रह प्रकाशित झाला. 'मोरी नींद नसानी होय' हा लोकवाङ्‌मय गृहने प्रकाशित केलेला अखेरचा कथासंग्रह ठरला आहे.

'साहित्य अकादमी पुरस्कार' स्वीकारताना केलेल्या भाषणात, जयंत पवार म्हणतात, ''लेखक हा चिरडल्या गेलेल्या जगातल्या चिरफाळलेल्या माणसाचा प्रतिनिधी आणि अशा वंचिताचाच वंशज असतो.'' आणि खरं पाहता जयंत पवार हे अशा वंचितांचे खऱ्या अर्थाने वंशज होते. त्यांनी महानगरातल्या तळात जगणाऱ्यांचं जग संवेदनशीलतेने आणि बारकाईने साहित्यातून म्हणजेच कथांतून-नाटकांतून समाजासमोर मांडले आहे.

'प्रयोग मालाड' नाट्यसंस्थेने ऑक्टोबर २०१८ मध्ये 'लेखक एक, नाट्यछटा अनेक' या नावाखाली एकांकिका स्पर्धा भरवली होती. या स्पर्धेच्या अंतिम फेरीत जयंत पवार यांच्या चौदा एकांकिकांमध्ये आपापसांत सामना झाला. ही स्पर्धा बोरिवलीच्या प्रबोधनकार ठाकरे नाट्यगृहाच्या मिनी थिएटरमध्ये पार पडली. नाट्यरसिकांना त्यांच्या सलग चौदा एकांकिकांची मेजवानीच मिळाली.

आविष्कार-स्वातंत्र्यासाठी जे जे लढले आणि 'दमनशाही'च्या विरोधात ज्यांनी ज्यांनी आवाज उठवला, ज्यांना ज्यांना या हुकूमशाही व्यवस्थेला बळी जावे लागले; मग तो साहित्याच्या क्षेत्रातला असो, वा नाट्यक्षेत्रातला किंवा पत्रकारितेच्या क्षेत्रातला असो- जयंत पवार सदैव अशा कलावंतांच्या स्वातंत्र्याच्या बाजूने उभे राहिले. जेव्हा जेव्हा संधी मिळेल तेव्हा तेव्हा या बाबतीत बोलत, लिहीत राहिले असे अजून एखादे उदाहरण माझ्यातरी पाहण्यात नाही. अर्थात हे सर्व जमण्याचे कारण, जयंत पवारांची मुळे गिरणगावात घट्ट रुतून बसल्यामुळे त्यांना ते शक्य झाले.

जयंत पवार यांची नाटकं, कथा यांमधून वास्तव- पण फँटसीचं विलक्षण मिश्रण दिसतं. त्याचबरोबर ते जुनी मिथकं मोडत नवीन मिथकं उभी करतात. लाक्षागृहासारख्या मिथकाला तर त्यांनी पार उलटे-सुलटे करून टाकले. ख्यातनाम कन्नड कलावती बी.जयश्री हिने

‘चित्रपट’ नावाचं एक लोकनाट्य सादर केलं होतं. रावणाच्या चित्राशी ते संबंधित होतं. शूर्पणखा नाक, कान कापले याची तक्रार घेऊन रावणाकडे जाते. राम-रावणाचे युद्ध होते. रावण मारला जातो. शूर्पणखा सीतेच्या दासीचे रूप घेते. रावणाचे चित्र काढते. सीता त्या रावणाचे बंद डोळे उघडते, रावण जिवंत होतो. सीता रामाच्या भयाने रावणाला निघून जायला सांगते. रावण म्हणतो, ‘‘मारणाऱ्यापेक्षा सजीव करणारा मोठा’’. राम येतो. राम आणि रावणाचे युद्ध होते, राम हरतो. रावण सीतेला म्हणतो, ‘‘तू माझी हो! सीता त्याला म्हणते, तू माझ्या उदरी जन्म घे. माझा मुलगा हो म्हणजे मी प्रेमाने तुला आलिंगन देईन, माझे दूध तुला पाजीन.’’ अशा एका विलक्षण वेगळ्या लोककथेचा अन्वयार्थ लावताना त्यातील रामचरित्र तसे शूर्पणखा, सीता या व्यक्तिरेखांचे सुंदर विवरण तर जयंत पवारांनी केलेच; याशिवाय संपूर्ण नाटकाचा अन्वयार्थ उलगडून दाखवला आहे, तो अफलातून आहे. या नाटकावर इतरही परीक्षणं, समीक्षणं आली. पण इतक्या सुलभ पद्धतीने उकल कोणीच करू शकले नाही. त्याचे कारण ते एक पत्रकारही होते. त्यामुळे वृत्तपत्रीय समीक्षा उत्तम झाली. पुढे दाखला देताना वृत्तपत्रीय समीक्षेचे उत्तम उदाहरण म्हणून अभ्यासले जाईल.

जयंत पवारांची नाट्यसमीक्षा वाचण्यासाठी महाराष्ट्रातला प्रेक्षक आतुर असायचा. कारण खूप सूक्ष्म आणि नेमकेपणाने समीक्षा करणे हे त्यांचे वैशिष्ट्य होते. नाट्यकलाकार त्यांच्याकडे एक महत्त्वाचे नाट्यसमीक्षक म्हणून बघतात. अर्थातच याचसाठी नाट्य कलाकारांना आणि नाट्य दिग्दर्शकांना त्यांनी केलेली टीकासुद्धा महत्त्वाची आणि हवीहवीशी वाटायची.

नाटककार, नाट्यसमीक्षक जयंत पवारांचा पत्रकारितेचा प्रवास १९८६ पासून सुरू झाला. ‘चंदेरी’, ‘नवशक्ती’, ‘आपलं महानगर’, ‘सांज लोकसत्ता’, ‘लोकसत्ता’, ‘महाराष्ट्र टाइम्स’ वर्तमानपत्रांमधून त्यांनी पत्रकारिता केली.

नाटककार असलेले जयंत पवार कथाकार कसे झाले त्यामागे एक कथा आहे. वर्ष होते १९८८. निखिल वागळेंनी जयंत पवारांना कथा लिहिण्याचा आग्रह केला. ‘अक्षर’ दिवाळी अंकासाठी कथा लिहिली आणि नंतर ‘अक्षर’साठी १९८९ आणि १९९१ मध्ये कथा लिहिली. नंतर तब्बल दहा वर्षांनी परत भरतकुमार राऊत यांनी ‘महाराष्ट्र टाइम्स वार्षिक’साठी कथा लिहायला लावली. मग अजून दोन कथा दिवाळी अंकासाठीच लिहिल्या. जयंत पवार म्हणतात, ‘‘हे दोन संपादक माझ्या बोकांडी बसले नसते तर मी कथेच्या वाटेला गेलो असतो की नाही, गेलो असतो तर कधी? याविषयी सांगणं कठीण आहे.’’

फिनिक्स मिल या मुंबईतील गिरणगावातल्या एका मोठ्या गिरणीच्या तीन मोठ्या स्थित्यंतरांविषयी जयंत पवार म्हणाले, ‘‘मला लेख लिहायचा होता आणि हे बाबाला माहीत होते, बाबाने मला शीर्षक दिले. ‘फिनिक्सच्या राखेतून उठला मोर!’’ बाबा म्हणजे कथाकार सतीश तांबे. अर्थात प्रत्यक्षात लेख झालाच नाही, तर झाली कथा! असे अनेक मित्र जयंत पवार यांना भेटले. त्यांत ज्येष्ठ कवी सतीश काळसेकर, ज्यांनी कथासंग्रहासाठी धोशा लावला म्हणून ‘फिनिक्सच्या राखेतून उठला मोर’ हा कथासंग्रह प्रकाशित झाला. जयंत पवारांच्या लेखक असण्याची पाठराखण त्यांची पत्नी ‘संध्या नरे’ या करायच्या, कारण जयंत पवार म्हणतात, ‘‘माझ्या बिनमहत्त्वाकांक्षी स्वभावाला उभारी देऊन ऊर्जा पुरवीत राहणं आणि माझ्या आळसाचा आदर करून मला लिहितं करणं अशी प्रत्यक्ष लेखनाहूनही अधिक महत्त्वाची कामं संध्या करत आली आहे.’’

‘संध्याताईं’ना आणि ‘सई’ला आताच्या या दुःखाला तोंड देण्याची ताकद मिळो हीच प्रार्थना!

**ऋता मनोज ठाकूर,** अहमदनगर.
Mob. 9371839625

रणधीर शिंदे

# नाटक – रंगभूमीविषयावरील ज्ञानसंपन्न परिभाषा संग्रह

नाटक व रंगभूमीविषयक परिभाषा संग्रहाचे वैशिष्ट्य म्हणजे त्याचे सादरीकरण व शैली. या संज्ञा-स्पष्टीकरणात वस्तुनिष्ठता आणि सुस्पष्टता आहे. भाषा सुबोध आणि प्रौढ आहे. वाचकांना समजावून देण्याची त्यात हातोटी आहे. एखादी संज्ञा घेऊन तिचा अर्थ सांगणे, त्यातील ऐतिहासिक परिवर्तने नोंदवून त्या संज्ञेचे अन्य संबंधित घटकांशी नाते अधोरेखित करणारी ही पद्धत त्यांनी अवलंबली आहे. त्या विषयासंदर्भात अन्य अभ्यासकांची मते देऊन त्याविषयीचे स्वतंत्र असे प्रतिपादनही आहे. विषय अधिक खुलावा म्हणून संस्कृत, पाश्चात्त्य व मराठी नाटकांमधील अनेक उदाहरणे दिली आहेत. त्या त्या विषयाच्या नोंदीच्या प्रारंभी किंवा स्पष्टीकरणार्थ मूळ संस्कृत श्लोकांचा व इंग्रजी अवतरणांचा पदोपदी निर्देश आहे. संस्कृत आणि युरोपिअन नाटकांचा त्यांचा व्यासंग थक्क व्हावं असा आहे.

मराठीत ज्ञानपरंपरेला कोश व परिभाषासंग्रह वाङ्‌मयाची समृद्ध परंपरा लाभली आहे. विविध प्रकारच्या शब्दकोशांनी यात मौलिक अशी भर पडली आहे. शब्दकोश, स्थळकोश, व्युत्पत्तिकोश, नामकोश, मिथक कोश, संतसाहित्य शब्दकोश, बोलीभाषाकोश तसेच विविध प्रकारचे पारिभाषिक कोश काळाच्या टप्प्यावर निर्माण झाले. श्री.व्यं. केतकरांच्या ज्ञानकोशापासून समृद्ध अशा कोशवाङ्‌मयाची परंपरा मराठीत निर्माण झाली. कोशवाङ्‌मय व परिभाषा संग्रह ज्ञानसंकल्पना व्यवहारात ‘वाटाडे’ म्हणून काम करतात. कोणत्याही भाषिक ज्ञानपरंपरेला अनेक प्रकारच्या परिभाषा संग्रहांच्या निर्मितीतून समृद्धता लाभत असते. अलीकडे मात्र परिभाषा संग्रहनिर्मितीची परंपरा क्षीण झाली आहे. त्याची विविध कारणे संभवू शकतात. मराठीत कोशवाङ्‌मयाची परंपरा अधिक समृद्ध होऊ शकली नाही. याचे कारण ‘मराठी भाषा ही सर्वार्थाने ज्ञानभाषा होऊ शकली नाही. आपली प्रचलित शिक्षणयंत्रणाही याला जबाबदार आहे. शिक्षणाचे माध्यम, बौद्धिक कार्य करणाऱ्या वर्गाची वृत्ती आणि एकूण शिक्षणयंत्रणा कोशनिर्मितीसाठी पोषक-पूरक नाही.’ (सुधीर रसाळ, प्रस्तावना, कोशवाङ्‌मय विचार आणि व्यवहार - सदाशिव देव) हा विचार ध्यानात घेण्याजोगा आहे.

मराठीत परिभाषा संग्रहाची निर्मिती संस्थात्मक तसेच व्यक्तिगत पातळीवर झाली. विशेषतः महाराष्ट्र शासनाच्या भाषा संचालनालयाच्या वतीने विविध विषयांवरील परिभाषा कोशांची निर्मिती झाली. विज्ञान व मानव्य विद्या शाखेतील अनेक विषयांवर कोशांची निर्मिती झाली. या बरोबर व्यक्तिगत स्वरूपातदेखील काही कोशांची निर्मिती झाली. दे. द. वाडेकर यांचा तत्त्वज्ञान कोश व स.मा.गर्गे यांचा सामाजिक शास्त्रांतील विषयसंकल्पनांचा परिचय करून देणारा ‘भारतीय समाजविज्ञान कोश’ हे महत्त्वाचे

होत. मराठी नाटकाच्या संदर्भात यापूर्वी वि.भा.देशपांडे यांचा ‘मराठी नाट्यकोश’ प्रसिद्ध झालेला आहे. भाषिक संस्कृतीत शासन स्तरावर झालेल्या सांस्कृतिक कार्याची नोंद फारशी सकारात्मक पद्धतीने घेतली जात नाही. बऱ्याचदा त्याकडे नकारात्मक दृष्टीने पाहिले जाते. तेही माहिती न घेता. यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाच्या उद्घाटनपर भाषणात मराठी ज्ञानभाषा व्हावी अशी इच्छा व्यक्त केली होती. आणि ‘ज्ञानाच्या सरोवराचे पाट आपण लोकांच्या जीवनापर्यंत पोहोचवण्यासाठी साहित्य संस्कृती मंडळाने मदत केली पाहिजे,’ अशी त्यांची धारणा होती. त्या दृष्टीने मंडळाने आजवर भाषासाहित्यासंबंधी मूलभूत स्वरूपाची कामे केली आहेत. त्याचेच एक रूप म्हणजे प्रा.विलास खोले यांचा ‘नाटक आणि रंगभूमी परिभाषा संग्रह’.

ज्येष्ठ समीक्षक प्रा. विलास खोले यांचा अलीकडेच ‘नाटक आणि रंगभूमी परिभाषा संग्रह’ (ऐतिहासिक व विवरणात्मक पर्यालोचन) हा महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून प्रकाशित झाला आहे. मराठीतला हा पहिलाच नाटक आणि रंगभूमीविषयक परिभाषा संग्रह आहे. प्रा. विलास खोले हे मराठीचे व्यासंगी आणि साक्षेपी समीक्षक म्हणून ओळखले जातात. आधुनिक साहित्य, प्राचीन साहित्य ते एकोणिसावे शतक असे त्यांचे व्यासंगविषय आहेत. त्यांची काही वाङ्मयविषयक संपादने मौलिक ठरली आहेत. शोकांतिका उदय, चरित्रवाङ्मय व मराठी वाङ्मयीन संस्कृतीवरील त्यांचे लेखन महत्त्वाचे आहे. चौकट, शांताराम कथा, विसाव्या शतकातील मराठी समीक्षा, गेल्या अर्धशतकातील मराठी कादंबरी, भालचंद्र नेमाडे : व्यक्ती, विचार आणि साहित्य- ही त्यांची संपादने महत्त्वाची होत. त्यामुळे खोले यांच्या वाङ्मयीन व्यासंगदृष्टीचा परिपाक असणारा हा परिभाषा संग्रह महत्त्वाचा ठरतो.

‘नाटक आणि रंगभूमी परिभाषा संग्रह’ भारतीय नाट्यशास्त्र, पाश्चात्त्य नाट्यशास्त्र, नाट्यप्रकार आणि मराठी नाट्यरूपे या चार भागांत विभागला आहे. या परिभाषा संग्रहाचे मोल अनेकांगांनी महत्त्वाचे आहे. नाटक-रंगभूमीचे अभ्यासक, भाषासाहित्य- ललितकलेचे विद्यार्थी, रंगकर्मी व सर्वसामान्य वाचकांच्या दृष्टीने उपयुक्त असा हा परिभाषा संग्रह आहे. जवळपास ८२७ पृष्ठांच्या या महाग्रंथात नाटक रंगभूमीच्या महत्त्वपूर्ण संकल्पनांचा विस्तृत परिचय आहे. या परिभाषा संग्रहाचे एक वेगळेपण म्हणजे त्याची रचना कोशवाङ्मयाच्या मर्यादा ओलांडून त्या त्या संज्ञेविषयी सर्वांगीण, यथार्थ, विवरणात्मक माहिती देणारा हा परिभाषा संग्रह आहे. एखाद्या विषयाची व्याप्ती आणि महत्त्व लक्षात घेऊन त्याचे विवेचन केले आहे. एखादी नोंद चार-पाच ओळींपासून ते त्या विषयाचे महत्त्व लक्षात घेता ती दहा पृष्ठांचीसुद्धा दिलेली आहे. खोले यांच्या नाट्य व वाङ्मयविषयक दृष्टिकोनाचाही त्यावर प्रभाव आहे. रंगभूमी व नाटकाविषयीचा ज्ञानमाहितीचा पसारा हा व्यापक आहे. नाटकाच्या उगमापासून नाट्यपरंपरेतील परिवर्तनाचा चिकित्सक आंतरभेद त्यामध्ये आहे. अलीकडील काळात मराठी ज्ञानपरंपरेत या प्रकारची ज्ञानसाधना विरळा म्हणावी लागेल. नाटक ह्या प्रकाराच्या भारतीय व पाश्चात्त्य परंपरा, त्यातील ऐतिहासिक परिवर्तने व वैशिष्ट्यांचा सूक्ष्म स्वरूपाचा वेध त्यामध्ये आहे.

‘भारतीय नाट्यशास्त्र’ या भागात ‘भरता’पासून ‘भरतवाक्या’पर्यंतच्या जवळपास ७६ नोंदींतून भारतीय नाट्यपरंपरेचा परिचय आहे. पहिल्या भागामध्ये संस्कृत नाट्यशास्त्रातून उद्भवलेल्या नाट्यपरंपरेची मांडणी आहे. मुख्यत्वे भरताचे ‘नाट्यशास्त्र’ व भारतीय साहित्य मीमांसकांच्या मांडणीतून आकाराला आलेली ही मांडणी आहे. अभिनय, रसचर्चा, नाट्यांगे, नाट्यतंत्रे, कथानक, संविधान स्वरूप, नायक, विदूषक, नांदी ते भरतवाक्य- या नाट्यघटकांची मांडणी आरंभीच्या भागात आहे. भारतीय नाट्यशास्त्राची वाटचाल यात आहे. एका अर्थाने संस्कृत परंपरेतून उद्भवलेल्या नाट्यवाङ्मयाचा नकाशा त्यामध्ये आहे. नाट्यस्वरूप, नाटकांगे, रूपसादरीकरण स्वरूपाची माहिती आहे. कोशवाङ्मयामध्ये एक प्रकारची वस्तुनिष्ठता अपेक्षिलेली असते. अशी वस्तुनिष्ठता या परिभाषा संग्रहामध्ये तर आहेच; मात्र ते ओलांडून ती विश्लेषण-स्वरूप धारण करते. त्यामुळे संबंधित विषयाच्या माहितीच्या कक्षा विस्तारतात. नाट्य स्वरूपाच्या दिग्दर्शनाबरोबरच त्यातील टप्पे, बदल आणि त्या भाषिक संस्कृतीच्या नाट्यविषयक दृष्टिकोनाची प्रचिती येते. त्या त्या विषयासंदर्भात अन्य मीमांसकांनी जोडलेल्या विचारापुष्ट्यर्थ त्या त्या ठिकाणी दिला आहे. त्यामुळे पहिल्या भागात भारतीय नाट्यसृष्टीचे स्वरूप विशद करणाऱ्या पारिभाषिक संज्ञांची माहिती आहे.

दुसऱ्या भागात पाश्चात्त्य परंपरेतील नाट्यस्वरूपाची मांडणी आहे. भारतीय रंगभूमीपेक्षा तुलनात्मकदृष्ट्या प्रगत आणि वैविध्यपूर्ण असणाऱ्या युरोपीय रंगभूमीचा विमर्श या भागात आहे. जवळपास १३० नाट्यविषयक संज्ञांतून पाश्चात्त्य नाटक व रंगभूमीविषयीचा परिचय आहे. एका अर्थाने आधुनिक नाट्यसंकल्पनेच्या वाटचालीचे दिशादिग्दर्शन यामध्ये आहे. पाश्चात्त्य रंगभूमी ही वैविध्यपूर्ण व चल स्वरूपाची आहे. त्यामुळे अशा नाट्यपरंपरेची माहिती आणि त्या संबंधीचा परिप्रेक्ष्य अभ्यासकाकडे नीट असल्याशिवाय त्याचे सादरीकरण नीट होणे शक्य नसते. त्यामुळे नाट्यशास्त्रावरील मूलभूत ग्रंथांच्या वाचन-व्यासंगातून आलेली विचारदृष्टी त्यांच्या विवेचनात आहे. नाट्यविचारांच्या जागतिक परिप्रेक्ष्याची मांडणी आहे. ॲरिस्टॉटलपासून ॲब्सर्ड रंगभूमीपर्यंतच्या बदलांचा ज्ञानमागोवा आहे. पाश्चात्त्य नाटककार, नाट्यपरंपरा, नाट्यचळवळी, अभिनय शैली यांच्या महत्त्वपूर्ण नोंदी तसेच अंक, नट, अभिनय, संवादाची विविधस्वरूपी कार्ये, मुद्राविष्कार, रंगभूषा व रंगमंच संकेत या विषयांची मांडणी आहे. विशेषतः महत्त्वाच्या नाट्यकृतींचे विशेष, लेखक-कामगिरी, अभिनेते व नाट्यचळवळींची माहिती या भागात आहे. पाश्चात्त्य रंगभूमीची मांडणी करत असताना काही महत्त्वाच्या विषयांची विस्ताराने त्यांनी चर्चा केली आहे. नाटकातील कथानकाचे स्वरूप, संवादाची कार्ये, नाटकातील संघर्ष स्वरूप यांची अतिशय विस्तृत माहिती दिली आहे. त्यामुळे पाश्चात्त्य आधुनिक रंगभूमीचे स्वरूप व वाटचालीचा नोंदपट या भागात आहे.

ग्रंथाच्या तिसऱ्या भागात नाट्यप्रकारविषयक संज्ञांचा विचार आहे. यात शोकान्तिका, सुखान्तिका, मेलोड्रामा, प्रहसन, उपहासिका या नाट्यप्रकारांचे विवेचन आहे. शोकात्मिका हा खोले यांच्या अभ्यासाचा दीर्घ काळाचा विषय राहिला आहे. यापूर्वी त्यांचा 'शोकांतिकेचा उदय' हा ग्रंथही प्रकाशित झालेला आहे. मूलभूत नाट्यप्रकाराची सैद्धान्तिक स्वरूपे, इतिहासक्रम व वैशिष्ट्ये त्यांनी नोंदविली आहेत. सांकल्पनिक मांडणीबरोबरच त्या त्या प्रकाराच्या उदयाची पार्श्वभूमी आणि परंपरा वाटचालीचे दिग्दर्शन आहे. त्याच्या आशयरूप वैशिष्ट्यांचे स्वरूप विशद केले आहे. संज्ञा स्पष्टीकरणाबरोबर नाट्यविषयाचे स्वतंत्र विश्लेषणात्मक चिंतन आहे. तिसऱ्या आणि चौथ्या भागात हा विवरणात्मक पट जास्त आहे. या प्रकारातील परिभाषा विवेचनाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे नाट्यसंकल्पनाविषयक स्वरूपाची विश्लेषणात्मक मांडणी. त्यात त्यांची नाटक प्रकाराविषयीची स्वतंत्र अन्वेषणदृष्टी आहे. शोकान्तिका व सुखान्तिकांवर जवळपास ६० पृष्ठांचा मजकूर आहे. विशेषतः नाट्यप्रकाराच्या मराठीतील सैद्धान्तिक प्रत्यक्ष परिस्थितीबद्दलची मीमांसा आहे. ती नवी आहे. मराठी नाट्यचर्चेतील नाट्यसंकल्पनांकडे पाहण्याची नवी दृष्टी त्यामध्ये आहे. मराठीत नाट्यपरंपरेत शोकान्तिका न आढळण्याचे कारण ते संस्कृत नाटकाच्या अनुबंधात शोधतात. भारतीय नाट्यपरंपरेला वास्तवाऐवजी आदर्शाचे असलेल्या कारणातही शोधले आहे. याबरोबरच मराठी नाटककारांना शेक्सपिअरचे समग्र आणि वास्तव आकलन झाले नव्हते. मराठी नाटककारांचे नाटकाचे संकल्पन हे रोमँटिक होते, अशी मौलिक मीमांसा त्यांनी केली आहे. स्वाभाविकच मराठी नाटककारांच्या दृष्टिकोनावर असलेल्या भारतीयत्वाच्या प्रभावाची ही सखोल मीमांसा आहे.

सुखान्तिका प्रकाराचे स्वरूप विशद करताना त्याची सामाजिक, सांस्कृतिक, पार्श्वभूमी ध्यानात घेतली आहे. मानवी जीवनेच्छाकर्षण, स्त्री-पुरुष प्रेमबंध, हास्य, सत्य प्रीती, जीवनाची आस, सुखात्म जीवनकलह व आनंदविषयक तृष्णा यांत सुखान्तिकेचे वेगळेपण शोधले आहे. या संकल्पनेतील सूक्ष्मता आणि प्रत्यक्षातील मराठी नाट्यस्थितीचे विहंगामवलोकन आहे. खोले यांच्या विवेचनात नाट्यवाङ्मय व परंपरेविषयीची एक इतिहासदृष्टी आहे. ती सूक्ष्म अशा वाचन-व्यासंगातून आलेली आहे. प्रहसन ही रंगभूमीची विशुद्ध अशी निर्मिती आहे, असे सांगून प्रहसनाचे सारे लक्ष नटाच्या शरीराकडे असते- असे नोंदवून चार्ली चॅप्लिनच्या अभिनयाचे नाते प्रहसनाशी जोडले आहे. मेलोड्रामा व प्रहसन हे दोन्ही नाट्यप्रकार पलायनवादी असून ते नैतिक जबाबदारीपासून दूर राहतात असे सुचविले आहे. तर 'समकालीन असण्या'त उपहासिकेचे सामर्थ्य जसे साठविले आहे तशीच तिची मर्यादाही- असा निष्कर्ष नोंदविला आहे. 'मराठीत एकांकिकेला प्रतिष्ठा मिळवून देणारे दोन लेखक म्हणजे पु.ल.देशपांडे व विजय तेंडुलकर', या प्रकारची निरीक्षणे अनेक ठिकाणी आहेत. त्यामुळे विषय संकल्पना

मांडणीबरोबरच त्याला रंगभूमीच्या जडणघडणीचा व्यापक परिप्रेक्ष्य लाभतो. त्यामुळे नाट्यसंकल्पनांच्या स्वतंत्र अर्थनिर्णयनाबरोबर तिच्या सूक्ष्म कंगोऱ्यासह नाट्यपरंपरेच्या इतिहासदृष्टीचे भान त्यात आहे. संहिता, नट, अभिनय, सादरीकरणाबरोबर सामाजिक-सांस्कृतिक परिवेशाच्या सूचना या विवेचनात आहेत.

चौथ्या भागात मराठीतील काही नाट्यरूपांचे विवेचन आहे. पोवाडा, लावणी, फटका, तमाशा, बुकिश नाटक, संगीत नाटक, एकांकिका, नाट्यच्छटा या मराठीतील नाट्यरूपाची माहिती आहे. खास मराठीच्या म्हणून नाट्यरूपाची ही मांडणी आहे. मराठी नाट्यसंस्कृती व लोकरंगभूमीचा परिप्रेक्ष्य त्यामध्ये आहे. दोन शतकांतील मराठीतील नाट्यविषयक रूपमीमांसेचा त्यास आधार आहे. बदलत्या परिमाणातील मराठी रंगभानाची दृष्टी त्यात आहे. नाटक कंपन्या, त्यांचे सादरीकरण, नाट्यकलावंत, संहिता बारकावे, शहरांचे, संस्थांचे, स्थळांचे असंख्य तपशील त्यात आहेत. बुकिश व संगीत नाटके महाराष्ट्रात कुठे सादर होत, त्याबद्दलची विपुल माहिती आहे. मराठी नाट्यरूपाच्या जडणघडणीच्या प्रवासखुणा त्यात आहेत. नाट्यरूपाच्या वाटचालीत प्रत्यक्ष-अप्रत्यक्षणे अध्याहृत असणाऱ्या महाराष्ट्र नाट्यसंस्कृती काळाची पार्श्वभूमी व दिशांचे सूचन आहे. त्यामुळे नाटक व रंगभूमीविषयीची ऐतिहासिक दृष्टी या संग्रहाचा लक्षणीय विशेष आहे. हा परिभाषा संग्रह केवळ नाट्यस्वरूपाकडे लक्ष वेधतो असे नव्हे, तर भारतीय, पाश्चात्त्य नाट्यपरंपरेचा प्रवास आणि गुणविशेष विशद करताना नाट्यस्वरूपाबरोबर समाजसंस्कृती व काळभानाचे अधोरेखन त्यामधून झाले आहे. एका अर्थाने त्या त्या संस्कृतीची रंगभानदृष्टी अप्रत्यक्षपणे त्यामधून सादर झाली आहे. तसेच या परिभाषा संग्रहाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे नाटकाविषयीच्या अनेक अपरिचित संज्ञांचे स्पष्टीकरण. सर्वसामान्यांना अनभिज्ञ वाटाव्यात अशा अनेक नाट्यसंज्ञांचा समावेश यात आहे. उदा. 'विष्कंभक', 'पताका', 'ईहामृगा', 'डिम', 'वीथी', 'डॅमॅटर्जी', 'हॅमिर्शिया', 'ह्युब्रिस', 'काबुकी', 'अपोलो' अशा अनेक नव्या संज्ञांचे स्पष्टीकरण दिले आहे.

नाटक व रंगभूमीविषयक परिभाषा संग्रहाचे वैशिष्ट्य म्हणजे त्याचे सादरीकरण व शैली. या संज्ञा-स्पष्टीकरणात वस्तुनिष्ठता आणि सुस्पष्टता आहे. भाषा सुबोध आणि प्रौढ




आहे. वाचकांना समजावून देण्याची त्यात हातोटी आहे. एखादी संज्ञा घेऊन तिचा अर्थ सांगणे, त्यातील ऐतिहासिक परिवर्तने नोंदवून त्या संज्ञेचा अन्य संबंधित घटकांशी नाते अधोरेखित करणारी ही पद्धत त्यांनी अवलंबली आहे. त्या विषयासंदर्भात अन्य अभ्यासकांची मते देऊन त्याविषयीचे स्वतंत्र असे प्रतिपादनही आहे. विषय अधिक खुलावा म्हणून संस्कृत, पाश्चात्त्य व मराठी नाटकांमधील अनेक उदाहरणे दिली आहेत. त्या त्या विषयाच्या नोंदीच्या प्रारंभी किंवा स्पष्टीकरणार्थ मूळ संस्कृत श्लोकांचा व इंग्रजी अवतरणांचा पदोपदी निर्देश आहे. संस्कृत आणि युरोपिअन नाटकांचा त्यांचा व्यासंग थक्क वाटावा असा आहे. नाटक व रंगभूमी प्रकारांविषयी खोले यांना विशेष आस्था असल्यामुळे त्यांच्या व्यासंग व अन्वेषणाच्या मार्मिक नोंदी सर्वत्र आहेत. त्यामुळे ही शैली वस्तुनिष्ठतेची बाजू दक्ष ठेवून विश्लेषणात्मक मीमांसेच्या प्रांतात शिरते. 'सं. सौभद्र' या नाटकाविषयी त्यांनी लिहिले आहे ते असे, 'झाली ज्याची उपवर दुहिता, चैन नसे त्या तापवि चिंता' अशा निर्मळ कौटुंबिक समस्येचा स्पर्श झालेले, सामाजिक जिव्हाळ्याच्या नात्यात पौराणिकता मिसळवून टाकणारे आणि रसिकवृत्ती हसत्या खेळत्या ठेवीत उत्कट जिव्हाळ्याने सामाजिक पातळीवरील कथेशी एकजीव झालेले आनंदमय कौटुंबिक नाटक सौभद्र १८८३ पासून मराठी रंगभूमीच्या अखंड शिरोभागी राहिले.' अशा भाषेत सौभद्रची ऐतिहासिक कामगिरी विशद केली आहे.

त्यासाठी त्यांनी भाषेचा रास्त, यथोचित आणि प्रगल्भ वापर केला आहे. ही विवरणशैली प्रौढ आणि प्रगल्भ स्वरूपाची आहे. उदा. ‘प्रेक्षक अधिकारी असणे म्हणजे विमल प्रतिभेने संपन्न असे हृदय असलेला मनुष्य’ किंवा रसविचारासंदर्भात बेडेकरांचे उदाहरण त्यांनी बेडेकरांच्याच शब्दांत ‘वीरपुरुषांच्या हौतात्म्यतेचा आनंद कृतार्थता व ध्येयपूर्तीचा असतो.’ असे म्हटले आहे. नाट्यस्वरूपातील व इतिहासक्रमातील सूक्ष्म बारकावे त्यांनी जागोजागी नोंदवले आहेत. ‘पूर्वरंग हा देवदेवतांना प्रसन्न करण्याचा नाट्यारंभीचा विधी आहे’, ‘आहार्य अभिनय म्हणजे नेपथ्यकर्म,’ अशी भाषास्थळे सबंध संग्रहात विखुरली आहेत.

या परिभाषा संग्रहाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे, मराठीत संशोधनात्मक लेखन बव्हंशी वेळा पसरट, आस्वादपर, वर्णनात्मक स्वरूपाचे असते. त्यात वस्तुनिष्ठतेचा अभाव असतो. अलंकारिक भाषेचा आश्रय तसेच अनौपचारिक गोष्टीवेल्हाळ बऱ्याचदा दिसतो. त्यामुळे त्यात नेमकेपणाचा अभाव असतो. खोले यांनी प्रास्ताविकात म्हटले आहे की, आजवर एकाही मराठी अभ्यासकाने नाट्यविषयक लेखन करताना इतके मूलाधार दिलेले नाहीत. ना संस्कृत, ना इंग्लिश. हे एका अर्थाने खरेच आहे. या पार्श्वभूमीवर या लेखनाचे महत्त्व ध्यानात येते. त्यांचा स्वतःचा वाङ्मयकलादी विषयाचा व्यासंग तसेच इंग्रजी-मराठीतील ७० ग्रंथांची संदर्भसूची आहे. या पार्श्वभूमीवर खोले यांची लेखनशैली अत्यंत चिकित्सक, वस्तुनिष्ठ आणि प्रगल्भ स्वरूपाची आहे. त्यात विश्वासार्ह व्यासंग संदर्भाचा मोठा पट आहे. ती लक्ष्यविषयाला केंद्र करून नेमकेपणाला महत्त्व देणारी आहे. त्यामुळे नाटक व रंगभूमीविषयीच्या माहितीची विश्वसनीयता हे या परिभाषा संग्रहाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. या परिभाषा संग्रहाचे निर्मितिमूल्य हे गुणसंपन्न आहे. बऱ्याचदा शासकीय ग्रंथ फार निष्काळजीपणे छापले जातात. या संग्रहात लेखनविषयक नियमांचा अत्यंत काटेकोर अवलंब केला आहे. संस्कृत, मराठी, इंग्रजी भाषांतील लेखन त्या त्या ठिकाणी मुळाबरहुकूम व अधिक काटेकोरपणे नोंदविले आहे. आजच्या अभ्यासक्षेत्रात एवढे मुद्रणसौंदर्य अपवादभूत म्हणावे लागते. भाषेतील लिपिचिन्हे नेमकेपणाने नोंदविण्याचा कटाक्ष सर्वत्र सांभाळला आहे. संस्कृत, इंग्रजी मूळ शब्द व व्याकरणिक रूपांची अचूक मांडणी आहे.

एखाद्या विषयावरील इतकी सांगोपांग, प्रदीर्घ स्वरूपाची ग्रंथनिर्मिती करणे हे काम मोठे आव्हानप्रद आणि जिकिरीचे काम असते. त्यासाठी एकाच वेळी अनेक पातळ्यांवरील अवधाने अभ्यासकाला सांभाळावी लागतात. व्यासंग, चिंतन, विषयकार्यकक्षा, व्याप्ती आणि तिच्या मर्यादा, अभ्यासविषयाबद्दलची चिंतनदृष्टी तसेच त्या विषयाच्या खोलवरच्या जिज्ञासा व आस्थेमुळे अशा प्रकारची दुर्लभ कार्ये सिद्धीस जातात. हा परिभाषा संग्रह या गुणांचे उत्तम उदाहरण आहे. विलास खोले यांच्या दीर्घ व्यासंग-साधनेचे फलस्वरूप म्हणजे हा संग्रह. मराठी ज्ञानपरंपरेला समृद्धता प्राप्त करून देणारे हे कार्य आहे. भविष्यात या परिभाषा संग्रहाचे मुद्रण झाल्यास समकालीन जागतिक रंगभूमीविषयक काही संज्ञांचा व मराठी रंगभूमी व नाटकाविषयी निश्चितच भर घालता येऊ शकेल. उदा. पथनाट्य, रिंगणनाटक वा राजकीय चर्चानाटक यांसारख्या विषयांचा त्यात समावेश होऊ शकेल.

एकंदरीत, मराठी ज्ञानपरंपरेत मौलिक ठरावा असा हा नाटक आणि रंगभूमीविषयीचा परिभाषा संग्रह आहे. नाटक व रंगभूमीविषयीची पायाभूत आणि सांगोपांग माहिती यामध्ये समाविष्ट आहे. सर्वसामान्य वाचक-प्रेक्षक, नाट्यलेखक, रंगकर्मी आणि विद्यार्थी-संशोधक यांना उपयुक्त असा हा परिभाषा संग्रह आहे. भारतीय, जागतिक नाट्यविचारांच्याबरोबर मराठी रंगभूमीचा मागोवा आणि ऐतिहासिक विमर्श त्यामध्ये आहे. नाट्यसृष्टीचे रंगभान उजळविणारा हा परिभाषा संग्रह आहे. नाटक व रंगभूमीविषयीची इतकी इत्यंभूत माहिती असणारा हा मराठीतील पहिलाच परिभाषा संग्रह असल्यामुळे सतीश आळेकर यांनी त्यास ‘नाटकज्ञानाचा नवा मूलभूत वाचनीय ग्रंथ’ म्हटले आहे.

**रणधीर शिंदे,** कोल्हापूर
Mob. 9890913031

**नाटक आणि रंगभूमी परिभाषा संग्रह**
(ऐतिहासिक व विवरणात्मक पर्यालोचन)
लेखक : विलास खोले
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.
पृष्ठे : ८२७, मूल्य : २६३ रुपये

डॉ. अजित मगदूम

# चंद्रपूरची दारूबंदी उठवण्याचा निर्णय : सरकारची मनमानी ?

अवैध दारू थांबवणं हे सरकारचे काम नाही का? बरे- जिथे बंदी नाही तिथे अवैध दारूची विक्री होत नाही असं सरकार ठामपणे म्हणू शकतं का? अवैध दारूला आळा घातला असता तर लहान मुलांच्या दारू-तस्करीचा, गुन्हेवाढीचा प्रश्नच आला नसता. आणि अशा कारणासाठी दारूबंदीच उठवायची? मग अवैध गुटखा मिळतो म्हणून गुटखाबंदी उठवायची, छुपा हुंडा दिला जातो म्हणून हुंडाबंदी कायदा रद्द करायचा का? असे असेल तर सर्वच कायदे मागे घ्यायला पाहिजेत. दारूबंदी अंमलबजावणीत शासन-प्रशासनाच्या अपयशामुळे निर्माण झालेला असंतोष दारूबंदी उठविण्यासाठी सोईस्करपणे वापरला गेला आहे. बिहार राज्याच्या दारूबंदीमुळे झालेला बदल आणि फायद्यांचे मूर्तिमंत उदाहरण आपल्या समोर असताना राज्य सरकारचा हा निर्णय चंद्रपूरच्या जनतेला क्लेश देणारा आहे.

महाराष्ट्र राज्याच्या हीरक महोत्सवी वर्षादरम्यान राज्याच्या महाविकास आघाडी सरकारच्या मंत्रिमंडळाने चंद्रपूर जिल्हा दारूबंदी उठविण्याचा निर्णय घेऊन महाराष्ट्राच्या व्यसनमुक्ती चळवळीला मोठा धक्का दिला आहे. भलेही यामागे चंद्रपूरच्या पालकमंत्र्यांची आततायी आणि अट्टाहासी भूमिका असेल, पण असा लाखोंना व्यसनांच्या जाळ्यात ओढू पाहणारा उफराटा निर्णय घेताना सबंध मंत्रिमंडळाचे साह्य ठरणं ही चिंतेची बाब आहे. लोकहिताच्या विचाराला आणि महाराष्ट्राच्या एकूणच नैतिक परंपरेला गुंडाळून हा निर्णय घेण्यात आला आहे. जिल्ह्यातील दारूबंदीमुळे दारू व्यावसायिकांची 'उपासमारी' पाहून ना. विजय वडेट्टीवार यांना त्यांचा कळवळा आला असणार. मग २०१९ च्या निवडणुकीत नेत्यांनी ही 'जाचक' दारूबंदी उठवण्याची आश्वासने दिली. आणि मंत्रिमंडळाने सामान्य जनतेच्या असंख्य समस्यांबरोबर कोविडच्या काळात आरोग्याचे अनेक प्रश्न समोर 'आ' वासून उभे असताना चंद्रपूर जिल्ह्यातील लाखो आयाबायांच्या पोटात धडकी भरणारा हा काळा निर्णय घेतला. मंत्रिमहोदयांनी गर्दीत खोटा पैसा चालवून आश्वासनपूर्तीचं समाधान मिळवलं हे मात्र खरं.

महाराष्ट्रातील समाजसुधारकांच्या विचारांचा वारसा, संतांची शिकवण, चंद्रपूर जिल्ह्याचे आध्यात्मिक अधिष्ठान राहिलेले संत तुकडोजी महाराज, म. फुले, म. गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या साऱ्यांच्या विचारांना तिलांजली देणारा हा निर्णय २७ मे २०२१ रोजी (पं.जवाहरलाल नेहरू यांच्या पुण्यतिथी दिनी!)घेण्यात आला.

**पाच वर्षे दिलेल्या लढ्याचं हे फलित?**

दारूबंदी आणण्याचा निर्णय सहजासहजी झाला नव्हता. २०१० पासून साडेचार-पाच वर्षे पारोमिता गोस्वामी, विजय सिद्धेवार आदी कार्यकर्त्यांनी दारूबंदी आणण्यासाठी जिवाचं रान केलं होतं. २०१० मध्ये



जिल्ह्यातील ५००० महिलांनी चिमूर ते नागपूर १५० किलोमीटरची १० दिवस पदयात्रा काढून विधानभवनाला धडक दिली होती. नागपूर येथे २०१२ मध्ये ४०००० महिलांचा भव्य मोर्चा हिवाळी अधिवेशनात सरकारचं लक्ष वेधण्यासाठी काढला होता. या वेळी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी दारूबंदीचा निर्णय एक महिन्यात घेऊ, असं आश्वासन दिलं. एक महिना उलटून गेला तरी तसे काही घडले नाही म्हणून २६ जानेवारी २०१३ रोजी जेल सत्याग्रह आंदोलन छेडलं, त्या वेळी त्यातील १०० पुरुष व १०० महिला सत्याग्रहींना ८ दिवस जेलमध्ये डांबलं. जिल्ह्यातील ८४७ पैकी ५८८ ग्रामसभांनी ठरावाद्वारे दारूबंदीची मागणी केली. मुख्यमंत्र्यांना एक लाख पत्रे पाठवली. पालकमंत्री संजय देवतळे यांच्या घरासमोर २०० महिलांनी मुंडन करून आंदोलन केले तेव्हा कुठे सरकार हलले. संजय देवतळे समिती गठित केली. त्याचा अहवाल आला तरी त्या वेळच्या काँग्रेस आघाडी सरकारला आयाबायांनी केलेल्या जिवाच्या आकांताचा विसर पडला. हे सगळं सविस्तर सांगण्याचं कारण म्हणजे गोरगरीब महिलांना, कार्यकर्त्यांना सरकार किती झुंजवतं आणि झिजवतं हे लक्षात यावं. हा कुठल्या देशाच्या स्वातंत्र्याचा लढा नव्हे. तर कमावलेला पैसा दारूत जाऊन कुटुंबाची वाताहत होते म्हणून लोकशाही, अहिंसा व शांततेच्या मार्गाने दिलेला हा लढा होता. शेजारच्या जिल्ह्याप्रमाणे आपल्याही जिल्ह्यात दारूबंदी व्हावी, जगणं सुकर व्हावं केवळ यासाठीच हा लढा होता. आणि महत्त्वाचे म्हणजे संविधानातील कलम ४७चा भक्कम आधार या आंदोलनाला बळकटी देणाराच आहे.

नंतर सत्तेवर आलेल्या भाजप सरकारने १ एप्रिल २०१५ रोजी चंद्रपूर जिल्ह्यात दारूबंदी घोषित केली. त्या वेळी या दारूबंदी निर्णयाविरुद्ध उच्च न्यायालयात दाखल केलेल्या सहाच्या सहा जनहित याचिका फेटाळल्या होत्या. शिवाय सर्वोच्च न्यायालयात गेलेल्या दोन्ही याचिकाही फेटाळल्या गेल्या. दोन्ही न्यायालयांत संविधानातील कलम ४७चा आधार घेतला होता. शासनाने हा निर्णय घेताना हे विचारात घेणे आवश्यक होते.

**बंदीकाळात संसार सुखाचा**

दारूबंदी झाली तेव्हापासून सहा वर्षे जिल्ह्यातील हजारो महिलांचे संसार छान सुरळीत, सुखात सुरू होते. दारू खुली मिळत नव्हती. त्यामुळे भांडण, शिवीगाळ, मारहाणीपासून त्यांची सुटका झाली होती. एका महिलेची प्रतिक्रिया होती की, आम्हांला दारूबंदीच्या काळात रात्री अकरा वाजले तरी फिरता येत होते, कारण एकही बेवडा दिसायचा नाही. पण आता बाहेरपेक्षा घरातल्या असुरक्षिततेचं संकट मोठं आहे. एका मद्यपीमुळे सारे कुटुंब भरडून निघते; आप्त, मित्र मिळून साधारण २० लोक व्यथित असतात. दारूची सवय लागण्यामागची जी कारणे सांगितली जातात त्यातील एक आहे, सहज उपलब्धता. गावात दारूचे दुकान, बार असेल तर नव्याने पिणाऱ्यांची म्हणजेच तरुणांची संख्या जास्त असते. उदा. चंद्रपूरमधील एक हजार तरुणांनी समजा, नववर्ष स्वागत पार्टीनिमित्त पहिल्यांदा चव घेतली असेल तर यातील १५ टक्के म्हणजे १५० तरुण पुढच्या आयुष्यात मद्यपी होतात असं संशोधन सांगतं. म्हणजे ५ वर्षांत दारूबंदी सल्ल्यामुळं ७५० तरुण मद्यपी होण्यापासून वाचले! या निर्व्यसनी, ताज्या दमाच्या मनुष्यबळाची किंमत पैशात मोजता येणार नाही.

**दारूबंदी उठवण्याची कारणे तरी काय?**

गुन्ह्यांची संख्या वाढली, अवैध दारूचा मोठ्या प्रमाणात वापर, अवैध दारूच्या तस्करीत लहान मुलांचा वापर व महसुलात घट ही कारणे दिली आहेत. खरं तर यातलं शेवटचंच कारण खरं आहे. हा सगळा दारूबंदीचा खटाटोप मंत्रिमहोदयांनी केला तो महसुलासाठीच.

बाकीची जी कारणे आहेत ती दाखवण्यासाठीच. ही कारणे निराधार वाटू नयेत म्हणून सरकारने रामनाथ झा समिती गठित केली. या समितीचा अहवाल मिळावा म्हणून रीतसर माहितीच्या अधिकारांतर्गत अर्ज केला तर तो गोपनीय असल्याचं सरकारकडून उत्तर देण्यात आलं! जनतेच्या आरोग्याशी, किंबहुना आयुष्याशी संबंध असलेला अहवाल गोपनीय म्हणताच येत नाही. ज्यांनी हा अहवाल वाचला आहे त्यांनी यात दारूबंदी उठवावी असं कुठंही म्हटलं नसल्याचं सांगितलं.

**दारूबंदी उठवण्याची घाई किती?**

दारूबंदी आणण्यासाठी तब्बल साडेचार वर्षे लाखो स्त्री-पुरुषांना अथक परिश्रम घ्यावे लागले. दारूबंदी उठवण्यासाठी एक तरी मोर्चा, आंदोलन झाले का? ही जनतेची मागणी होती का? झा समितीच्या ४९ दिवसांत ११ ऑनलाइन बैठका घ्यायला लागलेला २२ ते ३३ तास एवढाच काय तो कालावधी. शासनाने ही अपवादात्मक कार्यक्षमता दारूबंदीच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी वापरली असती तर चंद्रपूर दारूबंदी मॉडेल सबंध राज्यभर वापरता आले असते.

**दारूबंदी अपयशी की सरकार?**

चंद्रपुरात दारूबंदी 'फेल' झाली असं बोललं जाऊ लागलं. पण वर दिलेली कारणं हे सरकारच्या अंमलबजावणीतलं अपयश आहे. महसुलात घट येणार हे उघड व अपेक्षितच होतं. त्यासाठीच ५० कोटी वार्षिक निधीची तरतूद केली होती पण कार्यवाही झाली नाही. अवैध दारू थांबवणं हे सरकारचे काम नाही का? बरे-जिथे बंदी नाही तिथे अवैध दारूची विक्री होत नाही असं सरकार ठामपणे म्हणू शकतं का? अवैध दारूला आळा घातला असता तर लहान मुलांच्या दारू-तस्करीचा, गुन्हेवाढीचा प्रश्नच आला नसता. आणि अशा कारणासाठी दारूबंदीच उठवायची? मग अवैध गुटखा मिळतो म्हणून गुटखाबंदी उठवायची, छुपा हुंडा दिला जातो म्हणून हुंडाबंदी कायदा रद्द करायचा का? असे असेल तर सर्वच कायदे मागे घ्यायला पाहिजेत. दारूबंदी अंमलबजावणीत शासन-प्रशासनाच्या अपयशामुळे निर्माण झालेला असंतोष दारूबंदी उठविण्यासाठी सोईस्करपणे वापरला गेला आहे. बिहार राज्याच्या दारूबंदीमुळे झालेला बदल आणि फायद्यांचे मूर्तिमंत उदाहरण आपल्या समोर असताना आणि जागतिक पातळीवर दारू व सर्वच व्यसनांच्या वापरावर विविध मार्गांनी नियंत्रणे आणली जात असताना राज्य सरकारचा हा निर्णय चंद्रपूरच्या जनतेला क्लेश देणारा आहे.

**व्यसनमुक्त महाराष्ट्र मंचाने काय केले?**

या मंचाच्या स्थापनेपासून गेल्या ४ वर्षांत पुरोगामी महाराष्ट्र राज्याच्या हीरक महोत्सवी वर्षात व्यसनमुक्त महाराष्ट्र म्हणून घोषित व्हावा म्हणून प्रत्येक अधिवेशनात धरणे धरली आहेत. निवेदने दिली आहेत. जनजागृती करीत आहे. चंद्रपूरनंतर यवतमाळ, नगर, बीड इथे दारूबंदीसाठी कार्यकर्ते झटत आहेत. अशा वेळी चंद्रपूरची दारूबंदी उठवल्याने कार्यकर्त्यांची घोर निराशा तर झालीच; पण त्याहूनही अपमान झाल्याची भावना जास्त सलणारी आहे. बंदी उठवण्याची कुणकुण लागताच रामनाथ झा यांना निवेदन देणं, मुख्यमंत्र्यांची भेट मिळवणं, ते नाही झालं म्हणून त्यांना निवेदने देणं, स्मरणपत्रे देणं, इतर मंत्री, लोकप्रतिनिधी इ.ना भेटणं असे अनेक प्रयत्न केले. पावसाळी अधिवेशन दोन दिवसांचं असलं तरी मंचाने धरणे धरले. पण शासनातर्फे कोणतीही दाद घेतली गेली नाही. विरोधी पक्षनेते भेटीला आले म्हणून त्यांना निवेदन दिले. अखेरीस राज्यपालांना भेटून आमचं निवेदन दिलं. ऑगस्ट क्रांतिदिनी दोन कार्यकर्त्यांनी शासनाने दिलेले राष्ट्रपिता म.गांधी व्यसनमुक्ती सेवा पुरस्कार दारूबंदी उठवण्याच्या निषेधार्थ शासनाला परत केले. जनतेची कोणतीही मागणी नसताना केवळ मंत्र्यांच्या स्वार्थासाठी कोणतेही सबळ कारण नसताना अतार्किक, मनमानी पद्धतीने घेतलेला हा निर्णय अत्यंत दुर्दैवी आहे. शासनाने आपला निर्णय मागे घेऊन दारूबंदीची अंमलबजावणी पूर्ण क्षमतेने करावी हेच तर्कसुसंगत, न्यायसुसंगत व संविधानाला धरून होईल. यासाठीच हे सगळे निकराचे प्रयत्न समन्वय मंचातर्फे केले जात आहेत. आता एकच पर्याय उरतो तो न्यायालयाचा. तिथे मात्र आम्हांला न्याय मिळेल याचा विश्वास वाटतो.

**डॉ. अजित मगदूम,** बेलापूर
Mob.75060 67709

इंग्रजी पुस्तक

अभय दातार

# समकालीन चीनवरील दृष्टिक्षेप

या पुस्तकात कृष्णन यांनी सातत्याने एक मुद्दा मांडला आहे आणि तो म्हणजे आपल्याला चीनबद्दल पुरेशी माहिती नाही आणि आपल्या देशात पाश्चात्त्य देशांचा तुलनेमध्ये चीनचा अभ्यास होत नाही. मोजक्याच भारतीय वृत्तसंस्था आणि वर्तमानपत्रांचे चीन प्रतिनिधी आहेत तर दूरचित्रवाणी वाहिन्यांचे कोणीच नाही. कोणे एके काळी कोलकाता शहरात चिनी वंशाच्या नागरिकांची संख्या लक्षणीय होती. पाश्चात्त्य जगाकडे होणाऱ्या स्थलांतरामुळे ती रोडावत आहे आणि त्यामुळे दोन्ही देशांत सांस्कृतिक दूताची भूमिका बजावू शकेल असे कोणी आपल्याकडे उपलब्ध नाही, हे ते वाचकांना सांगतात. या सगळ्यांमुळे या अज्ञानात भरच पडते. हे अज्ञान आपल्याला परवडण्यासारखे नाही आणि आपण त्यावर उपाययोजना केल्या पाहिजेत. हे या पुस्तकाचे मुख्य सूत्र आहे असे म्हटले तरी चालेल.

गेल्या एक-दोन वर्षांत चीनसंदर्भात अनेक घडामोडींनी जगाचे आणि अर्थात भारतीयांचे लक्ष वेधून घेतले. भारत-चीन सीमावाद पुन्हा उफाळून आला आणि चीनशी असलेल्या आपल्या संबंधांची चर्चा जोमाने सुरू झाली. शिवाय कोविड-१९ या विषाणूच्या प्रसाराला चीनमधून सुरुवात झाली, या साथीची त्या देशाने यशस्वीरीत्या हाताळणी केले असे वाटत आहे आणि या सगळ्यांचा त्यावर फारसा आर्थिक परिणाम झालेला दिसत तरी नाही. अलीकडेच चीनच्या सत्ताधारी साम्यवादी पक्षाने आपली शताब्दी साजरी करीत आपला देश अधिक बलशाली करायचा निर्धार बोलून दाखविला. चीनचा आंतरराष्ट्रीय राजकारणातील आणि त्यातदेखील दक्षिण आशियाच्या राजकारणाचा वाढता सहभाग, त्याची आर्थिक घोडदौड आदींमुळे चीनबद्दलच्या कुतूहलाला उधाण आले.

भारतीयांना आणि त्यातदेखील इंग्रजी वाचणाऱ्या मंडळींना हे कुतूहल शमवायचे असेल तर मुख्यतः पाश्चात्त्य जगतातील लेखकांच्या लिखाणावर विसंबून राहावे लागते. त्यातही अमेरिका, इंग्लंड किंवा फार फार तर ऑस्ट्रेलियातील लेखकांची पुस्तके आपल्याला सहज उपलब्ध होतात. जपान, रशिया, दक्षिण कोरिया आदी चीनच्या शेजारील देशांमधील मंडळींची चीनविषयक भूमिका काय आहे हे आपल्याला माहीत नसते. भारतीयांनी स्वानुभावावर आधारित किंवा विशेष अभ्यास करून लिहिलेली पुस्तके तर अल्पच आहेत.

या पार्श्वभूमीवर अनुभवी पत्रकार अनंथ कृष्णन यांचे हे पुस्तक महत्त्वाचे आहे. ते एका दशकापेक्षा अधिक काळ बीजिंगमध्ये पत्रकार म्हणून कार्यरत आहेत. प्रारंभी 'इंडिया टुडे'चे ते प्रतिनिधी होते, तर सध्या ते 'द हिंदू'चे चीनमधील प्रतिनिधी आहेत. त्यांच्या या अनुभवाचे हे पुस्तक फलित आहे. पत्रकार या नात्याने त्यांना चीनमध्ये बरेच फिरता आले. एका बाजूला विविध प्रदेशांतील विविध लोकांशी

झालेल्या संवादातून तर त्याला इतिहास-राजकारणाच्या बारकाव्याची जोड देत पुस्तक आपल्याला चीनचे दर्शन देते.

पुस्तकातील सर्वांत महत्त्वाचा विभाग हा अर्थातच चीनचे राजकारण आणि अर्थव्यवस्थेची तसेच भारत-चीन साम्यवादाच्या इतिहास-वर्तमानाची चर्चा करणारा होय. गेल्या काही वर्षांत चीनचे सर्वेसर्वा शी जिनपिंग. त्यांनी तुंग शाओपिंग यांनी घालून दिलेली सामूहिक नेतृत्वाची चौकट मोडीत काढून स्वतःच्या हातांत सत्ता केंद्रित केलेली आहे. एकपक्षीय राजवटीचे रूपांतर आता एका व्यक्तीच्या राजवटीत झाले आहे, ही या संदर्भातील कृष्णन यांची टिप्पणी मार्मिक आहे. जिनपिंग यांच्या सत्तेतील वाटचालीच्या प्रवासाचे तपशील रोचक आहेत. चिनी साम्यवादी पक्षाच्या महासचिवपदी येता येता त्यांनी भ्रष्टाचारविरोधी मोहीम हाती घेतली. त्यामुळे काही वरिष्ठ अधिकाऱ्यांनी आत्महत्या केल्या, हे वाचून आपल्याकडील वाचकांना आश्चर्य निश्चित वाटेल. पक्षाची लष्करावरील पकड अधिक पक्की केली. अर्थात हा सगळा उद्योग आपली सत्ता अधिक पक्की करण्यासाठी होता हे उघडच आहे.

पण एकाहाती सत्ता असण्याचे तोटेदेखील असतात. माओ यांच्या हातात अशाच प्रकारे सत्ता एकटवल्यानंतर चीनमध्येच काय काय घडले हे काही अज्ञात नाही. त्यामुळे जिनपिंग यांच्या हातांत सर्व सूत्रे एकटविल्याचे चीनवर आणि अर्थातच चीनच्या साम्यवादी पक्षावर काय परिणाम होतील, या बाबत कृष्णन यांनी काहीतरी भाष्य करायला हवे होते, पण पुस्तकात ते नाही.

चीनची गेल्या काही दशकांतील आर्थिक आणि भौतिक प्रगती स्तिमित करणारी आहे. त्याचे श्रेय चीनच्या नेतृत्वाला दिलेच पाहिजे. या संदर्भात परकीय गुंतवणुकदारांचे स्वागत आणि औद्योगीकरणाला प्रोत्साहन या धोरणाचा स्वीकार आणि अंमलबजावणी करण्याच्या आधी चीनने शिक्षण आणि आरोग्य या क्षेत्रांमध्ये लक्षणीय गुंतवणूक केली, ही कृष्णन यांची नोंद महत्त्वाची आहे. महासत्ता, विश्वगुरू होण्याची महत्त्वाकांक्षा बाळगणाऱ्या आपल्या देशात काय परिस्थिती आहे हे वेगळे सांगण्याची गरज नाही.

पण आर्थिक प्रगतीचा वेग वाढवता आला नाही, तरी तो किमानपक्षी कायम ठेवणे हे आज चीनसमोरील सर्वांत मोठे आव्हान आहे. शिवाय या भौतिक प्रगतीच्या नादात समाजात एक प्रकारचे नैतिक पोकळी जाणवत आहे, असे कृष्णन यांना भेटलेल्या काहींनी सांगितले. या दोन आव्हानांना कसे सामोरे जायचे हा चीनच्या सत्ताधारी मंडळींसमोरचा प्रश्न आहे. या आव्हानांचा सामना करण्यात विद्यमान सत्ताधाऱ्यांना किती यश मिळेल; यावर त्यांचे सत्तेवरील राहणे अवलंबून आहे; हे कृष्णन यांचे निरीक्षण महत्त्वाचे आहे. जिनपिंग यांच्या अलीकडच्या वक्तव्यांमधून कृष्णन यांनी काही निष्कर्ष मांडले आहेत. त्यांच्या मते या सगळ्यांवर चिनी राष्ट्रवादाचा जागर आणि उद्घोष हा उपाय स्वीकारला जाईल. चीनच्या साम्यवादी पक्षाच्या शताब्दीनिमित्त जिनपिंग यांनी नुकत्याच केलेल्या भाषणातून हे सूचित केलेले दिसते. त्यामुळे या पुढील काळात चीनचा जगापुढे पाहण्याचा दृष्टिकोन हा राष्ट्रवादावर आधारित असेल असेच दिसते. पण मग या सगळ्यांत आंतरराष्ट्रीय वादावर आधारित मार्क्सवादाचे काय स्थान असेल हा प्रश्न पडतो. त्यावर कृष्णन काहीच टिप्पणी करीत नाहीत.

भारत-चीन सीमावाद हा तसा इतिहासातील म्हणजेच इंग्रजी राजवटीतील निर्णय-धोरणांचा परिणाम आहे. १९६२ च्या युद्धाने त्यातील गुंतागुंत वाढली. त्याची विस्तृत चर्चा पुस्तकात आहे. १९८९-१९९० च्या दशकांपासून भारत-चीनदरम्यान या संदर्भात चर्चेच्या अनेक फेऱ्या झाल्या आहेत. त्याचे तपशील वाचनीय आहेत. या वादावर संभाव्य तोडगा काय असू शकतो, याबद्दलचे कृष्णन यांचे मत महत्त्वाचे आहे. त्यांच्या मते व्यापक अर्थाने आज रोजी सीमेवर जी परिस्थिती आहे तीच कायम ठेवणे हा या प्रश्नाचा एका अर्थाने कायमस्वरूपी तोडगा ठरेल. म्हणजेच अक्साई चीनच्या फाळणीस भारताने मान्यता द्यायच्या बदल्यात चीनने अरुणाचल प्रदेश हा भारताचा भाग आहे, यास मान्यता द्यायची असाच काहीसा तोडगा चीनने १९६० मध्ये सुचविल्याची या विषयाच्या जाणकारांना माहिती आहे. त्या वेळी चीनवर विश्वास ठेवता येईल का तसेच चीनच्या मागण्या मान्य केल्या तर भविष्यात चीन अधिकच्या मागण्या करणार नाही का, या शंकांमुळे असा तोडगा फेटाळण्यात आला होता. या शंका आजदेखील कायम आहेत. मात्र त्याबद्दल कृष्णन काही मत व्यक्त करीत नाहीत.

पुस्तकातील दोन नोंदी रोचक आहेत. पहिली म्हणजे काही दशकांपूर्वीच्या तुलनेत आज तरुण पिढीला अधिक स्वातंत्र्य आहे. वैयक्तिक जीवनात काय करायचे, व्यवसाय कोणता निवडायचा इत्यादींच्या संदर्भातील मर्यादा कमी झाल्या आहेत, पण एक बंधन कायम आहे. ते पाळल्यासच या विस्तारित स्वातंत्र्याचा उपभोग घेता येतो. हे बंधन म्हणजे

राजकारणापासून दूर राहा. दुसरी नोंद चीनच्या लष्करासंदर्भातील आहे. चीनचे लष्कर हे चिनी राज्यसंस्थेचे नसून चीनच्या साम्यवादी पक्षाचे लष्कर आहे. त्यामुळे ते चीनच्या राज्यसंस्थेशी नव्हे, तर पक्षाशी एकनिष्ठ आहे. ही बाब लक्षात घेण्यासारखी आहे. त्यामुळे भविष्यात जर चीनच्या साम्यवादी पक्षाच्या सत्तेवरील मक्तेदारीला आव्हान मिळाले तर लष्कर काय करेल, याचे उत्तर उघड आहे. या निष्ठा कायम राहाव्यात यासाठी जिनपिंग यांचे प्रयत्न अर्थातच चालू आहेत.

तसेच शिनजांग यांनी तिबेट आणि हाँगकाँग या चीनच्या सीमाभागातील घटना-घडामोडींचा त्यांनी सविस्तर आढावा घेतला आहे. तेथील ताणतणाव, चीन सरकारचे धोरण आणि स्थानिकांचा प्रतिकार-प्रतिसाद-प्रतिक्रिया यांचे तपशिलातून बरेच काही उमगते. पुस्तकात शेवटी विविध क्षेत्रांत कार्यरत असणाऱ्या ६ चिनी नागरिकांचा परिचय दिला आहे. त्यातील एक आहेत चीनच्या दक्षिण किनारपट्टीवरील एका शहरातील संग्रहालयाच्या संचालिका. या शहराचा भारताशी प्राचीन आणि मध्ययुगात मोठ्या प्रमाणात व्यापार चाले आणि तेथे भारतीय व्यापाऱ्याची मोठी वस्ती होती, हे तेथे सापडलेल्या मंदिरांच्या व हिंदू देवदेवतांच्या मूर्तींच्या अवशेषांवरून कळते. दुसरे एक आहेत पीकिंग विद्यापीठातील संस्कृतचे प्राध्यापक. तिबेटमधील विविध मठांमध्ये विखुरलेल्या संस्कृत हस्तलिखितांचा अभ्यास हा त्यांचा अध्ययनाचा खास विषय. चीनमधील संस्कृत, प्राकृत, पाली आदी भाषांचा अभ्यास वाढविण्यासाठी होणाऱ्या प्रयत्नांना भारतीय विद्यापीठांच्या तुलनेत पाश्चात्त्य संस्थांचा अधिक प्रतिसाद मिळतो, अशी खंत ते व्यक्त करतात. तिसरे आहेत गुरुदेव रवींद्रनाथांच्या काव्याचे अनुवादक. या अनुवादाचा प्रचंड खप झाला. पण सरकारी अवकृपेमुळे प्रकाशकांनी त्याच्या प्रती परत मागविल्या. तर चौथी आहे आमिर खान यांची चाहती आणि पाचवी आहे क्रिकेटमध्ये करिअर करू इच्छिणारी तरुण मुलगी. यामुळे पुस्तकाला एक जिवंतपणा येतो. तसेच सामान्य चिनी नागरिकांमध्ये भारताबाबत बरीच आस्था आहे असे वाटत राहते.

समारोप काहीसा असामाधानकारक आहे. कोविड-१९ ने घातलेला धुमाकूळ हा चिनी साम्यवादी पक्षाच्या सत्तेवरील पोलादी पकडीला गेल्या काही वर्षांत मिळालेले मोठे आव्हान होय. या धुमाकुळामुळे देशाचा कारभार आपणच योग्य पद्धतीने चालवू शकतो आणि आपण नसलो तर गोंधळ माजेल हा पक्षाचा दावा प्रश्नांकित झाला आहे. साहजिकच आता पुढे काय, असा प्रश्न उपस्थित होतो. चीनसारख्या मोठ्या सत्तेचे भविष्य वर्तविणे सोपे नसले तरी कृष्णन यांनी आपला स्वतःचा अंदाज तरी व्यक्त करायला हवा होता. त्याऐवजी अमेरिकेतील ज्येष्ठ चीन अभ्यासक प्रा. डेव्हिड शॅमबॉ यांनी व्यक्त केलेल्या चार शक्यता नोंदवून थांबतात.

या अनुषंगाने पुस्तकाबद्दल एक निरीक्षण नोंदवावेसे वाटते. यात विस्तृत भाष्यांचा अभाव जाणवतो किंवा तसे करण्याचे हेतुतः टाळले आहे असे वाटते. तपशील-निरीक्षणे-अनुभवांची रेलचेल आहे, ते पुस्तकाचे बलस्थान आहेच. पण त्यात विविध मुद्द्यांची विस्ताराने चर्चा केली असते तर बरे झाले असते. चीनसारखा अवाढव्य देश समजून घेण्यासाठी दशकभराचा अनुभव पुरेसा नाही ही आपली जी धारणा कृष्णन यांनी प्रस्तावनेत नोंदविली आहे कदाचित त्यामुळेदेखील हे असे झाले असेल.

या पुस्तकात कृष्णन यांनी सातत्याने एक मुद्दा मांडला आहे आणि तो म्हणजे आपल्याला चीनबद्दल पुरेशी माहिती नाही आणि आपल्या देशात पाश्चात्त्य देशांच्या तुलनेमध्ये चीनचा अभ्यास होत नाही. मोजक्याच भारतीय वृत्तसंस्था आणि वर्तमानपत्रांचे चीन प्रतिनिधी आहेत तर दूरचित्रवाणी वाहिन्यांचे कोणीच नाही. कोणे एके काळी कोलकाता शहरात चिनी वंशाच्या नागरिकांची संख्या लक्षणीय होती. पाश्चात्त्य जगाकडे होणाऱ्या स्थलांतरामुळे ती रोडावत आहे आणि त्यामुळे दोन्ही देशांत सांस्कृतिक दूताची भूमिका बजावू शकेल असे कोणी आपल्याकडे उपलब्ध नाही, हे ते वाचकांना सांगतात. या सगळ्यांमुळे या अज्ञानात भरच पडते. हे अज्ञान आपल्याला परवडण्यासारखे नाही आणि आपण त्यावर उपाययोजना केल्या पाहिजेत. हे या पुस्तकाचे मुख्य सूत्र आहे असे म्हटले तरी चालेल. अशा पुस्तकांची संख्या वाढत राहण्याची गरज या निमित्ताने अधोरेखित होते हेही नसे थोडके.

**अभय दातार,** नांदेड
Mob.9850759184

**इंडियाज चायना चॅलेंज, अ जर्नी थ्रु चायनाज राइज अँड व्हॉट इट मीन्स फॉर इंडिया**
लेखक : अनंथ कृष्णन
हार्पर कॉलिन्स २०२०, किंमत : रु. ५९९

मल्हार अरणकल्ले

# ‘तरकारी’चा ट्रक

गाव डोंगररांगांच्या ओंजळीत अलगद ठेवल्यासारखं वसलेलं होतं. रात्र पुढं पुढं सरकत चालली, की या मोठ्या ओंजळीत गडद अंधाराचं पाणी साठून राहिल्यासारखं दिसे. या काळोखात जवळचंही दिसत नसे. रात्र वाढू लागली, म्हणजे मोठी मंडळी रस्त्याकडं कान फिरवून ट्रकचा आवाज घेत. कुणाकुणाला त्याच्या आवाजाचे नुसतेच भास होत; आणि तो छातीठोकपणे सांगे : ट्रक पहिल्या डोंगराच्या उतारावरून येताना मला लाइट दिसले. त्याच्या या उद्गारांनी सगळीकडं चैतन्य पसरे. हालचाली गतिमान होत. आपापल्या भाजीपाल्याची बोचकी कुणीकुणी उगाचच हलवून वजनाचा अंदाज घेत. बराच वेळ उलटून गेला, तरी ट्रकचा मागमूस लागत नसे; आणि मग ती बातमी वाऱ्यावर विरून जाई. ग्रामपंचायतीच्या दिव्यांच्या उजेडात थांबलेल्या माणसांच्या सावल्या लांब लांब झालेल्या असत.

पावसाळ्याचे दिवस लागून राहिले, की आकाशातून सरींच्या साखळ्या एकामागून एक धावत येत. गावात सगळीकडं हिरव्या रंगाच्या छटा सांडलेल्या असत. शेतं, शिवारं, डोंगरमाथी, त्यांचे उतार, लांबच लांब पसरत गेलेली गायरानं, रस्त्यांच्या आणि पाऊलवाटांच्या कडांना लगटून असलेले पट्टे– अशी जिकडं नजर जाई, तिकडं हिरवा मखमली महोत्सवच भेटत असे. डोंगरमाथ्यांवरलं गवत चांगलं उंच असायचं. उतारावरचं गवत त्या मानानं खुरटं आणि काहीसं विरळ असायचं. डोंगरउतारांच्या वाटांतून गायरानात आलं, की सगळीकडं लुसलुशीत गवत वाऱ्यावर नाचत असायचं. वाऱ्याच्या लाटा जसजशा पुढं सरकत जात, तशा गवताच्या टोकांवरल्या रेषाही वर–खाली हेलकावत एका दिशेनं धावत जात. या दाट गवतात मध्यभागी जाऊन उभं राहिलं, की गवताच्या पात्यांचे मुलायम स्पर्श आपल्याशी खेळताहेत, असंच वाटत राही. शेतांतली भाजीपाल्याची पिकं चांगलीच ताजीतवानी दिसायची. कोसळत्या पाऊसधारांनी झाडापानांचे स्नानविधी एकसारखे सुरू असत. त्यांच्या अंगाखांद्यांवर हिरवंगार लावण्य पसरलं असल्यासारखं वाटे. झाडांच्या पानांवर, गवताच्या पात्यांवर थबकून बसलेले पाऊसथेंब उन्हात चमचमून उठत. या थेंबांतून उन्हं आरपार जाताना पाहिली, तर एरवी आकाशात दिसणारं इंद्रधनुष्य अगदी हाताशी येईल असं वाटे; आणि मग गवतात बसकण मारून पाण्याच्या थेंबांतून सूर्यकिरणं पाहण्याचा खेळ सुरू होई. रंगीबेरंगी पंख पसरून गवतात मध्येमध्ये भिरभिरणारी फुलपाखरं काही क्षण इंद्रधनुष्याचा आभास निर्माण करीत; आणि तो आनंद घट्ट पकडून ठेवण्याआधीच दुसरीकडं लहरत गेलेला असे. पानांवर स्थिरावलेला पाण्याचा थेंब, त्यात घुसून पलीकडं जाणारे सूर्यकिरण हा दुर्मीळ योग साधून नजरेचे आरसे त्यावर रोखून पाहावं, तर तेवढ्यात एखादी झुळूक तो थेंबच उचलून नेई; आणि मग कितीतरी



वेळ इंद्रधनुष्याचे सप्तरंगी तुकडे निखळून पडत असल्याचा भास होत राही. परिसरातल्या सगळ्या शेतांत पावसाळी भाजीपाल्याची समृद्धी भरून राहिलेली असे. हा भाजीपाला आठवड्यातून एकदा पुण्याला मंडईत विक्रीसाठी पाठविला जाई. तो घेऊन जाण्यासाठी दर बुधवारी रात्री गावात ट्रक येत असे. 'तरकारीचा ट्रक' अशी त्याची ओळख अख्ख्या गावभर होती. तरकारी म्हणजे भाजीपाला, म्हणून तर हा 'तरकारीचा ट्रक'.

आठवड्यातल्या इतर दिवसांपेक्षा आमचा बुधवार खूपच वेगळा असे. एरवी आवराआवर करायला, घरातली कामं करायला अळंटळं करणारे आम्ही त्या दिवशी सुतासारखं सरळ वागत असू. शाळेचा अभ्यास दिवसाउजेडी आटोपत असू. रात्रीचं जेवणही न कुरकुरता लवकर करीत असू; आणि नंतरचा वेळ 'तरकारीच्या ट्रक'साठी राखून ठेवीत असू. गावात तेव्हा वीज पोहोचलेली नव्हती. संध्याकाळच्या सावल्या लांब लांब पसरत चालल्या, की त्या सावल्यांचं बोट पकडून रात्रीचा अंधार सगळ्या बाजूंनी भरून येई. अंधाराच्या त्या पुरात गाव हेलकावे खात असल्यासारखं वाटे. बुधवारी दिवसभर सगळ्या शिवारांत पिकांचा तोडा चाले. गवार, भेंडी, वांगी, मिरच्या, कारली, टोमॅटो, काकड्या या सगळ्याच भाज्या झाडांवरून तोडून टोपल्यांत, करंड्यांत किंवा पोत्यांत भरल्या जात. अंधार पडायच्या आत करंडे, पोती हे सुतळीनं चांगलं भक्कम शिवून घ्यावं लागे. मग ते उचलून मुख्य गाडीरस्त्याला किंवा गावात पेठरस्त्याला आणून ठेवावं लागे. त्या दिवशी रात्री येणाऱ्या ट्रकनं हा भाजीपाला पुण्याच्या मंडईत विक्रीसाठी आणला जाई. हा सर्व भाजीपाला एका एजंटामार्फत पाठविला जाई. करंडे-पोती त्या ठिकाणी येऊन पडली, की एजंट येत असे. त्याच्याकडं शाईचा भला मोठा बुधला असे. त्यात एक लाकूड बुडवून तो पाठविणाऱ्याचं नाव, ज्यांच्याकडं विक्रीसाठी माल पाठवायचा त्या व्यापाऱ्याचं नाव, गावाचं नाव असं लिही. मोठमोठी अक्षरं. आमच्या वहीच्या एका पानावर एकच अक्षर मावू शकेल, एवढी मोठी अक्षरं. शाळा आणि ग्रामपंचायतीची इमारत यांच्यावर लावलेल्या फलकांवरच आम्ही एवढी मोठी अक्षरं पाहिलेली असत. त्यामुळे एजंट ही नावं लिहीत असताना पाहण्यातही मोठी मौज वाटे. ही नावं लिहिली जात असताना, अक्षरांच्या

वळणांचा वेध घेत आमच्या विस्फारलेल्या नजरा तशाच धावत राहत. एका ठिकाणचं काम संपवून एजंट पुढं जाऊन तिथंही तसंच काम सुरू करी. आमच्यातले काही उत्सुक मित्र तिकडंही त्याचा पाठलाग करीत जात. हा माल ग्रामपंचायतीच्या दिव्यांच्या मिणमिणत्या उजेडात मांडून ठेवलेला असे.

गाव डोंगररांगांच्या ओंजळीत अलगद ठेवल्यासारखं वसलेलं होतं. रात्र पुढं पुढं सरकत चालली, की या मोठ्या ओंजळीत गडद अंधाराचं पाणी साठून राहिल्यासारखं दिसे. या काळोखात जवळचंही दिसत नसे. रात्र वाढू लागली, म्हणजे मोठी मंडळी रस्त्याकडं कान फिरवून ट्रकचा आवाज घेत. कुणाकुणाला त्याच्या आवाजाचे नुसतेच भास होत; आणि तो छातीठोकपणे सांगे : ट्रक पहिल्या डोंगराच्या उतारावरून येताना मला लाइट दिसले. त्याच्या या उद्गारांनी सगळीकडं चैतन्य पसरे. हालचाली गतिमान होत. आपापल्या भाजीपाल्याची बोचकी कुणीकुणी उगाचच हलवून वजनाचा अंदाज घेत. बराच वेळ उलटून गेला, तरी ट्रकचा मागमूस लागत नसे; आणि मग ती बातमी वाऱ्यावर विरून जाई. ग्रामपंचायतीच्या दिव्यांच्या उजेडात थांबलेल्या माणसांच्या सावल्या लांब लांब झालेल्या असत. अधून मधून त्यांच्या हालचालीही होत. सावल्या स्थिरावलेल्या असताना तिकडं पाहिलं की 'चांदोबा'तल्या एखाद्या कथेचं मोठ्ठंच्या मोठ्ठं चित्रच पाहत असल्यासारखा भास होई. आम्ही काही मुलंही तिथं ताटकळत बसलेली असू. झगमगत्या दिव्यांचे मोठे डोळे विस्फारलेला ट्रक पाहणं, हे आमचं आकर्षण असे. गावालगतच्या ओढ्याचा उतार ट्रकनं ओलांडला की, वरचा चढाचा रस्ता पार करून येताना ट्रकचे दिवे आकाशाकडं प्रकाशझोत फेकीत आणि मग मात्र सगळीकडंच धांदल उडून जाई. शांत वातावरणात तो गलका फारच मोठा वाटे. टाचा उंचावून आम्ही उगाचच ट्रकच्या दिशेनं माना वर करीत असू. आम्ही थांबलेले असायचो, त्या ठिकाणी ट्रक काही वेळातच दाखल होई; आणि आमच्या डोळ्यांचे कॅमेरे एकदम सुरू होत. पुढच्या सगळ्या हालचाली त्यात टिपून घेतल्या जात. कानांत आवाजांचं, आरोळ्यांचं रेकॉर्डिंग होऊन जाई. ट्रक तिथं येऊन थांबताच, गावातला एजंट खाली उतरे. कुणाला माल ट्रकमध्ये उचलून टाकायचा असे, त्यांची गडबड सुरू होई. काहींना गेल्या आठवड्यात पाठविलेल्या मालाच्या विक्रीचा हिशेब घ्यायचा असे. एजंट त्यांना त्यांच्या त्यांच्या पट्ट्या आणि हिशेबानुसार त्यात दाखविलेले पैसे देई. (पुण्याच्या मंडईतल्या विक्रेत्यानं माल विकल्यानंतर तयार केलेलं बिल म्हणजे पट्टी. हाच शब्द त्यासाठी रूढ होता. एकूण माल किती भरला, भाव काय मिळाला, त्याचे एकूण किती पैसे झाले, त्यातून तोलाई, हमाली, वाहतूक, धर्मादाय अशा काही रकमा वजा केलेल्या असत. उरलेली रक्कम ही 'फायनल पट्टी' असे. ती रक्कम शेतकऱ्यांच्या हाती मिळे.)

तरकारीचा हा ट्रक घेऊन येणारा आमच्यातल्या एका मित्राचा मामा होता. या सगळ्या गदारोळात तो मामाचा शोध घेई. त्याच्या आईनं मामाबरोबर देण्यासाठी काहीबाही केलेलं असे. कधी लाडू असत. कधी पुरणपोळ्या असत. कधी कधी ज्वारीच्या गरमागरम भाकरी, लसणीची चटणी असंही असे. मित्राचा मामा आमचाही मामाच होऊन गेलेला असे. मित्र सांगे : आमचा मामा खूप शक्तिमान आहे. ट्रक मालानं कितीही भरलेला असला, तरी मामा तो जागेवरच थांबवू शकतो. कमी जागेतही ट्रक वळवू शकतो. मामा ड्रायव्हर सीटवर बसून ब्रेक दाबू लागला, म्हणजे खरोखरच खूप शक्तिमान वाटे. आम्ही सगळी मुलं आश्चर्यभरल्या हावभावांचे वेगवेगळे नमुने चेहऱ्यावर आणीत हे सगळं पाहत असू. 'मोठेपणी कोण व्हायचं?' या प्रश्नाचं आमच्या स्वप्नांतलं उत्तर ठरलेलं असे : या मामासारखाच शक्तिमान ड्रायव्हर!

ठिकठिकाणचा भाजीपाला घेऊन ट्रक गावकुसाच्या रस्त्याला लागे. तोपर्यंत रात्रही बरीच वाढलेली असे. गावकुसाच्या कोपऱ्यावर ट्रकला आणि मामाला निरोप देऊन आम्ही आपापल्या घराकडं परतत असू. ट्रकच्या दिव्यांतून उधळल्या जाणाऱ्या प्रकाशाची रेषा गावकुसाच्या कडेकडेनं चमचमत सरकत राही; आणि मग सगळंच अंधारात गुडूप होऊन जाई. आमच्या पुढच्या बुधवारपर्यंतचा आठवडा या आठवणींवर झोके घेत राही. वर्गात, वर्गाबाहेर ट्रकचीच चर्चा चाले; आणि आमच्या पाट्यांवर त्या ट्रकचीच चित्रं रंगत राहत.

**मल्हार अरणकल्ले,** पुणे
Mob.9881099007
arankalle.malhar@gmail.com

# प्रतिसाद

## धार्मिक हिंदू उदारमतवादी असू शकत नाहीत, असा तुमचा समज आहे का?

दि.२८ ऑगस्ट २०२१ चा 'धर्माने मला काय दिले?' हा विशेषांक विचारप्रवर्तक आहे. अंकाच्या पृष्ठसंख्येची मर्यादा लक्षात घेऊनही एक मोठी त्रुटी चटकन मनात भरते. ज्यांना 'धार्मिक हिंदू' म्हणता येईल, अशा कोणाचाही लेख या अंकात नाही. लेखक उदारमतवादी असावेत हा तुमचा आग्रह योग्यच आहे. पण फादर आणि रेव्हरंड अशा व्यक्तींची निवड करताना धार्मिक हिंदू उदारमतवादी असू शकत नाहीत, असा तुमचा कुठे तरी समज झाला असावा. सर्वच लेखकांनी अनेक महत्त्वाचे मुद्दे मांडले आहेत. त्यातले काही विशेष लक्षात राहण्याजोगे आहेत. रेव्हरंड चित्रलेखा जेम्स म्हणतात, 'मी अंधश्रद्धांना आणि भोंदूगिरीला थारा देत नाही.' पुढे त्या सवाल करतात, 'स्त्री-पुरुष समानता ही जर बायबलमध्ये आहे, तर चर्चमध्ये किंवा प्रत्यक्ष समाजात का दिसत नाही?' २०१३ मध्ये अंधश्रद्धा निर्मूलन समितीत सहभागी झाल्यानंतर त्यांना चर्चमधल्या जातीयवादाची माहिती झाली याची कबुली त्या देतात.

डॅनिअल मस्करणीस या तरुणाने सातत्याने साधनामध्ये पुरोगामी विचार मांडलेले आहेत. विवेक मंचामुळे त्यांना धर्माने काय चुकीचे दिलेय हेही उमजू लागले. आपल्या पूर्वजांचे ख्रिस्ती धर्मांतर हे स्वेच्छेने नाही, तर सक्तीचे होते हा एक क्लेशदायक इतिहास त्यांनी समजून घेतला. धर्मचिकित्सेच्या आधारे त्याचा सामाजिक जीवनातला प्रभाव कमी करणे खूप गरजेचे झाले आहे, असे त्यांचे प्रतिपादन आहे.

इस्लामपासून अनभिज्ञ असणारे सर्वाधिक मुसलमानच आहेत, या मानवेंद्र रॉय यांच्या वक्तव्याशी फ.म. शहाजिंदे सहमत होतात आणि इस्लामचे संवादस्वरूप लोप पावून त्याला हट्टाग्रहाचे स्वरूप आल्याची कबुली देतात. सामाजिक चळवळीत आल्यानंतर रझिया पटेल यांना पहिला संघर्ष धर्माच्या नावाने दडपशाही करणाऱ्यांशी करावा लागला, हे सत्य त्या वाचकांसमोर ठेवतात. मुस्लिम समाजात अंधश्रद्धांचा प्रसार आणि शोषण वाढवण्यात प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे धर्माचा हातभार आहे, हे शमसुद्दीन तांबोळी यांचे निरीक्षण परखड आहे. हिंदू धर्मात अशा प्रकारच्या अत्यंत परखड आणि निर्भीड चिकित्सेची मोठी परंपरा आहे. सर्वच धर्मांची अशा प्रकारची चिकित्सा समाजासाठी आवश्यक आहे. त्या दृष्टीने साधनामधले हे लेख आश्वासक वाटतात. त्या मानाने फादर फ्रान्सिस दिब्रिटो यांच्या लेखनात पुरेसा प्रांजळपणा नाही. स्वतःच्या धर्माची महती गाताना (तो त्यांचा अधिकार आहे), मदर तेरेसा यांच्या तथाकथित 'चमत्कारांविषयी' त्यांनी उघडपणे घेतलेली अ-वैज्ञानिक भूमिका ते सोईस्करपणे विसरतात. साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाची निवड धर्माचे परिमाण न लावता झाली असे म्हणताना, या पदापर्यंत पोहोचण्याच्या मुळाशी माझ्या धर्माचीच प्रेरणा आहे, हेही ठासून सांगतात.

एरवी वैज्ञानिक भूमिका घेणाऱ्या दत्तप्रसाद दाभोळकरांनी सुरुवातीलाच 'विज्ञान आणि धर्म' हे दोघेही म्हटले तर चूक आणि म्हटले तर बरोबर! असे अघळपघळ विधान केले आहे. विज्ञान कसे चूक आहे याबाबत त्यांनी काही प्रबोधन केले असते तर बरे झाले असते. डीएनए चाचणी न करता कोणाला पिता-पुत्री या नात्यावर विश्वास ठेवायचा असेल तर तो त्यांनी ठेवावा. काही अपवाद वगळता नेहमी तसेच होत असते. त्यात विज्ञानाने स्वीकारण्यासारखे किंवा नाकारण्यासारखे काही नाही. तीच गोष्ट हमीद दाभोलकर यांच्या लेखाविषयी. 'विज्ञानाचा धर्म' हा शब्दप्रयोग एक वेळ लाक्षणिक अर्थाने समजून घेता येईल. पण 'धर्माचे विज्ञान' म्हणजे काय? असे शब्दप्रयोग संभ्रम निर्माण करतात आणि सामान्यांना भुलवण्यासाठी वापरले जाण्याचा धोका असतो. एकूण विचाराला खाद्य देणाऱ्या साधनाचे आभार.

**सत्यरंजन खरे**, मुंबई

## निधर्मीपणाचे स्तोम न माजवता वस्तुनिष्ठ विचार आवश्यक!

दि.२८ ऑगस्टच्या अंकातील 'धर्माने मला काय दिले?' या विषयावरील विविध लेखांचा आणि त्यातील विचारांचा माझ्या मते अल्पशिक्षित वा निरक्षर नागरिकांना धर्म काय देतो किंवा देत नाही याबद्दलचा विचार करणे अतिशय गरजेचे आहे. समाजातील या वर्गासाठी (या वर्गात महिला जास्त असाव्यात असे वाटते) 'धर्म ही अफूची गोळी' असू शकते, किंबहुना असतेच. या जनतेचे अज्ञान आणि त्याचा गैरफायदा करून घेणारे राजकीय पुढारी आणि धर्ममार्तंड यांच्याशी मुकाबला कसा करायचा हा अधिक गंभीर प्रश्न आहे. आणि माझ्या मते धर्माने मला काय दिले, या विषयावरील चर्चा अधिक व्यापक व्हावी ते वाटत असेल तर धर्माचे सर्वसामान्यांच्या जीवनातील स्थान काय असते हा विषय चर्चेचा केंद्रबिंदू असला पाहिजे.

या विषयावर सुचलेले आणखी काही विचार : १. सुशिक्षित व्यक्तीला धर्म शहाणा करू शकतो किंवा माथेफिरूपण करू शकतो. कसेही असले तरी धर्माचे आपल्या जीवनातील स्थान नाकारून काहीच साध्य होणार नाही हे उघड आहे. म्हणूनच एखाद्याच्या निधर्मीपणाचे अवास्तव स्तोम न माजवता वस्तुनिष्ठ विचार करणे जरुरीचे आहे. २. एखादी व्यक्ती तिच्या वा त्याच्या खाजगी आयुष्यात धर्माला खूप महत्त्व देत असली/असला तरी त्या व्यक्तीचे समाजभान प्रखर असू शकते. त्यामुळे धर्माच्या प्रभावाबद्दल सरसकट विधाने करणे संयुक्तिक नसते.

**नरेंद्र महादेव आपटे,** पुणे

## मोठ्यांचा विकास छोट्यांच्या सुविधा उद्ध्वस्त करूनच होणार आहे का?

दि. १४ ऑगस्टच्या अंकातील मतीन भोसले यांचे 'अस्वस्थ वर्तमान' खिन्न करणारे आहे. आजच्या या तथाकथित विकासाच्या वाटेने धावणाऱ्या सरकार, प्रशासन व एकूणच व्यवस्थेविषयी संताप आणणारे आहे. या तथाकथित विकासाच्या योजनांना सम्यक, समतोल आर्थिक विकासाचे रूप नसेल, तर महत्प्रयासांनी उभी केलेली, राहिलेली खऱ्याखुऱ्या विकासाची रोपटी/बेटे चिरडून उद्ध्वस्त होतात, यांचे हे मन सुन्न करणारे ज्वलंत उदाहरण आहे. बुलडोझर केवळ प्रश्नचिन्ह या आश्रमशाळेवर फिरलेला नाही, तर गरीब फासेपारधी चिमुकल्यांच्या जगण्यातल्या सुखस्वप्नांवर, विकासावर बुलडोझरने घाला घातला आहे!

प्रश्न असा पडतो की, समृद्धी महामार्गाला थोडे वळण देऊन या आश्रमशाळेला वळसा घालून पुढे नेऊन आश्रमशाळा वाचवण्याचा विचार का केला गेला नाही? १२ वर्षांच्या प्रयत्नांतून साकारलेले, समाजातल्या गरीब, दुर्लक्षित ४८६ विद्यार्थ्यांना त्यांचे जीवन फुलविणारे शिक्षण देणारे विद्यामंदिर जमीनदोस्त करणाऱ्यांना कुठला आणि कोणाचा विकास साधायचा आहे? बरं, तुमचे सारे बरोबर आहे म्हटले तरी ही आश्रमशाळा पाडण्यापूर्वी, तेथून शक्य तितक्या जवळ तशी तेवढी इमारत व जागा बांधून देण्याची व्यवस्था करणे आणि ते शक्यच नव्हते तर, त्यासाठी संस्थेला आर्थिक पाठबळ पुरविणे- पाडणारांचे कर्तव्य नाही का? उत्तरदायित्व नाही का? का मोठा विकास छोट्या गरिबांच्या विकासाच्या सोईसुविधा उद्ध्वस्त करूनच उभा राहणार आहे? पण काय करणार, सत्ताशक्तीच्या बुलडोझरपुढे व्यक्ती, संस्था यांचा शक्तिहीन क्रोध कोलमडून पडतो. सारेच कठीण आहे! पण मतीन भोसले यांची विजिगीषू जिद्द मोठी आहे, कौतुकास्पद आहे. त्यांच्या बळकट समर्थ हातांना आपण अल्प असला तरी होईल तेवढा हातभार लावणे, एवढेच आता आपल्या हाती आहे.

**अरुण वि. कुकडे,** नाशिक

## साधनाच्या ७३ वर्षांच्या यशाचे खरे कारण 'ते' आहे!

भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करत असताना दि. २१ ऑगस्टचा साधना अंक हाती आला. कोणतेही मासिक असो वा साप्ताहिक, सुरुवात नेहमी संपादकीयाने आणि पुस्तक असेल तर लेखकाच्या मनोगतानेच करायची, याची सवय स्वत:स लावून घेतली आहे. कारण यामुळे त्या साहित्याशी नाळ जुळायला मदत होते.

या अंकातील संपादकीय वाचत असताना १५ ऑगस्ट १९४८ रोजी साने गुरुजींनी सुरू केलेल्या साधना साप्ताहिकास ७३ वर्षे पूर्ण झाली हे समजले. परमपूज्य साने गुरुजींपासून आतापर्यंतच्या सर्व संपादकांनी अनेक लेखक व हितचिंतकाच्या साह्याने, 'स्थापण्या समता शांती ठेवुनी शुद्ध साधनां। करिती साधना त्यांना ठेवो उत्स्फूर्त साधनां।।' हे ब्रीद अंगी बाळगून गेली ७३ वर्षे समाजप्रबोधनाचा हा यज्ञ अविरतपणे तेज:पुंज ठेवला आहे. दरम्यानच्या कालावधीत अनेक स्थित्यंतरे आली, नवी आव्हाने समोर आली- पण थकता न थांबता हा लामणदीप अखंडपणे तेवत राहिला आहे. अगदी कोविड-१९ हे वैश्विक संकटसुद्धा

यास रोखू शकले नाही. याचे सारे श्रेय साधना परिवारास जाते.

माझा साधना परिवाराशी संबंध गेल्या सात-आठ वर्षांचा, पण विषयांची विविधता, लेखांची निवड व दांभिकपणावर सडेतोडपणे झणझणीत अंजन घालणारे संपादकीय हे माझ्या विशेष आवडीचे भाग. साधना नेहमीच समाजातील दांभिकतेचा बुरखा फाडताना कचरला नाही किंवा वंचित, शोषितांचा आवाज बनताना मागे हटला नाही. हेच गेल्या ७३ वर्षांच्या यशाचे खरे कारण आहे असे मला वाटते. ७४ व्या वर्षांत पदार्पण करताना नवनवीन विषयांसह येणारा साधना अंक हा माझ्या परिवारातील एक अविभाज्य घटक असेल हे मात्र नक्की.

**अजय काळे**, तासगाव, सांगली

## महादेवभाई आमच्या विस्मरणात कसे गेले, हे एक आश्चर्यच!

दि. २१ ऑगस्टच्या अंकातील रामचंद्र गुहा यांचा 'गोष्ट विस्मरणात गेलेल्या थोर गांधीवादाची' हा लेख वाचला. ऑगस्ट महिन्याचे औचित्य साधून देशासाठी प्राणार्पण करणाऱ्या देशभक्तांचे स्मरण करणारा हा लेख वाचल्यानंतर आश्चर्यच वाटले. एवढा महान विचारांचा संपूर्ण आयुष्य देशासाठी वेचणारा विद्वान व गांधीजींचा सर्वप्रिय अनुयायी ज्याचा उल्लेख म.गांधी 'महादेव आता माझा हात, पाय आणि मेंदूही आहे' असा करतात. असे बुद्धिजीवी स्वातंत्र्यचळवळीचे केंद्रबिंदू असणारे महादेव देसाई आमच्या विस्मरणात कसे गेले, हे आश्चर्यच आहे! त्यांच्या जीवनाबद्दल माहिती करून देण्यासाठी आम्ही आमच्या 'उस्मानाबाद गप्पाष्टक मंडळ'मध्ये देवीदास वडगावकर यांचे व्याख्यानच ठेवले. 'महादेव देसाई यांचे स्वातंत्र्यासाठीचे योगदान' आम्हांला उलगडत गेले. साधना साप्ताहिकाचे विस्मरणात गेलेल्या स्वातंत्र्यासाठी योगदान देणाऱ्या बुद्धिजीवी विचारवंतांबद्दल एक लेख अवश्य असावा असे वाटते. स्वातंत्र्य दिनादिवशी आम्ही ठरावीक देशभक्तांबद्दल पुन्हा पुन्हा बोलतो, परंतु अशा विस्मरणातील देशभक्तांना स्मरणात ठेवण्यासाठी साधनाने हा लेख प्रसिद्ध केला हे स्पृहणीय आहे.

**विष्णू शिवराम ढेरे**, काकंबा, जि.उस्मानाबाद

## उत्तर व दक्षिण यांच्यातील असमतोलाला तिसरेही एक कारण आहे!

दि. २६ जूनच्या साधनातील रामचंद्र गुहा यांचा 'उत्तर व दक्षिणेकडील राज्यांच्या विकासाचा असमतोल' याबद्दलचा लेख वाचला. त्या विकासाच्या फरकाची त्यांनी इतिहासातील दोन कारणे दिली आहेत. ती म्हणजे एक- परकीय मुस्लिम आक्रमणे व दोन- फाळणीवेळची हिंसा व अत्याचार यांची झळ उत्तरेला फार मोठ्या प्रमाणात बसली. पण दक्षिणेकडे ही झळ पोहोचली नाही. ही दोन्ही कारणे बरोबरच आहेत, तरीही तिसरे कारण म्हणजे उत्तरेपेक्षा दक्षिणेकडील राज्ये आकाराने लहान व उत्तरेपेक्षा खूपच कमी लोकसंख्या हे एक कारण असावे असे वाटते.

या बाबत एक वेगळाच विचार मांडावासा वाटतो तो म्हणजे- उत्तरेकडे कडवे हिंदुत्व व कडवे मुस्लिमत्व वाढीस लागले असावे असे वाटते. परकीय आक्रमकांचे अत्याचार, धर्मांतर, देवळांची तोडफोड, स्त्रियांवरील अत्याचार पुन्हा फाळणीच्या वेळीही अशाच अत्याचारांना उत्तरेकडील लोकांना सहन करावे लागले. त्यामुळे साहजिकच त्यांच्या मनात मुस्लीम समाजाबद्दल रोष असावा व त्याचे रूपांतर कडवेपणात झाले असावे. याउलट अनेक शतके मुस्लीम राजवट असल्यामुळे मुस्लिम समाज स्वत:ला राज्यकर्ता समाज व हिंदू हे प्रजाजन- अशा समजात अजूनही असल्यामुळे मुस्लिमही कडवे झाले असावेत. या गोष्टी दक्षिणेकडील राज्यांच्या वाट्याला न आल्यामुळे व लोकसंख्या व राज्यांचा आकारमान, या सोईच्या गोष्टींमुळे त्यांचा वैचारिक, सामाजिक व आर्थिक विकास झाला असावा असे वाटते.

**स्नेहलता गोसावी**, पुणे

## तो लेख पुन:पुन्हा वाचला आणि अधिकाधिक आकलन झाले!

दि.२८ ऑगस्टचा 'धर्माने मला काय दिले?' हा विशेषांक अतिशय आवडला. डॉ.नरेंद्र दाभोलकरांचा लेख पुन:पुन्हा वाचण्यासारखा आहे. मी तसा वाचला आणि त्यांच्या विचारांचे अधिकाधिक आकलन झाले. मला 'तिमिरातून तेजाकडे' पुस्तकाबद्दल माहीत नव्हते, आता ते संग्रही ठेवीन. सर्वच लेख जरी आत्मनिवेदनपर असले तरी विचार करायला लावतात.

**विवेक पटवर्धन**, ठाणे



बँक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
भारत सरकार का उद्यम
एक परिवार एक बँक
मान्सून धमाका ऑफर
महाबँक रिटेल बोनान्झा
0%*
गृह आणि कार कर्जावर
प्रक्रिया शुल्क
(ऑफर्सची सुरुवात 9 ऑगस्ट ते 30 सप्टेंबर 2021)
व्याजदर 6.90%* पासून
व्याजदर 7.15%* पासून
जास्तीत जास्त कर्जाची रक्कम
सुवर्ण कर्ज
शैक्षणिक कर्ज
2 चाकी वाहन कर्ज
ग्राहक कर्ज
वैयक्तिक कर्ज
टॉपअप कर्ज
बॅलन्स ट्रान्सफर
*नियम व अटी लागू
भेट द्या
www.bomloans.com
मिस्ड कॉल द्या
8010 614 614
Follow Us @mahabank

**Registered** Licence to Post Without Prepayment of Postage No. WPP-6/31-12-2023
एन.डी.नं.आर.एन.आय.१६०१/५७ Postal Regstration No. PCW/080/2021-2023
Posted at PUNE PSO GPO 411001 / Every Monday / Date of Posting: 6-9-2021/ Date of Publication : 6-9-2021

storytel

# साधना प्रकाशनाची १० पुस्तके ऑडिओ बुक स्वरूपात storytel वर आली.

**श्याम : साने गुरुजी**
(वाचन : सुहास पाटील)

**सुंदर पत्रे : साने गुरुजी**
(वाचन : सुहास पाटील)

**गुलामगिरीतून गौरवाकडे**
बुकर टी वॉशिंग्टन
अनुवाद : मुकुंद वझे
(वाचन : ओंकार गोवर्धन)

**गांधीजी आणि त्यांचे टीकाकार**
सुरेश द्वादशीवार
(वाचन : मृदगंधा दीक्षित)

**जवाहरलाल नेहरू**
सुरेश द्वादशीवार
(वाचन : मृदगंधा दीक्षित)

**लढे अंधश्रद्धेचे**
डॉ. नरेंद्र दाभोलकर
(वाचन : हर्षल लवंगारे)

**कहाणी पाचगावची**
मिलिंद बोकील
(वाचन : मिलिंद बोकील)

**माझी काटेमुंढरीची शाळा**
गो. ना. मुनघाटे
(वाचन : राजकुमार तांगडे)

**तीन तलाक विरुद्ध पाच महिला**
हिनाकौसर खान
(वाचन : हिनाकौसर खान)

**निवडक बालकुमार साधना**
संपादन- विनोद शिरसाठ
(वाचन : दिपाली अवकाळे)



: सप्टेंबर २०२१ अखेर येतील आणखी चार पुस्तके :
**मेळघाट- शोध स्वराज्याचा, तीन मुलांचे चार दिवस, मन्वंतर- समूहाकडून स्वतःकडे, झुंडीचे मानसशास्त्र**
आणि त्यापुढील प्रत्येक महिन्यात चार ते पाच पुस्तके येत राहतील.

संपर्क
**साधना प्रकाशन**
४३१ शनिवार पेठ, पुणे ३०
Ph. 020 24459635 / Mob. 7058286753
sadhana.prakashan@gmail.com

हा QR कोड स्कॅन करून स्टोरीटेलचे सबस्क्राइबर होता येते...